मुंबई/प्रतिनिधी :



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, ■ सोमवार १२ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०




# शिवाजी पार्कमधील सीजेपी आंदोलकांवर कारवाई

## ३०० जणांना ताब्यात घेऊन सोडले, FIR दाखल

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईतील शिवाजी पार्क येथे सीजेपी आंदोलनादरम्यान पोलिसांनी सुमारे ३०० आंदोलकांना आज ताब्यात घेतले होते. मात्र, कायदेशीर कारवाईनंतर या सर्व आंदोलकांना आता सोण्यात आले असून, या प्रकरणी पोलिसांकडून एफआयआर नोंदवण्याचे काम सुरू आहे. आदित्य ठाकरे यांनी पोलीस प्रशासनावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. 'आम्ही अनेकदा मुंबई पोलिसांच्या कामाचे कौतुक केले आहे, पण आता ते थेट दिल्ली पोलिसांसारखे वागू लागले आहेत. जर असेच प्रकार सुरू राहिले, तर मुंबईच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात शिवसैनिक आणि मनसैनिक रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही,' असा इशारा आदित्य ठाकरेंनी दिला.





कॉकरोच जनता पार्टीच्या समर्थनात दादरमध्ये युवासेनेने आंदोलन सुरु केले आहे. आंदोलकांची धरपकड करणाऱ्या पोलिसांना रोखण्याचा प्रयत्न ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी केला. यावेळी पोलिसांसोबत झटापट झाली. आंदोलकांना घेऊन जाणारी गाडी अडवण्यासाठी आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे हे रस्त्यावर उतरले आहेत.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एका पोस्टचे खंडन करत सीजेपीने स्पष्ट केले आहे की, आमच्या कोणत्याही नेत्याने असा कोणताही बॉन्ड साइन केलेला नाही, ज्यामध्ये भविष्यात ते कोणतेही विरोध प्रदर्शन करणार नाहीत असे म्हटले गेले आहे. या बॉन्डमध्ये केवळ 'शांतता भंग न करण्याबाबत' नमूद करण्यात आले आहे. सीजेपीने स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, शांततापूर्ण आंदोलनात किंवा निदर्शनांमध्ये सहभागी होणे हा प्रत्येक नागरिकाचा संवैधानिक अधिकार आहे आणि अशाप्रकारे सहभागी होण्याने कधीही शांतता भंग होत नाही. आमचे आंदोलन आणि विरोध प्रदर्शन कायदेशीर मार्गाने सुरूच राहील.

शनिवारी घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत कपिल सिब्बलांनी सरकारच्या भूमिकेवर जोरदार टीका केली होती. आम्ही सुप्रीम कोर्टात जाऊन थकलो आहोत. वारंवार जाऊनही कोर्टाकडून हवी तशी दाद मिळत नाही, मनातील खंत सिब्बल यांनी बोलून दाखवली.

# आंदोलन होणारच, नरेंद्र मोदींची हुकूमशाही मोडून काढणार

### अभिजीत दिपकेंची घोषणा;

**मुंबई/प्रतिनिधी** : अभिजीत दिपके हे दिल्लीहून मुंबईत आले आहेत. त्यांनी मुंबईत उतरताच आंदोलन करणारच असा नारा दिला आहे. तसंच दिल्ली पोलिसांनी मुळीच माणुसकी दाखवली नाही असा आरोप केला आहे. तसंच दिल्ली पोलिसांमध्ये गुंड आहेत, त्यांच्याकडे माणुसकी नावाची गोष्ट नाही असंही अभिजीत दिपके म्हणाले आहेत. आम्ही या कुणाच्या हुकूमशाहीला घाबरणार नाही असंही दिपके यांनी म्हटलं आहे.



'दिल्ली पोलिसांनी मला सांगितलं की तुझी आजी गेली आहे. मला पहाटे ३.३० ला त्यांनी ही बातमी दिली. मला म्हणाले तुझ्या आई वडिलांशी आम्ही तुझं बोलणं करून देतो. पहाटे ३.३० ला आई वडिलांशी बोलणं करून द्यायचं कारण काय? मी त्यांना सांगितलं मला माझ्या भावाशी बोलायचं आहे ते बोलू द्या, मला फोन द्या त्यांनी नाही दिला. त्यांना सांगितलं की ठीक आहे वकिलांशी बोलतो मला फोन द्या त्यांनी फोन दिला नाही. आजी वारल्यानंतर दिल्ली पोलीस म्हणाले की तुमच्या आई वडिलांना फोन करून सांगा की तुम्हाला अटक झाली आहे. हा भीती निर्माण करण्याचाच प्रयत्न होता. मी जेव्हा दुपारी सांगितलं तेव्हा त्यांनी भावाशी बोलू दिलं नाही. मी दोनच मिनिटांसाठी माझा फोन मागितला पण मला फोन त्यांनी दिला नाही. वकिलांशी बोलू दिलं नाही.' असा आरोप अभिजीत दिपकेंनी दिल्ली पोलिसांवर केला आहे.

आंदोलनाबाबत विचारलं असता अभिजीत दिपके म्हणाले, आम्ही कुणालाही काहीही लिहून दिलेलं नाही. लवकरच रस्त्यावर उतरणार आणि आंदोलन करणार आहोत. ☞(पान २ वर)

# पेट्रोल, डिझेलच्या दरात मोठी वाढ ?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** महागाईने आधीच त्रस्त असलेल्या ग्राहकांना आता पुन्हा एकदा एक मोठा झटका बसला आहे. आता पेट्रोल डिझेलच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे आता ग्राहकांना पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी जादा पैसे मोजावे लागणार आहेत.




जर तुम्ही देखील पेट्रोल भरण्यासाठी निघाला असाल तर ही बातमी महत्त्वाची आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजची सपोर्ट कंपनी जियो-बीपीकडून पेट्रोल, डिझेलच्या दरात वाढ करण्यात आली आहे. दरम्यान यापूर्वी नायरा एनर्जी या कंपनीने देखील आपल्या पेट्रोल, डिझेलच्या किंमतीमध्ये वाढ केली होती, त्यानंतर आता जियो बीपीकडून देखील पेट्रोल, डिझेलचे दर वाढवण्यात आले आहेत.

मिंटने दिलेल्या वृत्तानुसार जियो-बीपीकडून पेट्रोलच्या दरात प्रति लिटर मागे ५ रुपयांची ☞(पान २ वर)

# राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राजीनामा द्यावा

### मराठा क्रांती मोर्चाची मागणी



**पुणे/प्रतिनिधी ::** मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमिती काम करत नसून, समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आली. मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकावे, यासाठी नेमलेल्या संस्था-संघटना, अभ्यासक आणि समाजबांधवांशी समितीने एकही बैठक घेतली नसल्याचा आरोप मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक राजेंद्र कोंढरे, किरण गायकर, किशोर चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत ही मागणी केली. विखे यांनी राजीनामा न दिल्यास त्यांच्या शिर्डी मतदारसंघांमध्ये मराठा समाजाची बैठक घेऊन प्रश्न विचारणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकावे, यासाठी समिती नेमण्यात आली आहे. मात्र, या समितीने संस्था-संघटना, अभ्यासक आणि समाजबांधवांशी एकही बैठक घेतली नाही. विखे-पाटील आणि ☞(पान २ वर)

# भारताच्या अंतर्गत बाबींत लुडबुड करु नका

## संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाला परराष्ट्र मंत्रालयाने सुनावले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-:** कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनावर झालेल्या कारवाईवर चिंता व्यक्त करणाऱ्या संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाला भारताने कठोर शब्दांत सुनावले आहे. ही भारताची अंतर्गत बाब असून त्यात लुडबुड सहन केली जाणार नसल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. दिल्लीत झालेल्या आंदोलनावेळी आंदोलकांवरील कारवाईवर संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाने (ओएचसीएचआर) चिंता व्यक्त केली होती. याला परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी उत्तर दिले.



आम्ही दिल्लीतील घटनांबाबत मानवाधिकार उच्चायुक्तांच्या कार्यालयाची मते पाहिली. सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात संविधानाने शांततापूर्ण मार्गाने जमण्याच्या अधिकाराची हमी प्रत्येकाला दिली आहे. बळकट संस्था, स्वतंत्र न्यायव्यवस्था व स्वतंत्र मीडियाद्वारे त्याचे रक्षण केले जाते. प्रत्येक लोकशाहीप्रमाणे भारतीय नागरिकही सार्वजनिक सुव्यवस्था व सुरक्षा राखण्याच्या अटींसह या अधिकाराचा वापर करतात. आमची कायदा व सुव्यवस्था राखणारी यंत्रणा कायद्यानुसार कडकपणे काम करते आणि तक्रारींच्या निराकरणासाठी न्यायालये उपलब्ध आहेत. त्यामुळे 'ओएचसीएचआर'च्या चिंता पूर्णपणे निराधार आहेत. हा भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये अनावश्यक हस्तक्षेप आहे, जो कधीही सहन केला जाणार नाही, असे जयस्वाल यांनी म्हटले आहे.

**शेजारील देशांतील आंदोलनांवर 'ओएचसीएचआर'चे मौन**

'ओएचसीएचआर' नेहमीच पक्षपाती राहिले आहे. आमच्या शेजारील देशांतील निदर्शने व हिंसक घटनांवर त्यांनी कधीच भाष्य केले नाही. तेथील कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या एजन्सींच्या☞(पान २ वर)

# संविधान दाखवून संस्था उद्ध्वस्त करायच्या हा विरोधकांचा डाव

### देवेंद्र फडणवीस यांचं वक्तव्य

**मुंबई/प्रतिनिधी** : काँग्रेस आणि सीजेपीच्या आंदोलनाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं आहे. जे काही देशात चाललं आहे त्यामागे एक व्यवस्थित षडयंत्र दिसून येतं असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. तसंच संविधानाने चालणाऱ्या संस्थांचं अवमूल्यन करण्याचा विरोधकांचा डाव आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.



काँग्रेस असो किंवा कॉक्रोच जनता पार्टी असो ते संविधान हातात घेऊन, ते दाखवत आंदोलन करतात. आंदोलन कशासाठी करत आहेत तर संविधानाने तयार झालेल्या सगळ्या संस्था म्हणजे RBI, सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग सगळ्या संस्था वाईट आहेत असं हे सांगतात. आता यामागे डिझाईन हे आहे की या सगळ्या संविधानाने चालणाऱ्या संस्थांचं अवमूल्यन करणं, मग सांगायचं की संविधानाने तयार केलेल्या संस्था तुम्हाला न्याय देऊ शकणार नाहीत. मग संविधानाने तुम्हाला न्याय मिळणार नाही. अशा पद्धतीने संविधान दाखवूनच संविधानाच्या विरोधात षडयंत्र चाललं आहे. एक अल्ट्रा लेफ्टिस्ट व्यवस्था या लोकांना आणायची आहे. कुठल्याही तर्काशिवाय हे बोलत आहेत. कुणी तर्क मांडत तथ्य मांडली तर टीका ☞(पान २

# मतचोरी, एसआयआरविरोधात विरोधकांचा उद्या सुप्रीम कोर्टापर्यंत मोर्चा, सरन्यायाधीशांना भेटणार

### राहुल गांधींची घोषणा;

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीच्या मुद्द्यावरून दिल्लीतील राजकीय वातावरण तापले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी १२ ऑक्टोबर रोजी सुप्रीम कोर्टापर्यंत मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चाद्वारे मतचोरी थांबवणे, एसआयआर प्रक्रिया रोखणे आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्याची मागणी केली जाणार आहे. राहुल गांधी यांनी हातात संविधान घेऊन एक व्हिडीओ पोस्ट करत सर्वांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



**सुप्रीम कोर्टापर्यंत मोर्चा काढणार**

राहुल गांधी यांनी एक व्हिडीओ पोस्ट करून या मोर्चाची घोषणा केली. शनिवारी दिल्लीत शांततेत आंदोलन करण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या तरुणांना पोलिसांनी मारहाण केल्याचा आरोप त्यांनी केला. तरुणांच्या मनात द्वेष किंवा राग नव्हता, तर प्रेमाची भावना होती. तरीही त्यांच्यावर बळाचा वापर करण्यात आला, असं राहुल गांधी म्हणाले.

'शांततेत विरोध करणाऱ्या तरुणांना अशी वागणूक मिळणारा भारत आम्हाला नको आहे. त्यामुळे सोमवारी आम्ही सुप्रीम कोर्टापर्यंत मोर्चा काढणार आहोत. या मोर्चात पक्ष, स्त्री-पुरुष, जात, समाज आणि राज्य यांतील भेद बाजूला ठेवून सर्वांनी भारतीय म्हणून एकत्र या. लोकशाहीवर विश्वास असणाऱ्या प्रत्येकाने या मोर्चात सहभागी व्हावं. कोणत्याही व्यक्तीची राजकीय विचारधारा काहीही असली, तरी संविधानावर विश्वास असेल तर त्यांनी एकत्र यावे,' असे ☞(पान २ वर)




# नवरात्रीची ज्योत आणताना काळाचा घाला; दोघांचा मृत्यू

**आटपाडी /वृत्तसंस्था-** नवरात्रोत्सवासाठी आई भवानीची ज्योत आणण्याच्या भक्तिमय प्रवासाला निघालेल्या कौठुळी येथील दोन युवकांवर काळाने घाला घातला. तुळजापूर येथून देवीची ज्योत घेऊन परतत असताना तुळजापूर-धाराशिव मार्गावर झालेल्या भीषण अपघातात संभाजी प्रल्हाद कदम (वय ४०) आणि राजेश आप्पासाहेब कदम (वय ३८) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात असलेल्या कौठुळी गावावर या घटनेमुळे दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.



आटपाडी तालुक्यातील कौठुळी येथील भवानी नवरात्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवानिमित्त देवीची ज्योत आणण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यासाठी शनिवारी गावातील सुमारे २५ ते ३० युवक पिकअप व्हॅन आणि तीन ते चार मोटारसायकली घेऊन भक्तिभावाने तुळजापूरला गेले होते. देवीची☞(पान २ वर)

# पाय धुण्यासाठी गेलेल्या पती- पत्नीचा कालव्यात बुडून अंत!

**भंडारा /वृत्तसंस्था-** - नागपूरहून गावी आलेले पती-पत्नी शेत पाहण्याकरिता गेले असता पाय चिखलाने भरल्याने गोसेखुर्दच्या उजवा कालव्यात धुण्यासाठी उतरले असता पत्नीचा पाय घसरून कालव्यात पडली. तिला वाचविण्यासाठी पाठोपाठ पतीने उडी घेतली. यात दोघांचाही अंत झाल्याची घटना आज घडली.

उन्हाळ्यातच लग्न बंधनात बांधले गेलेल्या या दाम्पत्याचा अंत झाल्याने अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी असे म्हणण्याची वेळ आली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. माहितीनुसार, रविवारी कोरंबी येथील स्वप्नील अशोक बनकर(२९) व पत्नी प्रज्ञा बनकर(२५) हे कामासाठी नागपूर येथे राहत होते.

काही कामाच्या निमित्ताने दोन दिवसांपूर्वी ही दाम्पत्य पवनी तालुक्यातील कोरंबी येथे स्वगावी आले होते. वडिलोपार्जित शेत पाहण्यासाठी शेतीवर गेले असता पायाला चिखल लागल्याने दोघेही गोसेखुर्द उजव्या कालव्यात पाय धुण्यासाठी उतरले असता पाय घसरून पडले. यावेळी काळाने त्यांच्यावर☞(पान २ वर)

# इंडिगोच्या विमानात पॉवर बँकला आग!

### दिल्ली-चेन्नई विमानाचे हैदराबादमध्ये इमर्जन्सी लँडिंग; सर्व प्रवासी सुरक्षित

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** दिल्लीहून चेन्नईकडे जाणाऱ्या इंडिगो एअरलाइनच्या विमानात प्रवाशाच्या पॉवर बँकला आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विमानातील सामान ठेवण्याच्या कप्प्यातून धूर निघू लागल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव विमानाचे हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्व प्रवासी सुरक्षित आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, इंडिगोचे 6ई-६११५ हे विमान आज, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी दिल्लीहून चेन्नईकडे जात होते. विमानात एका प्रवाशाच्या बॅगमध्ये ☞(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ऐतिहासिक विहीर प्रशासनामुळे दुर्लक्षित?

## पाच गावांची तहान भागविणाऱ्या विहिरीचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी

### दुष्काळात जलस्त्रोतांच्या योग्य नियोजनाची गरज

**युवराज डोंगरे/खल्लारः-** दर्यापूर तालुक्यातील नांदरुन गावातील ७० वर्षे जुनी विहीर एकेकाळी नांदरुनसह परिसरातील पाच गावांतील नागरिकांची तहान भागविण्याचा महत्त्वपूर्ण जलस्त्रोत होती. मात्र आज या विहिरीकडे दुर्लक्ष होत असल्याने तिच्या दुरुस्तीचा आणि पुनरुज्जीवनाचा प्रयत्न गरजेचे आहे, अशी मागणी गावातील नागरिकांनी केली आहे.

सध्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे ग्रामिण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध पाणीसाठ्याचा योग्य वापर आणि जुन्या जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे अत्यंत आवश्यक आहे. विहीरीत पाणी उपलब्ध असतानाही त्याचा योग्य पद्धतीने वापर आणि नियोजन होत नसल्याने हा जलस्त्रोत असूनही त्याचा अपेक्षित लाभ नागरिकांना मिळत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. एकेकाळी पाच गावांची तहान भागविणाऱ्या या विहीरीची दुरुस्ती करून ती पुन्हा वापरात आणल्यास पाणीटंचाईच्या काळात मोठा दिलासा मिळू शकतो. नविन जलस्त्रोतांवर खर्च करण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या जलस्त्रोतांची देखभाल आणि पुनरुज्जीवन करण्याकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. दुष्काळाचे संकट उभे ठाकले असताना उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करण्यासाठी प्रशासनाने या विहीरीची पाहणी करावी, आवश्यक दुरुस्ती करून तिचे पुनरुज्जीवन करावे आणि पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे



या विहिरीच्या पाण्यासाठी अनेकदा प्रयत्न करण्यात आले. मात्र ग्रामपंचायतीने याकडे दुर्लक्ष केले. सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, ही विहीर पुनरुज्जीवित केल्यास पाच गावांचा पाणीप्रश्न सुटू शकतो. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन विहिरीचे पुनरुज्जीवन करावे.

**-अशोक रायबोले,** माजी उपसरपंच, नांदरुन

या विहिरीतील पाणी गोड असून पिण्यासाठी योग्य आहे. विहिरीचे पुनरुज्जीवन केल्यास नांदरुनसह चार ते पाच गावांची तहान भागू शकते. त्यामुळे शासनाने तातडीने दुरुस्ती करून हा जलस्त्रोत पुन्हा खुला करावा.

**-राजू काळे,** नागरिक

या विहीरीच्या पुनरुज्जीवनासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात आला आहे. सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, विहीरीच्या पुनरुज्जीवनासाठी पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**-विलास घाटे,** ग्रामपंचायत अधिकारी नांदरुन

# ऑप्टोजेनेटिक्स : नोबेल पारितोषिक



२०२६ चा वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्कार ऑप्टोजेनेटिक्सच्या पायाभूत संशोधनासाठी देण्यात आला आहे. ऑप्टो म्हणजे प्रकाश आणि जेनेटिक्स वापरून शास्त्रज्ञांनी एका उंदराला कंट्रोल करण्यात यश मिळवले आहे. मेंदूला ऑप्टिक फायबरच्या तारा जोडलेला हा उंदीर रिमोट कंट्रोल ने हवा तसा वळवता येतो.

ऑप्टोजेनेटिक्स नेमकं काय आहे ? ते पाहू ...

हा प्रयोग समजून घेण्यासाठी दोन गोष्टी समजून घ्याव्या लागतील. १) शारीरिक हालचाली मेंदू कसा कंट्रोल करतो ? २) मेंदूचा रिमोट प्रकाशाने कसा कंट्रोल केला ?

आपल्या मेंदूत अब्जावधी मज्जापेशी असतात. या पेशी विद्युत संकेतांच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधतात. आपण एखादी गोष्ट लक्षात ठेवतो, भीती अनुभवतो किंवा हाताची हालचाल करतो, तेव्हा मेंदूतील पेशींचे विशिष्ट समूह आणि त्यांच्यातील संपर्क कार्यरत असतात. म्हणजे मेंदूतील काही सर्किट ऑन आणि ऑफ केली की शारीरिक हालचालींवर नियंत्रण मिळवता येते.

दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर अधिक महत्वाचे ... ते म्हणजे - २) मेंदूचा रिमोट प्रकाशाने कसा कंट्रोल केला ?

या संशोधनाचा एक महत्त्वाचा धागा एका सूक्ष्म शेवाळाच्या अभ्यासातून मिळाला. या शेवाळाच्या पेशींमध्ये प्रकाशाला प्रतिसाद देणारं Channelrhodopsin नावाचं प्रथिन असतं. निळा प्रकाश पडल्यावर हे प्रथिन सक्रिय होतं आणि पेशीच्या आवरणातून विशिष्ट विद्युतभारित कणांना—म्हणजे आयनांना—जाण्यासाठी मार्ग उपलब्ध करून देतं. त्यामुळे पेशीच्या विद्युत स्थितीत बदल होतो. आणि हे एकपेशीय शेवाळ प्रकाशाच्या दिशेने सरकते.

शास्त्रज्ञांनी या प्रकाशाला प्रतिसाद देणाऱ्या शेवाळ्यातील प्रथिनाचा उपयोग मज्जापेशींमध्ये केला. जनुक शास्त्र (जेनेटिक्स) मधील काही तंत्रे वापरून एका पेशीतील विशिष्ट काम करणाऱ्या डीएनए चा तुकडा कापून दुसऱ्या पेशीत सोडता येतो. उंदराचा मेंदूतील मज्जा पेशींमध्ये हे प्रकाश प्रथिन तयार होईल अशी जनुकीय एडिटिंग केली गेली .

त्यामुळे प्रकाशाच्या मदतीने उंदराच्या मेंदूतील विशिष्ट भाग ऑन किंवा ऑफ करता येऊ लागले आणि त्यामुळे उंदराच्या हालचालींवर रिमोट कंट्रोल द्वारा नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले.

आता याचा उपयोग काय?

उदाहरणार्थ, मेंदूतील काही पेशी भीतीच्या प्रतिक्रियेशी संबंधित आहेत, असं दिसलं, तर त्या पेशी प्रकाशाने सक्रिय करून वर्तनात काय बदल होतो, हे तपासता येतं. त्यांची क्रिया कमी केल्यावर काय होतं, हेही पाहता येतं. अशा प्रयोगांतून मेंदूतील पेशींची भूमिका अधिक नेमकेपणाने समजते.

अर्थात, याचा अर्थ प्रकाश टाकून माणसाच्या मेंदूवर सहज नियंत्रण मिळवता येतं, असा नाही. या तंत्रासाठी पेशींमध्ये विशिष्ट प्रकाश-संवेदनशील प्रथिनं तयार करावी लागतात आणि प्रकाश योग्य ठिकाणी पोहोचवावा लागतो. सध्या याचा मुख्य उपयोग संशोधनात आहे; काही वैद्यकीय उपयोगांवरही अभ्यास सुरू आहे.

या संशोधनाचं महत्त्व असं की मेंदूतील पेशी काय करत आहेत, एवढंच निरीक्षण करण्याऐवजी त्यांच्या क्रियेत बदल करून त्याचा परिणाम तपासता येतो. त्यामुळे स्मृती, भावना, हालचाल आणि मेंदूशी संबंधित आजार यांचा अभ्यास करण्यासाठी शास्त्रज्ञांना नवं साधन मिळालं आहे.

विशेष म्हणजे, या तंत्राचा पाया मेंदूच्या अभ्यासात नव्हे, तर एका सूक्ष्म शेवाळाच्या पेशींमध्ये प्रकाशाला प्रतिसाद देणारी प्रथिनं कशी काम करतात, हे समजून घेण्यात होता. एखाद्या विज्ञान कथेत शोभावे असे हे संशोधन आहे.

**-डॉ. अभिराम दीक्षित**

# १ व १० वरील उर्वरित

## शिवाजी पार्कमधील सीजेपी

राष्ट्रपतींनी भेटल्यानंतर आता इंडिया आघाडीचे नेते सरन्यायाधीशांची घेणार भेट मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी विरोधी पक्ष आक्रमक झाले आहेत. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. आता इंडिया आघाडीचे नेते सोमवारी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांची भेट घेणार आहेत. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शनिवारी याबद्दल ट्विट करत माहिती दिली होती. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

## आंदोलन होणारच, नरेंद्र मोदींची

आजी वारली आहे म्हणून मी दिल्लीहून मुंबईत आलो आहे. प्रत्येकाला रस्त्यावर उतरावं लागणार आहे. कारण नरेंद्र मोदी म्हणजे हुकूमशाह आहेत, नरेंद्र मोदी यांची हुकूमशाही संपवावी लागणार आहे. कारण आपण पाहिलं एका ज्ञानेश कुमारला वाचवण्यासाठी संपूर्ण दिल्ली बंद केली.

रस्ते बंद केल्या, मेट्रो बंद केल्या, सगळं बंद करून टाकलं. ७०-८० वर्षांच्या इतिहासात असं घडलं नाही. आम्हाला विमानातून ताब्यात घेण्यात आलं, अटक करण्यात आली. आम्ही काय दहशतवादी होतो का? नरेंद्र मोदींना अदाणींना देश विकला आहे, आता जर आंदोलन केलं नाही तर संपूर्ण देश विकून खाईल हा माणूस. अशी टीका अभिजीत दिपकेंनी केली आहे.

## पेट्रोल, डिझेलच्या दरात मोठी वाढ ?

वाढ करण्यात आली आहे. तर डिझेलचे रेट प्रति लिटर ३ रुपयांनी वाढवण्यात आले आहेत. तात्काळ प्रभावाने हे दर लागू करण्यात आले आहेत. नव्या दरानुसार आता पेट्रोलचे दर प्रति लिटर १०८.५४ रुपयांवर पोहोचले आहेत तर डिझेलचे दर ९९.१९ रुपयांवर पोहोचले आहेत. हे पेट्रोल, डिझेलचे सर्वसामान्य दर आहेत. प्रत्येक राज्यांमध्ये ते वेगवेगळे असू शकतात.

## राधाकृष्ण विखे-पाटील यांनी

त्यांची समिती काहीही काम करत नाहीत, असे आरोपही करण्यात आले. कोंढरे म्हणाले, 'मराठा आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये अनेक मंत्री आहेत. काही खात्यांचे सचिव आणि अधिकारी आहेत. मात्र, या समितीची आढावा बैठक अर्धा तासही होत नाही. अधिकारी काहीतरी सादरीकरण करतात.

त्याच आधारे निर्णय होतात. या निर्णयांचे पुढे काहीही होत नाही. या समितीने मराठा आरक्षणावर ८० टक्के काम आणि इतर योजनांवर २० टक्के काम केले पाहिजे. त्याऐवजी कुणबी प्रमाणपत्र एवढाच विषय समितीने हाती घेतला आहे. त्यातही त्यांना शंभर टक्के यश मिळाले नाही.'

## भारताच्या अंतर्गत बाबींत

कारवाईवरही बोलले जात नाही. असा पक्षपाती दृष्टिकोन 'ओएचसीएचआर'ची विश्वासार्हता कमी करतो, असेही परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

'ओएचसीएचआर'ने व्यक्त केली होती चिंता

संयुक्त राष्ट्र मानवाधिकार कार्यालयाने शनिवारी दिल्लीतील निदर्शनांवेळी लोकांना मोठ्या संख्येने ताब्यात घेतल्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. भारतीय अधिकाऱ्यांनी शांततापूर्ण मार्गाने एकत्र येण्याच्या अधिकाराचा आदर करून ठोस कारणांशिवाय ताब्यात घेतलेल्यांना तत्काळ मुक्त करावे, असे आवाहन त्यांनी केले होते.

## संविधान दाखवून संस्था उद्ध्वस्त

करायची, ट्रोल करायचं असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी हे वक्तव्य केलं आहे.

## मतचोरी, एसआयआरविरोधात

आवाहन राहुल गांधी यांनी केले.

सरन्यायाधीशांना निवेदन देणार

सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढल्यानंतर सरन्यायाधीशांना देशाच्या वतीने निवेदन देणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. या निवेदनातून मतदार याद्यांमधील कथित गैरप्रकार रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात, एसआयआर प्रक्रिया थांबवावी, ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्यात यावं या मागण्या करण्यात येणार आहे.

आंदोलनातील कारवाईवरूनही पोलिसांवर टीका

शनिवारी दिल्लीत आंदोलनाच्या वेळी पोलिसांनी केलेल्या कारवाईवरूनही राहुल गांधी यांनी टीका केली. शांततेत आंदोलन करण्यासाठी तरुण रस्त्यावर उतरले असताना त्यांना मारहाण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

## नवरात्रीची ज्योत आणताना

ज्योत आणण्याचा उत्साह, नवरात्रोत्सवाची लगबग आणि गावात परतल्यानंतर होणाऱ्या स्वागताची ओढ अशा वातावरणात त्यांचा प्रवास सुरू होता. मात्र, या आनंदमय प्रवासावर काळाने घाला घातला.

तुळजापूर येथून देवीची ज्योत घेऊन परतत असताना मध्यरात्रीच्या सुमारास तुळजापूर-धाराशिव मार्गावर संभाजी कदम आणि राजेश कदम प्रवास करत असलेली दुचाकी घसरली. त्याचवेळी पाठीमागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिली. या भीषण अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

## पाय धुण्यासाठी गेलेल्या पती-

घाला घातला.

कालव्यात ४ मीटरच्या वर पाणी असून खळखळणारा प्रवाह असल्याने ही दोघेही वाहून गेले. दरम्यान दोघांचेही प्रेत वाहून जातांना बघ्यांना दिसल्याने मृत्यू पावल्याचे सांगण्यात येत असून प्रेतांचे शोध कार्य सुरू आहे.

सदर घटना अत्यंत दुर्दैवी असून समाजमन सुन्न करणारी आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रेतांचा शोध घेणे सुरू आहे. कालव्यात पाण्याची मात्रा जास्त व अंधार असल्याने शोध कार्यात अडथळे येत असले तरी पोलीस प्रशासन शोधकार्यात विशेष लक्ष देऊन युद्ध स्तरावर कार्य सुरु आहे.

## इंडिगोच्या विमानात पॉवर

ठेवलेल्या पॉवर बँकमधून अचानक धूर निघू लागल्याने विमानात एकच गोंधळ उडाला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन केबिन क्रूने तातडीने अग्निशामक यंत्राचा वापर केला आणि आग नियंत्रणात आणली. दरम्यान, या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला आहे, ज्या काही प्रवासी आग विझवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत आहेत.

## नवी बुलेट घेऊन गावी परतताना

अनूप वाकडे यांनी सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती, मात्र पोलिसांनी तात्काळ परिस्थिती हाताळत वाहतूक सुरळीत केली.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले आहेत. या प्रकरणी खोलापूर पोलीस पुढील तपास करत असून पसार झालेल्या ट्रक चालकाचा शोध घेतला जात आहे.

## शेखर भोयर, संगीता शिंदे, पवार

त्यांचे प्राथमिक सदस्यत्व संपुष्टात आणून सहा वर्षासाठी निष्कासित करण्यात आले आहे. या बाबत भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष आमदार प्रताप अडसड यांनी नोटीसद्वारे संबंधितांना कळविले आहे.

या निष्कासनानंतर हे कार्यकर्ते आणि पदाधिकारी ते आज ज्या पदावर आहेत त्या पदावरील नियुक्ती आपोआप खारीज झाली असल्याचे भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार अडसड यांनी सांगितले.

## महर्षी पब्लिक स्कूलमधील

झाला. कुटुंबीयांनी राजेशचा मृतदेह गावी आणून कारजखेडा येथील शेतात अंत्यसंस्कार केले. राजेशच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट व्हावे, यासाठी पोलिसांनी पुरलेला मृतदेह बाहेर काढला.

घटनास्थळीच पंचनामा करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. सुरुवातीला या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, पुढील तपास, उपलब्ध कागदपत्रे आणि चौकशी अहवालाच्या आधारे विद्यार्थ्यांना दिलेल्या भोजनातून विषबाधा झाल्याचे समोर आल्याचे पोलिसांनी नमूद केले. शालेय प्रशासनाच्या कथित निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आणि त्यातून राजेशचा मृत्यू झाल्याचा निष्कर्ष तपासात काढण्यात आल्याचे सांगण्यात आले.

यानंतर निवासी शाळेतील चार महिला कर्मचाऱ्यांविरुद्ध निष्काळजीपणाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

**संस्था चालकांवरही गुन्हा दाखल करा-**

दरम्यान, राजेशच्या मृत्यूप्रकरणी संबंधित संस्था चालकांवरही गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्याचे वडील बाबू बेठेकर यांनी केली होती. मुलाच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या व्यक्तींवर योग्य कारवाई होत नसल्याचा आरोप करीत त्यांनी चिखलदरा पोलीस ठाण्याबाहेर बसून रात्रभर आंदोलन केले.

संबंधितांवर फौजदारी कारवाई करून जबाबदारी निश्चित करावी, अशी त्यांची मागणी होती. त्यानंतर चार महिला कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, संस्था चालकांच्या भूमिकेबाबत पुढे काय कारवाई होते, याकडे आता लक्ष लागले आहे.

## अप्पर वर्धा प्रकल्पाचे मौल्यवान

तर मार्गावरील आणि शेवटच्या टोकाकडील शेतकऱ्यांच्या विहिरींची पाणीपातळी वाढण्यास मदत होईल. मात्र, सध्याच्या अनियंत्रित उपशामुळे आणि यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे हे मौल्यवान जलसाठे विनाकारण वाया जात आहेत.

**प्रशासनासह विभागाचे दुर्लक्ष-**

धरणातून पाणी सोडताना पाण्याचे योग्य नियोजन करणे आणि कालव्यांची सुरक्षा व गळती रोखणे प्रशासनासह सिंचन विभागाची जबाबदारी आहे.

मात्र, या प्रकारावर प्रशासकीय वचक नसल्यामुळे पाण्याची उघडपणे नासाडी होत आहे. स्थानिक शेतकरी व नागरिकांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून सिंचन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना जाणीव करून देण्याची आणि दोषींवर योग्य कारवाई करण्याची मागणी केली आहे. जेणेकरून हे पाणी खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचू शकेल.

## विवाहाचे आमिष दाखवून

संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप आहे. ५ ऑक्टोबर रोजी खामगाव येथील एका महिलेच्या मोबाईल क्रमांकावरून युवतीला संदेश आला. त्यामध्ये आरोपीविरुद्ध पोलिसांत तक्रार करू नये, तसेच संबंधित महिलेचे आरोपीसोबत गेल्या तीन वर्षांपासून संबंध असल्याचे नमूद करण्यात आले होते. या संदेशाबाबत युवतीने आरोपीकडे विचारणा केली असता, त्याने तिला शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. आरोपीने आपल्याकडे दोघांचे खासगी अश्लील व्हिडीओ असल्याचे सांगून, अधिक बोलल्यास ते प्रसारित करण्याची धमकी दिल्याचे युवतीने तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर आरोपीने दुसऱ्या मोबाईलवरून त्यांचे खासगी व्हिडीओ दाखविल्याचा आणि या व्हिडीओंचा आधार घेत युवतीचे शारीरिक शोषण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे.

## अमरावतीत नवरात्रोत्सवाचा चैतन्यमय

तर काही ठिकाणी भव्य मिरवणुका काढून जय माता दी च्या जयघोषात परिसर दुमदुमून सोडला.

नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी अमरावती नगरी सजली असून बाजारपेठांमध्येही नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. देवीच्या स्वागतासाठी तरुणवर्ग तसेच महिला आणि बालकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. घटस्थापनेसह उपवास, दांडिया-गरबा आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण अमरावती जिल्हा देवीच्या भक्तीत तल्लीन झाला आहे.

## मिर्झा पार्कमधील घरात १४

निरीक्षकांच्या आदेशानुसार परिसरात गस्त घालत होते. त्याचवेळी मिर्झा पार्क येथील एका घरात अवैधरीत्या जनावरे डांबून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंच आणि महापालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना सोबत घेऊन संबंधित ठिकाणी छापा टाकला.

छाप्यादरम्यान घरातील दोन खोल्यांमध्ये १४ लहान-मोठी गोवंश जनावरे कोंबून ठेवल्याचे आढळले. जनावरांना अन्न-पाणी न देता आणि क्रूर वागणूक देऊन कोंडून ठेवल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

या जनावरांची अंदाजे किंमत २ लाख ८० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी शेख सुफियान शेख नदीम याच्याविरुद्ध प्राणी छळ प्रतिबंधक कायद्याच्या कलम ११(१)(ई) आणि ११(१)(एच) अन्वये कारवाई करण्यात आली. ताब्यात घेतलेली जनावरे महापालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. नीलेश सोळंके यांच्या ताब्यात देण्यात आली. त्यानंतर ही जनावरे दस्तूरनगर येथील गोरक्षणात ठेवण्यासाठी पाठविण्यात आली. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर, पोलीस उपनिरीक्षक गजानन लोकडे, पोलीस उपनिरीक्षक सागर किटे, सहायक पोलीस उपनिरीक्षक रमेश निंबोरकर, पोलीस हवालदार रवींद्र भटकर तसेच पोलीस कर्मचारी रुपेश काळे, रंजीत नाकट आणि अमोल नकाशे यांनी ही कारवाई केली.

## ८० किलो गांजा तस्करीचे धागेदोरे

अमली पदार्थविरोधी पथकाने सुरू ठेवला होता. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ओडिशातील जोसेफ कंदपाल याची या प्रकरणात आरोपी म्हणून ओळख पटविण्यात आली. त्यानंतर पथकाने दुर्गम आणि घनदाट जंगल परिसरात पोहोचून ९ ऑक्टोबर रोजी त्याला ताब्यात घेतले आणि अटक केली. ओडिशातील मलकानगिरी येथील न्यायालयात हजर केल्यानंतर आरोपीला अमरावतीला आणण्यासाठी संक्रमण कोठडी वॉरंट प्राप्त करण्यात आले.

त्यानंतर ११ ऑक्टोबर रोजी अमरावती न्यायालयातून त्याची १४ ऑक्टोबरपर्यंत तीन दिवसांची पोलीस कोठडी घेण्यात आली. गांजाचा स्त्रोत, पुरवठा साखळी आणि या तस्करीत आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास केला जात आहे.

ही कारवाई अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सचे पोलीस अधीक्षक अजित टिके आणि अमरावतीचे पोलीस उपअधीक्षक गजानन विखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक पूनम जगताप, सहायक उपनिरीक्षक विनय मोहोड, हवालदार शैलेंद्र अर्डक, हवालदार सुमेध पोहेकर आणि पोलीस शिपाई शिवराज पवार यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

## बेलोरा शिवारातून २० स्प्रिंकलर

ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल नितीन डोंगरे,सलामे, कोपचे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे.

## अंबादेवी, एकवीरा मंदिरात

देवीच्या दर्शनासाठी शहरासह जिल्ह्याच्या विविध भागांतून भाविक येतात. दर्शनासाठी होणाऱ्या गर्दीत लहान मुले किंवा वृद्ध व्यक्ती कुटुंबीयांपासून दूर जाण्याची शक्यता असते. त्यामुळे भाविकांनी मंदिर परिसरात विशेष खबरदारी घेण्याची गरज आहे.

दर्शनासाठी येताना शक्यतो मौल्यवान दागिने घालू नयेत आणि मोठी रोख रक्कम सोबत बाळगू नये. मोबाईल चोरीला जाणार नाही किंवा हरवणार नाही, याची दक्षता घ्यावी. गर्दीत लहान मुलांचा हात सोडू नये, तसेच वृद्ध व्यक्तींसोबत जबाबदार व्यक्तीने राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

मुलांच्या खिशात संपर्क क्रमांकाची चिठ्ठी ठेवा-

लहान मुले आणि वृद्ध व्यक्ती गर्दीत हरविल्यास त्यांना त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविणे सोपे व्हावे, यासाठी पालकांनी किंवा नातेवाइकांनी त्यांच्या खिशात जबाबदार व्यक्तीचा मोबाईल क्रमांक लिहिलेली चिठ्ठी सुरक्षितपणे ठेवावी. गर्दीच्या ठिकाणी ही खबरदारी महत्त्वाची ठरू शकते.

मंदिर परिसरात एखादी व्यक्ती हरविल्याचे निदर्शनास आल्यास किंवा कोणतीही मौल्यवान वस्तू आढळल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा. आढळलेली वस्तू स्वतःकडे न ठेवता पोलिसांच्या ताब्यात द्यावी. तसेच बंदोबस्तावरील पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे. या सूचना भाविकांच्या सुरक्षिततेसाठी असून, सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक विजया पंधरे यांनी केले आहे.

## मेळघाटला नवीन रुग्णवाहिका!

अपुऱ्या सुविधा आणि रुग्णवाहिकांची गरज बच्चू कडू यांनी संघर्ष यात्रेदरम्यान प्रत्यक्ष अनुभवली. या प्रश्नांवर आरोग्यमंत्री प्रा. प्रकाश आबिटकर यांच्याकडे पत्रव्यवहार तसेच मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करण्यात आला. आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी डॉक्टरांची रिक्त पदे भरणे, रुग्णालयांचा दर्जा सुधारणे आणि बालमृत्यू रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या मागण्याही त्यांनी मांडल्या. मेळघाटातील आरोग्यविषयक प्रश्न मार्गी लावण्यासाठी बच्चू कडू यांनी मंत्रालयीन स्तरावरही सातत्याने पाठपुरावा केला. ३१ मे २०२६ रोजी आरोग्यमंत्री प्रा. प्रकाश आबिटकर यांना पत्र देऊन मेळघाट आणि अमरावती जिल्ह्यातील आरोग्य प्रश्नांवर बैठक घेण्याची मागणी केली होती. तसेच ७ मार्च २०२६ रोजी झालेल्या आढावा बैठकीतही संबंधित प्रश्नांवर चर्चा झाली. संघर्ष यात्रेदरम्यान दिलेल्या आश्वासनांचा पाठपुरावा, शासनस्तरावरील चर्चा आणि पत्रव्यवहार यांच्या माध्यमातून मेळघाटातील आरोग्य प्रश्नांकडे सातत्याने लक्ष वेधण्यात आले. नवीन रुग्णवाहिका उपलब्ध होणे हा या प्रयत्नांमधील महत्त्वाचा टप्पा असून, उर्वरित आरोग्यविषयक मागण्यांचीही प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

## नवरात्र उत्सवासाठी दर्यापूर शहरात

ठाणेदार रामकृष्ण सोनोनेंच्या मार्गदर्शनाखाली दर्यापूर पोलीस प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने तयारी केली आहे. शहरातील शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क असून, उत्सव काळात नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नवरात्री उत्सव साजरा करताना नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, तसेच सार्वजनिक ठिकाणी शिस्त व शांतता राखावी. उत्सवाच्या आनंदाला गालबोट लागू नये, यासाठी नागरिकांनी सुरक्षेच्या नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. एकूणच, भक्तीमय वातावरणात नवरात्री उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी दर्यापूर पोलीस प्रशासन सज्ज झाले असून, नागरिकांच्या सहकार्याने उत्सव निर्विघ्नपणे पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, १२ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## दुष्काळी पीक नुकसानीची केंद्रीय पथकाकडून पाहणी

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यात दुष्काळामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर ९ ऑक्टोबर रोजी केंद्रीय पथकाने कुपटा येथे प्रत्यक्ष शेतावर जाऊन पीकनुकसानीची पाहणी केली. कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील ११ सदस्यीय पथकाने बांधावर जाऊन पिकांची स्थिती जाणून घेत वस्तुनिष्ठ मूल्यांकन केले.

यावेळी पथकाने शेतातील पिकांची सद्यस्थिती, दुष्काळाचा खरीप हंगामावर झालेला परिणाम आणि शेतीपिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांकडून पीकनुकसानीबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली.



दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त शेतीचे वास्तव जाणून घेण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरला.

या पाहणीवेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, तालुका कृषी अधिकारी रोशन भागवत, तहसीलदार राजेंद्र पाटील, गटविकास अधिकारी ज्योती राजपुरोहित, मंडळ अधिकारी अंभोरे यांच्यासह शेतकरी पंकज वाळके, राजू अंबुलकर, योगेश हळदे, मुकेश घोडे, अनिल नागोलकर, अब्दुल बशीर शेख, मंथन मासोतकार आणि श्रीपाद देशमुख उपस्थित होते. केंद्रीय पथकाच्या या प्रत्यक्ष पाहणीमुळे मानोरा तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पीकनुकसानीचे वास्तव समोर येण्यास मदत होणार असून, या पाहणीनंतर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीबाबत काय निर्णय होतो, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## गोगरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्ती सुधार योजनेच्या कामांवर प्रश्नचिन्ह !

■ प्रतिनिधी | शेजुबाजार ■

मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी ग्रामपंचायतीअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्ती सुधार योजनेतून मंजूर झालेल्या सिमेंट काँक्रिट रस्त्यांच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप समोर आला आहे. सुमारे १२ लाख रुपये खर्चाच्या दोन कामांबाबत प्रश्न उपस्थित करत गोगरी येथील नागरिक महादेव रामभाऊ टोंचर यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

### सात लाखांच्या कामात खडीकरणच झाले नसल्याचा आरोप

तक्रारीनुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्ती सुधार योजनेअंतर्गत गोगरी येथे दोन सिमेंट काँक्रिट रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. यापैकी अंदाजे सात लाख रुपये खर्चाच्या कामात मंजूर अंदाजपत्रकानुसार खडीकरण करून त्यावर रोलर चालविणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात हे काम झाले नसल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. कामातील प्रत्यक्ष स्थिती आणि अंदाजपत्रकातील तरतुदी यांची तुलना केल्यास कामाच्या दर्जाबाबत तसेच वापरलेल्या साहित्याच्या प्रमाणाबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे संबंधित विभागाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.पाच लाखांचे काम ओबीसी वस्तीत केल्याचा दावा या प्रकरणातील दुसरा गंभीर मुद्दा म्हणजे, अंदाजे पाच लाख रुपये खर्चाचे मंजूर काम अनुसूचित जातीच्या वस्तीऐवजी ओबीसी वस्तीत करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्ती सुधार योजनेचा निधी मंजूर उद्देशानुसारच खर्च झाला आहे का, तसेच कामाचे ठिकाण प्रशासकीय मान्यता व मंजूर आराखड्याशी सुसंगत आहे का, याची तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

मात्र, या आरोपांची अधिकृत चौकशी झालेली नसल्याने निधीचा गैरवापर किंवा अपहार झाल्याचा निष्कर्ष सध्या काढता येणार नाही. संबंधित कागदपत्रे आणि प्रत्यक्ष पाहणीच्या आधारेच या प्रकरणातील सत्यता स्पष्ट होऊ शकते. तांत्रिक अधिकाऱ्यांकडून स्थळ पाहणी करण्याची मागणी

महादेव टोंचर यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीत दोन्ही रस्त्यांची तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा



करण्याची मागणी केली आहे. तसेच कामांचे मंजूर अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यता, मोजमाप पुस्तिका (एमबी), कामाची गुणवत्ता, प्रत्यक्ष वापरलेले साहित्य आणि संबंधित बिले व देयकांची तपासणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

चौकशीत काम निकृष्ट दर्जाचे, अपूर्ण किंवा मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदींशी विसंगत असल्याचे आढळल्यास संबंधित जबाबदार अधिकारी, पदाधिकारी आणि कंत्राटदार यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. या तक्रारीच्या प्रती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम आणि जिल्हा समाजकल्याण अधिकारी, वाशिम यांनाही देण्यात आल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे.

### दलित वस्तीच्या विकास निधीच्या विनियोगाची तपासणी होणार का?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्ती सुधार योजना ही वस्तीच्या विकासाशी संबंधित असल्याने या योजनेतील निधीचा विनियोग मंजूर उद्देशानुसार झाला आहे का, याची पडताळणी होणे महत्त्वाचे आहे. गोगरी येथील दोन्ही रस्त्यांच्या कामांची निष्पक्ष तांत्रिक चौकशी करून प्रत्यक्ष काम आणि शासकीय अभिलेख यांची तुलना केल्यास आरोपांमधील सत्यता समोर येऊ शकते. आता पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि समाजकल्याण विभाग या तक्रारीची दखल घेऊन काय कार्यवाही करतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## तरुणाईच्या ऊर्जेला समाजसेवेसाठी वाहून घेण्याचा संकल्प दिवस -प्रा.डॉ.तायडे



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

स्थानिक श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरूळपीर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव डॉ.अश्विन नाईक, डॉ.वर्षाताई नाईक तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एम.वडगुले यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रासेयोचे आराध्य दैवत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एम.वडगुले होते. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी तथा क्षेत्रीय समन्वयक प्रा. प्रमोद तायडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रनिर्माणातील स्वयंसेवकांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.'राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस हा केवळ स्थापना दिवस नसून तरुणाईच्या ऊर्जेला समाजसेवा, राष्ट्रसेवा आणि सामाजिक परिवर्तनासाठी संकल्प दिवस आहे.

### दुष्काळाच्या छायेत शेतकरी संकटात

## दांडियाच्या झगमगाटापेक्षा तहानलेल्या जीवांना मदतीचा हात द्या : मयुर राऊत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील शेतकरी सध्या पाणीटंचाई, शेतीतील अडचणी आणि चाऱ्याच्या प्रश्नामुळे संकटाचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत नवरात्रोत्सवाच्या काळात दांडिया-गरब्याच्या झगमगाटासोबत सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवावी. उत्सवावरील अनावश्यक खर्चाला आळा घालून तहानलेल्या नागरिकांना, गरजू कुटुंबांना आणि मुक्या जनावरांना मदतीचा हात द्यावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते मयुर गणेशराव राऊत यांनी केले आहे.



नवरात्रोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेचा उत्सव आहे. त्यामुळे उत्सवाचा आनंद उत्साहात साजरा करताना समाजातील दुर्बल व गरजू घटकांच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष होता कामा नये. दांडिया, गरबा आणि विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर होणाऱ्या अनावश्यक खर्चातील काही भाग सामाजिक उपक्रमांसाठी वापरल्यास त्याचा थेट फायदा गरजू नागरिकांना होऊ शकतो, असे राऊत यांनी म्हटले आहे.

पावसाअभावी शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असून शेतकरी आर्थिक अडचणींना सामोरे जात आहेत. पशुपालकांसमोरही जनावरांसाठी पाणी व चाऱ्याची व्यवस्था करण्याचे आव्हान आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवाच्या काळात सामाजिक संवेदनशीलता जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नवरात्रोत्सव मंडळांनी दांडिया-गरबा कार्यक्रमांसोबत पाणीवाटप, अन्नदान, चारा वाटप, रक्तदान, वृक्षारोपण आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप यांसारखे समाजोपयोगी उपक्रम राबवावेत.

## आ. खोडे यांनी घेतलेल्या पांदण रस्ता खुले करण्याच्या आदेशाला प्रशासनाकडून केराची टोपली

### वयोवृद्ध महिला शेतकऱ्याची व्यथा

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील चैतन्य कानिफनाथ महाराजांचे जागृत देवस्थान असणाऱ्या खापरी (कान्होबा) येथील अति जेष्ठ ७९ वर्षाच्या महिला शेतकऱ्याच्या शेतशिवारात जाण्यासाठी असलेला पुरातन पांदण रस्ता गैरअर्जदार शेतकऱ्याने मुजोरीने अडविलेला असून, हा रस्ता खुला करून मिळावा यासाठी या वयोवृद्धेला महसूल व पोलीस या प्रशासकीय कार्यालयांच्या पायऱ्या दुष्काळी परिस्थितीत झिजविण्याची वेळ आली आहे.

या मतदारसंघाचे आमदार श्याम भाऊ खोडे यांनी गत महिन्यातच जिल्हा प्रशासनाची बैठक बोलावून छत्रपती शिवाजी महाराज बळीराजा पांदण रस्त्याची कामे प्राधान्याने करण्यासाठी आदेश दिले होते. मात्र त्यांच्याच मतदारसंघात त्यांच्या आदेशाला



प्रशासनाकडून वाकुल्या दाखविल्या जात असल्याचे या घटनेवरून उघड होत आहे.

### काय आहे प्रकरण ?

मौजे खापरी (कान्होबा) ता. मंगरूळपीर येथील रहिवासी शांताबाई रामधन जाधव (वय ७९) या वयोवृद्ध महिला शेतकरी आहेत. त्यांच्या शेतात जाण्यासाठी सावरगाव - कळंबा पांदण रस्ता हा पुरातन काळापासूनचा एकमेव रस्ता आहे. हाच रस्ता गावातील गैरअर्जदार रामहरी राठोड यांनी अडवून टाकला आहे.पीडित शांताबाई यांनी याबाबत दि. २०/०५/२०२६ रोजी तहसीलदार, मं.पीर यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. त्यानंतर एक वेळा मोजणी व महसूल कर्मचाऱ्यांमार्फत पाहणी झाली, परंतु पुढे काहीही कारवाई झाली नाही. आता खरीप हंगामातील ऐन सोयाबीन घरी आणण्याच्या तोंडावर गैरअर्जदाराने पुन्हा रस्ता अडवून टाकला असून कोणत्याही कास्तकारास जाऊ देत नाही. त्यामुळे शेतातील पीक खराब होण्याची वेळ आली आहे. या वयात शेतमाल डोक्यावर आणण्यासाठी व बैलजोडी नेण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागत असल्याचे शांताबाई यांनी निवेदनात म्हटले आहे.

### महसूल प्रशासनाला द्यावे लागत आहे स्मरणपत्र

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये पांदण रस्त्याची मोजणी करून सावरगांव-कळंबा पांदण रस्ता तात्काळ मोकळा करून मिळावा. मला शेतात जाण्यास मज्जाव करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या गैरअर्जदार रामहरी राठोड यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी.

## दिव्यांग बांधवांनी आज उपस्थित राहावे!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हा काँग्रेस दिव्यांग विभागातर्फे मानोरा तहसीलदार यांना निवेदन देण्यात येणार आहे. तरी आज सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयावर दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तहसीलदार यांना देण्यात येणाऱ्या निवेदनातून दिव्यांग मानधनात वाढ करण्यात यावी, ५ टक्के निधीचा लाभ तात्काळ मिळावा, घरकुल योजनेत प्राधान्य मिळावे, एस.टी. बसमध्ये मोफत प्रवास व सवलती मिळाव्यात व रोजगारात आरक्षण मिळावे अशी मागणी करण्यात येणार आहे. तरी तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी आपले प्रश्न मांडण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे जाहीर आवाहन जिल्हा काँग्रेस दिव्यांग विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा. जय चव्हाण यांनी केले आहे.

## रस्त्याच्या मधोमध गाडी लावून दादागिरी !

### हटकले म्हणून ऑटो चालकावर प्राणघातक हल्ला; रिसोड पोलिसात तक्रार दाखल

■ प्रतिनिधी | रिसोड ■

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ऑटो चालकाला शिवीगाळ करून प्राणघातक हल्ला केल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी साईलीला ऑटो युनियन, रिसोडच्या वतीने रिसोड पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करून कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

साईलीला ऑटो युनियनने दिलेल्या तक्रारीनुसार, दि.८ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:३० वाजता नेहमीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज चौकात ऑटो लावले असताना, प्रभाकर नथ्थूजी इंगळे यांनी आपली दुचाकी रस्त्याच्या मधोमध उभी केली होती. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होत असल्याने युनियनच्या सदस्य अरुण फुके यांनी ती



### CCTV फुटेज तपासा, न्याय द्या..!

ही संपूर्ण घटना पोलीस स्टेशनकडून बगडिया यांच्या घरावर लावण्यात आलेल्या ण्ण्ऊ्न कॅमेऱ्यात कैद झाली आहे. त्यामुळे ते फुटेज तपासून संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करून साईलीला ऑटो युनियनच्या सदस्यांना न्याय द्यावा, अशी मागणी साईलिला ऑटो युनियन अध्यक्ष राहुल जुमडे यांनी ठाणेदार साहेब, रिसोड यांच्याकडे केली आहे. या घटनेमुळे रिसोडमधील ऑटो चालकांमध्ये संतापाचे वातावरण असून, शहरातील वाढत्या दादागिरीला आळा घालण्याची मागणी होत आहे.

दुचाकी रस्त्याच्या कडेला लावली.

या कारणावरून प्रभाकर इंगळे यांनी शिवीगाळ केली. त्यानंतर सुमारे २० मिनिटांनी प्रभाकर इंगळे व त्यांची दोन मुले यांनी कोणतेही कारण नसताना अरुण फुके या ऑटो चालकावर अचानक प्राणघातक हल्ला केला, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

यावेळी तक्रार कर्ते साईलिला ऑटो युनियन अध्यक्ष राहुल जुमडे,भारत मोठे,अरुण फुके,लक्ष्मण फुके,भगवान तेलंगे,रमेश पवार,सुरेश पवार, विठ्ठल दवंड, दीपक दालवे, कतोशीप,भीमराव शिरसाठ,अशोक खंदारे, आदी युनियन सदस्य पदाधिकारी उपस्थित होते.

## नांदेड येथील आपुलकी ट्रस्टचा साहित्य पुरस्कार जाहीर




■ प्रतिनिधी | वाशिम ■

आपुलकी चॅरिटेबल ट्रस्ट, नांदेडच्या वतीने देण्यात येणारा मानाचा ङ'अनुसया राघोजी जाधव स्मृती साहित्य पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. या वर्षी पुरस्कारासाठी कविता, कथा/ललित, कादंबरी, वैचारिक/समीक्षा, चरित्र/आत्मचरित्र या पाच वाङ्मय प्रकारात एकूण ११४ साहित्यकृती प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी ८८ कृती परीक्षणासाठी पात्र ठरल्या. जेष्ठ साहित्यिक प्रा. वासुदेव मुलाटे, डॉ. केशव देशमुख, डॉ. माधव पुटवाड, डॉ. कमलाकर चव्हाण, डॉ. रामचंद्र काळुंके आणि प्रा. डॉ. व्यंकटी पावडे या मान्यवर परीक्षकांनी दोन टप्प्यात मूल्यमापन केले. या मूल्यमापनात सुप्रसिद्ध लेखक ङमा. रंगनाथ पिराजी धांडेङ यांच्या ङ'झोलांड'ङ या कादंबरीची ङ'विशेष सन्मान - कादंबरी'ङ या वर्गवारीत निवड करण्यात आली आहे. त्यांना रु. २००० रोख, मानपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.मुख्य पुरस्कार (रु. ५०००) चरित्र/आत्मचरित्र गटात शमा भाटे यांच्या 'नृत्यमय जग... नर्तनाचा धर्म' आणि वैचारिक गटात डॉ. अर्चना घोडके यांच्या 'महात्मा जोतीराव फुले: स्त्रीविषयक भूमिका' या ग्रंथांना जाहीर झाला आहे. तर विशेष सन्मानामध्ये कविता गटात नारायण शिंदे यांचा 'लुटीचा ताळेबंद' आणि कथा गटात रमेश बोराडे यांच्या 'चक्रव्यूह' या कृतींचा समावेश आहे.

## नाकाबंदीत दोघांकडे कोयता ; दुकानातून ६२ कोयते जप्त !

### अकोल्यातील लोहा बाजारातील प्रिन्स हार्डवेअरवर पोलिसांची कारवाई ; तिघांविरुद्ध शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात सुरू असलेल्या नाकाबंदीदरम्यान विना नंबरप्लेट दुचाकीवरून कोयता घेऊन जाणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे शालिनी टॉकीजसमोरील लोहा बाजारातील प्रिन्स हार्डवेअर दुकानाची झडती घेतली असता, तेथून आणखी ६२ कोयते जप्त करण्यात आले. या कारवाईत एकूण ६३ कोयते आणि दुचाकीसह ६२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दुकानमालकासह तिघांविरुद्ध सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या निर्देशानुसार, अपघात नियंत्रण, वाहतूक नियमांची अंमलबजावणी आणि अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी शनिवारी (१० ऑक्टोबर) सायंकाळी सहा वाजल्यापासून शहरात नाकाबंदी सुरू होती. रात्री आठच्या सुमारास सरकारी बगीचासमोर शहर वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी भूषण सोळंके आणि अश्विन चव्हाण कर्तव्यावर असताना, विना नंबरप्लेट सुझुकी ॲक्सेस मोपेडवरून दोघे येताना दिसले. पोलिसांनी



त्यांना थांबवून चौकशी केली असता, ते घाबरल्याने वाहनाची तपासणी करण्यात आली. डिक्कीत ४२ सेंटीमीटर लांबीचा लोखंडी कोयता आढळून आला.

### कोयत्याच्या माहितीवरून दुकानाची झडती

मुजम्मील खान युनूस खान (२३, रा. सोनटक्के प्लॉट, जुने शहर) आणि सैय्यद फिरोज सैय्यद जानी (२६, रा. नेहरूनगर, खैर मोहम्मद प्लॉट) अशी ताब्यात घेतलेल्या दोघांची नावे आहेत. संबंधित कोयता शालिनी टॉकीजसमोरील लोहा बाजारातील दुकानातून घेतल्याची माहिती मुजम्मील याने पोलिसांना दिल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक संजय गवई आणि पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या पथकाने पंचांसमक्ष प्रिन्स हार्डवेअरची तपासणी केली. दुकानातून कोयत्यांनी भरलेली एक बोरी आढळली. त्यात १२ हजार ४०० रुपये किमतीचे ६२ लोखंडी कोयते होते.

### दुकानमालकासह तिघांवर गुन्हा

दुकानमालक आरिफ अहेमद खान उमर खान (५२, रा. कोठडी बाजार, अकोला) याच्याकडून ६२ कोयते, तर मुजम्मील याच्याकडून एक कोयता आणि ५० हजार रुपये किमतीची विना नंबरप्लेट दुचाकी जप्त करण्यात आली. एकूण ६३ कोयते आणि दुचाकी असा ६२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. पोलीस कर्मचारी भूषण सोळंके यांच्या फिर्यादीवरून तिघांविरुद्ध शस्त्र अधिनियमातील कलम ४ व २५ तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

### सराईत गुन्हेगार असल्याची पोलिसांची माहिती

ताब्यात घेतलेल्या आरोपींवर यापूर्वीही शस्त्र अधिनियमासह अन्य गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अशा गुन्हेगारांविरुद्ध सातत्याने कारवाई सुरू राहील, असे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्पष्ट केले. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय गवई, पोलीस निरीक्षक विलास पाटील, पोलीस हवालदार अजय भटकर, ख्वाजा शेख, किशोर येउल, पोलीस कॉन्स्टेबल शैलेश घुगे, अमोल गायकवाड, आकाश जामोदे तसेच शहर वाहतूक शाखेचे भूषण सोळंके आणि अश्विन चव्हाण यांनी केली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३१५ ■ सोमवार, १२ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## कर्ज मंजुरीच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक फसवणूक

### कर्जासाठी पैसे घेतले; घराचे बक्षीसपत्रही करून घेतले, दिलेला धनादेश अनादरित



**वर्धा जनमाध्यम :** बँकेचे कर्ज मंजूर करून देण्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून पैसे उकळल्याचा प्रकार खरांगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाचोड येथे उघडकीस आला आहे. कर्ज प्रकरणासाठी पैसे घेतल्यानंतरही कर्ज मंजूर न झाल्याने संबंधित नागरिकांनी विचारणा केली. त्यानंतर परतफेडीसाठी दिलेला धनादेश चुकीच्या स्वाक्षरीमुळे अनादरित झाल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी चंद्रकला शंकर उईके आणि विकास बाबाराव पंधराम यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, पाचोड येथील रमेश हरीभाऊ तेलंगे (वय ५४) हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. गावातील चंद्रकला उईके ही अंगणवाडीत नोकरी करते. ती आपल्या ओळखीच्या एजंटामार्फत बँकेचे कर्ज प्रकरण करून देत असल्याचे सांगत असे. तिच्या ओळखीचा विकास पंधराम हा कर्ज प्रकरणासाठी फेब्रुवारी २०२६ मध्ये तेलंगे यांच्या घरी आला होता. त्यावेळी कर्ज मंजूर करून देण्याचे आश्वासन देत त्यासाठी खर्च लागणार असल्याचे सांगण्यात आले. यानंतर तेलंगे यांनी मुलीच्या फोन पेच्या माध्यमातून विकास पंधराम याच्या बँक खात्यात चार हजार आणि दहा हजार रुपये असे एकूण १४ हजार रुपये जमा केले. तसेच चंद्रकला उईके हिला अडीच हजार रुपये रोख दिले. अशा प्रकारे कर्ज प्रकरणासाठी एकूण १६ हजार ५०० रुपये दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. याशिवाय गावातील अन्य नागरिकांनीही कर्ज मिळण्याच्या अपेक्षेने पैसे दिल्याचे समोर आले आहे. प्रफुल कासार यांनी अडीच हजार, सुनील कासार यांनी पाच हजार, सविता मसराम यांनी पाच हजार, तर बाबाराव शेटे यांनी दोन हजार रुपये दिल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे.

पैसे देऊनही कर्ज मंजूर होत नसल्याने तेलंगे यांनी संबंधितांकडे विचारणा केली. त्यानंतर त्यांना हिंगणघाट येथील एका वित्तीय कंपनीच्या कार्यालयात नेण्यात आले. पुढे तेलंगे यांच्या पाचोड येथील घराचे पत्नीच्या नावे बक्षीसपत्र करून घेण्यात आल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. मात्र, त्यानंतरही कर्ज मंजूर झाले नाही. वारंवार विचारणा केल्यानंतर आज होईल, उद्या होईल, अशी उत्तरे देऊन टाळाटाळ करण्यात आल्याचे तक्रारदाराने सांगितले.

या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार अर्ज दिल्यानंतर विकास पंधराम याने तेलंगे यांना कोटक महिंद्रा बँकेचा सात हजार रुपयांचा धनादेश दिला. उर्वरित रक्कम रोख देण्याचे आश्वासन दिले. मात्र, तेलंगे यांनी धनादेश बँकेत जमा केला असता, त्यावरील स्वाक्षरी चुकीची असल्याचे कारण देत धनादेश अनादरित झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. यानंतरही पैशांची मागणी केली असता, टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकारामुळे आपली आर्थिक फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने तेलंगे यांनी खरांगणा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक सोळुंके करीत आहेत.

# वर्धा जिल्ह्यात १२३३ दुर्गादेवींची स्थापना

## डीजेवरील बंदीमुळे ढोलताशा आणि बँड पथकांच्या गजरात देवीचे आगमन

### समृद्धी महामार्गावरील दुर्घटनेने वर्ध्यात दुःखाचे सावट





**वर्धा जनमाध्यम :** शारदीय नवरात्रोत्सवाला जिल्ह्यात मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला असून, शहरासह ग्रामीण भागात एकूण १२३३ दुर्गादेवींच्या मूर्तींची स्थापना करण्यात आली आहे. ढोलताशांचा निनाद, बँड पथकांचे सूर आणि देवीच्या जयघोषात मूर्तींचे आगमन झाले. मात्र, शेगाव येथून देवीची मूर्ती घेऊन परतताना समृद्धी महामार्गावर घडलेल्या भीषण अपघातामुळे वर्धा शहरावर दुःखाचे सावट पसरले आहे. एका बाजूला नवरात्रोत्सवाचा उत्साह, तर दुसरीकडे अपघाताच्या घटनेने निर्माण झालेली हळहळ, असे भावनिक वातावरण शहरात पाहायला मिळत आहे.

वर्धा शहरातील विविध नवदुर्गा उत्सव मंडळांनी यंदा देवीच्या मूर्ती बाहेरगावांहून आणल्या आहेत. यामध्ये बाळापूर, शेगाव, अमरावती, यवतमाळ तसेच मध्य प्रदेशातील जबलपूर येथून आणलेल्या मूर्तींचा समावेश आहे. देवीच्या आगमनासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांनी विशेष तयारी केली होती. विधिवत पूजा-अर्चा करून देवीची स्थापना करण्यात आली. मात्र, शेगाववरून देवी घेऊन येताना समृद्धी महामार्गावर झालेल्या दुर्घटनेने उत्सवाच्या आनंदावर विरजण पडले आहे. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत असून, उत्सवाच्या वातावरणात दुःखाची किनार निर्माण झाली आहे.

**डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य**

यंदा डीजेवरील बंदीमुळे देवीच्या आगमन मिरवणुकांमध्ये पारंपरिक ढोलताशा आणि बँड पथकांना प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे डीजेच्या कर्णकर्कश आवाजाऐवजी ढोलताशांचा निनाद आणि बँड पथकांच्या सुरावटीत देवीचे स्वागत करण्यात आले. शहरातील विविध भागांत आकर्षक मंडप उभारण्यात आले असून, रोषणाईने परिसर सजविण्यात आला आहे.

**ग्रामीण भागातही नवरात्रोत्सवाची धामधूम**

वर्धा जिल्ह्यातील विविध शहरांसह ग्रामीण भागातही दुर्गादेवींची स्थापना करण्यात आली आहे. नऊ दिवस चालणाऱ्या उत्सवादरम्यान धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, नवरात्रोत्सवाचा उत्साह कायम असला, तरी समृद्धी महामार्गावरील दुर्घटनेने वर्धेकरांच्या मनात दुःखाची भावना निर्माण केली आहे. भक्ती आणि उत्सवाच्या वातावरणात या दुर्घटनेची आठवण नागरिकांना अस्वस्थ करणारी ठरत आहे.

## घटस्थापनेच्या दिवशी बजाज चौकात वाहतूक कोंडी

### देवीच्या आगमनाचा उत्साह, वाहतूक पोलिसांच्या ई-चलनांचा नागरिकांना मनस्ताप



**वर्धा जनमाध्यम :** नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी शहरातील बजाज चौकात वाहतूक नियंत्रणाऐवजी ई-चलनांच्या कारवाईवर भर दिला जात असल्याचे चित्र रविवारी सायंकाळी दिसून आले. एकीकडे घटस्थापना आणि दुर्गादेवीच्या आगमनाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना दुसरीकडे वाहतूक पोलिसांच्या कारवाईमुळे बजाज चौकातील वाहतूक विस्कळीत झाल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला.

रविवारी सायंकाळी ५,३० वाजताच्या दरम्यान बजाज चौक परिसरात नागरिकांची आणि वाहनांची मोठी वर्दळ होती. नवरात्रोत्सवामुळे बाजारपेठेत गर्दी वाढली होती. देवीच्या आगमनासाठी नागरिकांची लगबग सुरू असतानाच वाहतूक पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात ई-चलनाची कारवाई करण्यात येत असल्याचे चित्र होते. त्यामुळे वाहतुकीचे नियोजन करण्याऐवजी दंडात्मक कारवाईलाच प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. वाहतूक पोलिसांचे प्रमुख काम म्हणजे वाहतुकीला शिस्त लावणे, कोंडी टाळणे आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित करणे. मात्र, कारवाईचे लक्ष्य पूर्ण करण्याच्या मानसिकतेतून कारवाई होत असेल, तर वाहतूक नियंत्रणाचा मूळ उद्देशच बाजूला पडतो. सणासुदीच्या काळात गर्दीच्या ठिकाणी अतिरिक्त कर्मचारी तैनात करून वाहतूक सुरळीत ठेवणे अपेक्षित असताना बजाज चौकातील परिस्थितीने या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई व्हायलाच हवी मात्र वाहतुकीचा खोळंबा करून नव्हे. सणाच्या पहिल्याच दिवशी निर्माण झालेल्या या परिस्थितीकडे वरिष्ठ वाहतूक अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

## आकाशदीप जिवणे यांची पहिल्याच प्रयत्नात देशात तिसरी रँक

**वर्धा जनमाध्यम :** जिद्द, मेहनत आणि ध्येयाप्रती समर्पण असेल तर यशाला गवसणी घालता येते, हे गजानननगर, सिंदी मेघे येथील आकाशदीप अशोक जिवणे यांनी सिद्ध केले आहे.



यूपीएससीमार्फत घेण्यात आलेल्या आरआरबी टेलिकॉम इंजिनिअर ऑफिसर परीक्षेत त्यांनी पहिल्याच प्रयत्नात संपूर्ण भारतातून तिसरी रँक मिळवून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला असून परिसरातही अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रतिकूलतेवर मात करून ध्येय गाठण्याची प्रेरणा आकाशदीप यांनी तरुणांसमोर ठेवली आहे. त्यांच्या यशामुळे वर्धा जिल्ह्याचा गौरव वाढला असून सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

## वैनगंगा-नळगंगा प्रकल्पात शेतकरी हिताला प्राधान्य द्या

### ९५ हजार कोटींच्या प्रकल्पाबाबत खा.अमर काळे यांची भूमिका

**पाणीवाटप, मोबदला आणि निधी नियोजनात पारदर्शकतेची मागणी**

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्याची क्षमता असलेल्या वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाची अंमलबजावणी करताना शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे. सुमारे ९५ हजार कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात भूसंपादन, मोबदला, पुनर्वसन आणि पाणीवाटपाबाबत शासनाने स्पष्ट आराखडा जाहीर करावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.



प्रकल्पासाठी जमिनी, विहिरी आणि फळबागा संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांना नियमानुसार योग्य मोबदला व वेळेत नुकसानभरपाई मिळावी. भूसंपादनानंतर शेतीचे लहान तुकडे शिल्लक राहिल्यास तेही योग्य मोबदला देऊन ताब्यात घेण्याबाबत शासनाने विचार करावा, अशी मागणी काळे यांनी केली.

प्रकल्पाच्या खर्चाचे नियोजन, निधीची उपलब्धता, निविदा प्रक्रिया आणि कामांच्या प्रगतीचा तपशील सार्वजनिक करावा. तसेच लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाणी कधी मिळणार, याचे वेळापत्रक जाहीर करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

वर्धा जिल्ह्यातील किती गावे आणि किती क्षेत्र सिंचनाखाली येणार, संभाव्य प्रकल्पग्रस्तांची संख्या किती असेल आणि पाणीवाटपाचे निकष काय असतील, याची अधिकृत माहिती शासनाने द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

प्रकल्पाला विरोध नसून शेतकऱ्यांच्या हिताला बाधा न पोहोचवता त्याची अंमलबजावणी व्हावी. सिंचनाचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळणे, हीच प्रकल्पाच्या यशाची खरी कसोटी आहे, असे काळे यांनी स्पष्ट केले.

## सेलूत विदेशी दारूसह दुचाकी जप्त

### १ लाख २ हजारांचा मुद्देमाल हस्तगत; एकावर गुन्हा दाखल



**सेलू जनमाध्यम :** शहरातील विकास चौक परिसरातून खोडे लेआऊट रोडकडे विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका दुचाकीस्वाराला सेलू पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण पथकाने पकडले. त्याच्याकडून विदेशी दारूच्या २४ बाटल्या आणि दुचाकी असा एकूण १ लाख २ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी निखिल उर्फ रुस्तम रामू देवरे (वय २८, रा. कोथींवाडा, सेलू) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास सेलू पोलिसांचे डी.बी. पथक गस्तीवर असताना काळ्या रंगाच्या पल्सर दुचाकीवरून विदेशी दारूची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी खोडे लेआऊट रोडवर सापळा रचून संशयित दुचाकीस्वाराला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान दुचाकीच्या पेट्रोल टँकवर ठेवलेल्या कापडी पिशवीत ओसी कंपनीच्या १८० मिली क्षमतेच्या २४ सीलबंद बाटल्या आढळल्या. या दारूची किंमत ७ हजार २०० रुपये, तर दुचाकीची किंमत ९५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दोन्ही मिळून १ लाख २ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पथकातील पोलीस अंमलदार अनिल केकतपुरे, रामकिसन इप्पर, गजानन कमठाने, विनायक गोडे आणि ओमप्रकाश तल्लारी यांनी कारवाईत सहभाग घेतला. प्रकरणाचा पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत.

## ८० किलो गांजा तस्करीचे धागेदोरे ओडिशापर्यंत; मुख्य आरोपीला अटक

**अमली पदार्थविरोधी पथकाची दुर्गम जंगलात कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ८० किलो ४४० ग्रॅम गांजा जप्त केल्याप्रकरणी तपास करताना अमरावतीच्या अमली पदार्थविरोधी कृती दलाने तस्करीचे धागेदोरे ओडिशापर्यंत पोहोचविले आहेत. या प्रकरणातील ओडिशातील आरोपी जोसेफ कंदपाल (वय ३३, रा. मलकानगिरी जिल्हा, ओडिशा) याला दुर्गम आणि घनदाट जंगल परिसरातून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. त्याला अमरावती न्यायालयाने १४ ऑक्टोबरपर्यंत तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, गांजाच्या पुरवठा साखळीचा पुढील तपास सुरू आहे.

अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सच्या अमरावती पथकाने ७ फेब्रुवारी २०२६ रोजी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत छापा टाकून ८० किलो ४४० ग्रॅम गांजा जप्त केला होता. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला. अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याच्या कलम ८(क), २०(ब)(ii) आणि २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अमरावती जिल्ह्यातील नऊ आरोपींना अटक करून १ ऑगस्ट २०२६ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

जप्त करण्यात आलेला गांजा अमरावती जिल्ह्यात नेमका कोठून आणण्यात आला होता, याचा तपास अमली पदार्थविरोधी पथकाने सुरू ठेवला होता. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ओडिशातील जोसेफ कंदपाल याची या प्रकरणात आरोपी म्हणून ओळख पटविण्यात आली. त्यानंतर पथकाने दुर्गम आणि घनदाट जंगल परिसरात पोहोचून ९ ऑक्टोबर रोजी त्याला ताब्यात घेतले आणि अटक केली. ओडिशातील मलकानगिरी येथील न्यायालयात हजर केल्यानंतर आरोपीला अमरावतीला आणण्यासाठी संक्रमण कोठडी वॉरंट प्राप्त करण्यात आले. त्यानंतर ११ ऑक्टोबर रोजी अमरावती न्यायालयातून त्याची १४ ऑक्टोबरपर्यंत तीन दिवसांची पोलीस कोठडी घेण्यात आली. गांजाचा स्रोत, पुरवठा साखळी आणि या तस्करीत आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास केला जात आहे.

ही कारवाई अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सचे पोलीस अधीक्षक अजित टिके आणि अमरावतीचे पोलीस उपअधीक्षक गजानन विखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक पूनम जगताप, सहायक उपनिरीक्षक विनय मोहोड, हवालदार शैलेंद्र अर्डक, हवालदार सुमेध पोहेकर आणि पोलीस शिपाई शिवराज पवार यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# कापसाला पाला, बोंडांचा दुष्काळ

## समुद्रपूर तालुक्यात शेतकऱ्यांच्या हातात उत्पादनाऐवजी आर्थिक संकट



**समुद्रपूर जनमाध्यम :** कधी हिरवागार दिसणारा कापसाचा मळा आज हिरव्या-पिवळ्या पाल्याने भरला आहे. झाडांवर कापसाची बोंडं दिसण्याऐवजी पानांचाच पसारा अधिक आहे. कुठे एखादं बोंड, तर कुठे मोजकी चार-पाच बोंडं. पिकाकडे पाहून घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आता उत्पन्नाची स्वप्नं नव्हे, तर कर्ज आणि खर्चाची चिंता दिसत आहे. समुद्रपूर तालुक्यात पावसाच्या खंडाने आणि ऑक्टोबरमधील वाढत्या उन्हाने कापूस उत्पादकांच्या आशेवर पाणी फेरले आहे.

यंदा जिल्ह्यात सरासरीपेक्षा सुमारे ३० टक्के कमी पाऊस झाल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. किरकोळ पावसाच्या भरवशावर सप्टेंबरपर्यंत तग धरलेल्या कापसाची ऑक्टोबरमध्ये अवस्था बिकट झाली. पावसाने पाठ फिरवली आणि उन्हाच्या झळांनी पिकाची वाढ खुंटली. फुलांची मोठ्या प्रमाणात गळ होत असून अपेक्षित बोंडधारणा झालेली नाही. अनेक शेतांमध्ये एका झाडाला चार ते पाच बोंडंही मुश्किलने दिसत आहेत. त्यामुळे एकरी किमान एक क्विंटल कापूस हाती येईल की नाही, याचीही शाश्वती राहिलेली नाही.मागील वर्षी अतिवृष्टीने नुकसान केले, यंदा पावसाअभावी पीक करपले! निसर्गाच्या या बदलत्या चक्रात शेतकरी मात्र भरडला जात आहे. मशागत, बियाणे, खते, कीटकनाशकांची फवारणी आणि मजुरीवर केलेला खर्च वसूल होणार कसा, हा प्रश्न त्याच्यासमोर उभा ठाकला आहे. शेतात कापसाऐवजी पाला दिसत असल्याने यंदाचा हंगाम आर्थिक संकटाची चाहूल देत आहे.

**पंचनामे करून सरसकट नुकसानभरपाई द्या**

कापूस उत्पादकांच्या या गंभीर परिस्थितीची शासनाने तातडीने दखल घ्यावी. कापूस पिकाचे प्रत्यक्ष पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी विशेष दुष्काळी अनुदान आणि पीकविम्याची नुकसानभरपाई द्यावी. पीकविमा काढलेल्या शेतकऱ्यांना कोणत्याही अटीशर्तींचा अडसर न ठेवता १०० टक्के नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. धर्मेंद्र राऊत यांनी केली आहे. निधीची कमतरता भासत असल्यास विकासकामांना तात्पुरती स्थगिती देऊन शेतकऱ्यांना मदत करावी, अशीही त्यांची मागणी आहे.

शेतात बोंडं नाहीत, घरात पैसा नाही; अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी पुढचा हंगाम कसा उभा करायचा हा प्रश्न आज समुद्रपूर तालुक्यातील कापूस उत्पादकांना सतावत आहे. आता शासनाच्या मदतीची प्रतीक्षा असून, कागदोपत्री घोषणांऐवजी प्रत्यक्ष नुकसानभरपाई मिळणार का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## ट्रॅव्हल्स असोसिएशनच्या समस्या सोडविणार

### पालकमंत्री डॉ. भोयर यांचे आश्वासन; नागपुरात अधिकृत थांब्याची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर पोलिसांच्या दंडात्मक कारवाईमुळे वर्धा-नागपूर ट्रॅव्हल्स व्यवसाय अडचणीत आला असून, छत्रपती चौक आणि रहाटे कॉलनी येथे अधिकृत थांबा उपलब्ध करून देण्याची मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रॅव्हल्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री तथा गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडे केली. यासंदर्भात नागपूर पोलिसांशी चर्चा करून समस्येवर तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन डॉ. भोयर यांनी दिले.

असोसिएशनच्या पदाधिकारी व सदस्यांनी रविवारी पालकमंत्र्यांची भेट घेऊन ट्रॅव्हल्स चालकांवर होणाऱ्या कारवाईची माहिती दिली. गेल्या तीन दशकांपासून वर्धा-नागपूर मार्गावर असोसिएशनच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक सुरू आहे. या मार्गावर ३६ ट्रॅव्हल्स धावत असून, चालक आणि वाहक म्हणून काम करणाऱ्या सुमारे ६८० जणांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे.

नागपूर येथील छत्रपती चौक आणि रहाटे कॉलनी परिसरात ट्रॅव्हल्स थांबविल्यास दररोज ११ ते १५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जात असल्याचे असोसिएशनच्या प्रतिनिधींनी सांगितले. काही बसेस पोलिस ठाण्यात जमा केल्या जात असल्याने व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत आहे. या कारवाईमुळे केवळ ट्रॅव्हल्स व्यवसायच नव्हे, तर त्यावर अवलंबून असलेल्या शेकडो कुटुंबांच्या उपजीविकेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर दोन्ही ठिकाणी अधिकृत थांबे मंजूर करून ट्रॅव्हल्स व्यावसायिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावर डॉ. भोयर यांनी मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून नागपूर पोलिसांशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले. यावेळी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# ‘राज्यातील २६५ दुष्काळग्रस्त तालुक्यांत अन्नधान्य पुरवठा विनाविलंब करावा’: मुख्यमंत्री

**मुंबई** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्यातील जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पर्जन्यमानातील तूट आणि अन्य घटकांमुळे प्रभावित झालेल्या दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा सुरळीत आणि विनाविलंब उपलब्ध करून दिले जाणार आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासह, पात्रतेनुसार नवीन लाभार्थ्यांचा योजनेत समावेश, आधार संलग्नीकरण, स्थलांतरित लाभार्थ्यांना पोर्टेबिलिटी सुविधेचा लाभ आणि अन्नधान्य वितरणावर प्रभावी देखरेख ठेवण्याबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमित केला आहे.

मदत व पुनर्वसन विभागाच्या २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, खरीप हंगाम २०२६ साठी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळाची ’ट्रिगर-१’ (प्रथम कळ) स्थिती लागू करून विविध सवलती व उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत. दुष्काळग्रस्त भागातील शेतीवर अवलंबून असलेले शेतकरी, शेतमजूर आणि अन्य प्रभावित घटकांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, यासाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने सरकारने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

### पात्र लाभार्थ्यांना एपीएल डीबीटी योजनेचा लाभ नियमितपणे मिळेल





राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र सरकारने निश्चित केलेल्या लाभार्थी मर्यादेत पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य वितरित केले जाते. दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमध्ये या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा नियमित, सुरळीत आणि विनाविलंब होण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, पात्र लाभार्थ्यांना एपीएल डीबीटी योजनेचा लाभ नियमितपणे मिळेल, याची दक्षता घेण्यासही सांगण्यात आले आहे.

### पात्र व्यक्तींचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समावेश

दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमधील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या व्यक्तींनी मोफत अन्नधान्याची मागणी केल्यास, त्यांची सरकारने निश्चित केलेल्या निकषांनुसार पात्रता तपासली जाईल. संबंधित व्यक्तींचे उत्पन्न आणि योजनेसाठी उपलब्ध असलेली लाभार्थी मर्यादा विचारात घेऊन, पात्र व्यक्तींना अंत्योदय अन्न योजना किंवा प्राधान्य कुटुंब लाभार्थी गटात समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येईल. यासाठी संबंधित कुटुंबाच्या शिधापत्रिकेवरील सर्व सदस्यांचे आधार संलग्नीकरण पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना तातडीने अन्नधान्य उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे निर्धारित निकष पूर्ण करणाऱ्या आणि योजनेत अद्याप समाविष्ट नसलेल्या व्यक्तींनाही योजनेचा लाभ मिळण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

स्थलांतरित लाभार्थ्यांना कोणत्याही सोयीच्या रास्तभाव दुकानातून धान्य

दुष्काळग्रस्त भागात रोजगार किंवा पाण्याच्या शोधात शेतमजूर आणि नागरिकांना शहरी, निमशहरी अथवा जवळच्या अन्य भागांत स्थलांतर करावे लागू शकते. अशा परिस्थितीत स्थलांतरामुळे पात्र कुटुंबे त्यांच्या हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहू नयेत, यासाठी ‘वन नेशन, वन रेशन कार्ड’ अंतर्गत पोर्टेबिलिटी सुविधेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. दुष्काळामुळे स्थलांतर करावे लागणाऱ्या नागरिकांसाठी ही सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. स्थलांतरामुळे एकही पात्र कुटुंब किंवा लाभार्थी हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही, याची वैयक्तिक दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

## तुकाराम मुंढेंना मकरंद अनासपुरेंचा मुलगा म्हणाला...

**मुंबई** - तुकाराम मुंढे हे अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त आहेत. ते त्यांच्या धडाडीसाठी आणि स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध आहेत. तुकाराम मुंढे यांनी लहान मुलांना जंक फूड दिलं जाऊ नये या उद्देशाने तुकाराम मुंढे आयुक्त असलेल्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून निर्बंध घालण्यात आले आहेत. या नियमावलीनुसार शाळा किंवा शाळेच्या ५० मीटर अंतरातील वर्तुळात वडा-पाव, समोसा, बर्गर अशा प्रकारचं जंक फूड विकण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

मात्र तुकाराम मुंढेंना अभिनेते मकरंद अनासपुरेंच्या मुलाने सर, वडा-पाव शाळेत मिळायला हवा म्हणत जेव्हा तुकाराम मुंढेंकडे मागणी केली तेव्हा तुकाराम मुंढेंनी दिलेलं उत्तर व्हायरल झालं आहे. एवढंच नाही तर चायनीजही खाऊ नका, त्यामुळे तुमचं आरोग्य बिघडतं असंही त्यांनी म्हटलं आहे.

इंद्रनील अनासपुरे हा मराठी अभिनेते मकरंद अनासपुरे यांचा मुलगा आहे, तो तुकाराम मुंढे यांना म्हणाला, सर तुमचा शाळेमध्ये खूप टेरर आहे. पण मला माझ्या मित्रांनी एक प्रश्न विचारायला सांगितला आहे तो मी तुम्हाला विचारतोय.

## मुंबई पोलिसांनी सोडल्यानंतर तुषार गांधींची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले...

**मुंबई**- निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन पुकारण्यात आलं होतं. या आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते, महात्मा गांधी यांचे नातू तुषार गांधी यांनीही पाठिंबा जाहीर केला होता. या आंदोलनाला जाण्यासाठी तुषार गांधी घरातून निघाले. परंतु या आंदोलनाला जाण्याआधी मुंबई पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. तुषार गांधी यांना ताब्यात घेतल्याने राजकीय वातावरण तापलं. आदित्य ठाकरे यांनीही थेट पोलीस स्टेशनला भेट



दिली. काही तासानंतर पोलिसांनी तुषार गांधी यांना सोडलं. त्यानंतर तुषार गांधी यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

तुषार गांधी यांनी सांगितले की, पोलीस सकाळपासूनच घरापासूनच पाठलाग करत होते. जेव्हा ऑगस्ट क्रांती मैदानाकडे जाण्यासाठी निघालो, तेव्हा पोलिसांनी नॅशनल कॉलेज, वांद्रे येथून ताब्यात घेतले. आधी सांताक्रूझला नेले, नंतर डीएन नगर पोलीस ठाण्यात नेले आणि तिथे अनेक तास ठेवले. जेव्हा पोलिसांना कळले की, आदित्य ठाकरे त्यांना भेटायला येणार आहेत. तेव्हा मेडिकल चेकअपच्या बहाण्याने त्यांना बोरीवली पोलीस स्टेशनला नेण्यात आले. तिथे पोलिसांनी सांगितले की, डीएन नगर पोलीस स्टेशनबाहेर आंदोलन सुरू आहे आणि आदित्य ठाकरे त्यांच्याशी बोलू इच्छितात. त्यानंतर पोलिसांनी फोनवर आदित्य ठाकरे यांच्याशी बोलणे करून दिले आणि नंतर त्यांना घरी सोडले’.तसेच ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी त्यांचा फोन फ्लाइट मोडवर टाकला होता, असेही त्यांनी सांगितले.

‘मी सीजेपी प्रोटेस्टच्या समर्थनार्थ ऑगस्ट क्रांती मैदानात आंदोलन करणार होतो, पण मला ताब्यात घेतल्यानंतरही तिथे आंदोलन झाले आणि अनेकांना ताब्यात घेण्यात आले.

## दुष्काळी परिस्थिती पाहणीसाठी आलेल्या केंद्रीय पथकासोबत मुख्यमंत्र्यांची बैठक

**मुंबई:**राज्यात यंदा समाधानकारक पाऊस झाला नाही. पिके हातून गेली. त्यातच राज्य सरकारने दुष्काळाची घोषणा केली. राज्यातील अनेक भागात स्थिती गंभीर आहे. दुष्काळाची पाहणी करण्यासाठी केंद्राचे पथक राज्यात दाखल झाले. त्यांनी अनेक भागात जाऊन दुष्काळाची पाहणी केली. दुष्काळी परिस्थिती पाहणीसाठी आलेल्या केंद्रीय पथकासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बैठक झाली. यावेळी गिरीश महाजन, दत्तात्रय भरणे, मकरंद पाटील हे मंत्री उपस्थित होते. केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचे प्रमुख केंद्रीय संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल आणि पथकातील इतर सदस्य यांच्यासोबत बैठक केली. यंदा राज्यात कोरडा दुष्काळ पडला असून धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. एलनिनोचे मोठे संकट



आहे. एलनिनोमुळे समाधानकारक पाऊस झाला नसल्याचे सांगितले जातंय.

कापूस आणि सोयाबीन उत्पादन कमी झाले. तूर सुद्धा प्रभावित झाली. पाण्याचे स्त्रोत प्रभावित झाला असून पाण्याचा गंभीर प्रश्न आहे.

केंद्रीय पथकाच्या प्रत्येक सदस्याने सांगितली परिस्थिती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यादरम्यान केंद्रीय पथकाने सर्वंकष दौरा केला, त्याबद्दल आभार मानले. मोठे कृषी संकट आहे. रब्बीवर सुद्धा संकट आहे. सर्व प्रकारची मदत शेतकऱ्यांना द्यावी लागेल, असेही त्यांनी म्हटले.

मदतीचा फोकस हा सामान्य शेतकरी आणि शेतमजूर असेल.केंद्राकडून अधिक मदत मिळावी. पिण्याच्या पाण्याची समस्या असेल, राज्य सरकार संपूर्ण नियोजन करेल. संकटाला संधीत परावर्तित करण्याचा प्रयत्न करावा लागेल. पशुधन वाचवावे लागेल. पाण्याचे आरक्षण आम्ही केले आहे. प्राधान्य पिण्याचे पाणी आणि प्राण्यांसाठी पाणी असेच आहे.

प्राथमिक निवेदन आम्ही सादर केले आहे. लवकरच अंतिम अहवाल सादर करू, असे त्यांनी म्हटले.

केंद्राकडून आता राज्याला किती मदत होते, हे पाहण्यासारखे ठरणार आहे. मोठा दुष्काळ राज्यात पडला आहे. ऑक्टोबर महिन्यात उन्हाचा कडाका वाढला आहे. स्थिती अधिक गंभीर होताना दिसत आहे.

## मुंबईत एफडीएची मोठी कारवाई; दहा आस्थापनांवर छापे

**मुंबई:** अन्नसुरक्षेच्या दृष्टिकोनातून अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री, साठवणूक आणि वाहतूक रोखण्यासाठी राज्यात विशेष मोहीम राबवली आहे. या कारवाईअंतर्गत राज्यात बारा गुन्हे दाखल करण्यात आले असून तेरा जणांना अटक करण्यात आली आहे.

प्रतिबंधित अन्नपदार्थांचा सुमारे ७९.२९ लाख रुपयांचा साठा आणि तीन वाहने जप्त करण्यात आली आहे. एकूण जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत सुमारे १.०९ कोटी रुपये असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाने दिली आहे.

मुंबईतील दहा अन्नआस्थापनांमध्ये केलेल्या तपासणीमध्ये परवाना आणि नोंदणीमधील त्रुटी दिसून आल्या आहेत. अस्वच्छता, वैद्यकीय प्रमाणपत्रे व प्रशिक्षणाचा अभाव,



कीटकांचा प्रादुर्भाव, अन्न साठवणुकीमध्ये त्रुटी आढळल्याने हे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

एकालाही हात लागला तर शांत बसणार नाही, आदित्य ठाकरे यांचा सरकारला इशाराया यादीत इस्लाम जिमखान्यातील हुमा केटरर, कांदिवलीतील मिल्कोज डेअरी प्रॉडक्ट्स, सांताक्रूझमधील ला पिनोझ पिझ्झा, विलेपार्लेतील एफथ्री कॉर्पोरेट हॉस्पिटॅलिटी सर्व्हिसेस, ऑपेरा हाऊसमधील नारायण डोसा, जे. जे. रुग्णालय परिसरातील सेंट्रल कॅन्टीन, चारकोपमधील पालीवाल डेअरी आणि मरीन लाइन्स परिसरातील नवाब ज्यूस सेंटर अशा दहा आस्थापनांचा समावेश आहे.

जळगाव, धुळे आणि नाशिक येथे ६ ते ८ ऑक्टोबरदरम्यान केलेल्या कारवाईत २३.२४ लाख रुपयांचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणांत चार एफआयआर दाखल करून पाच जणांना अटक करण्यात आली. तर ८ ऑक्टोबरला नंदुरबार येथे गोपनीय माहितीच्या आधारे प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला यांची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

# शिक्षक मतदारसंघांसाठी 1 हजार ५१ मतदान केंद्र, ६९00 अधिकारी कर्मचारी तैनात

**पुणे :**पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी अर्ज माघारीनंतर प्रत्येकी ४७ आणि ३० उमेदवार रिंगणात राहिले आहेत. मतदान २३ ऑक्टोबर रोजी होणार असून पदवीधर मतदारसंघासाठी ३ लाख ८८ हजार १९ मतदार मतदान करणार असून शिक्षक मतदारसंघासाठी ६२ हजार मतदार असतील. या दोन्ही मतदारसंघांसाठी १ हजार ५१ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून सुमारे ६ हजार ९०० कर्मचारी कार्यरत असतील अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

तेली म्हणाल्या, ‘पदवीधर मतदारसंघासाठी ७५ उमेदवारांनी ८७ अर्ज भरले होते. त्यापैकी ६९ उमेदवारांचे ८१ अर्ज वैध ठरले होते. माघारीच्या मुदतीत २२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने ४७ उमेदवार रिंगणात उरले आहेत. मतदानासाठी विभागात ७४१ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. ही मतदान केंद्रे तालुका आणि मंडळस्तरावर उभारण्यात येणार आहेत. शिक्षक



मतदारसंघासाठी ४९ उमेदवारांनी ६७ अर्ज भरले होते. त्यापैकी ४८ उमेदवारांचे ६५ अर्ज वैध ठरले होते. माघारीच्या मुदतीत १८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने ३० उमेदवार रिंगणात उरले आहेत. मतदानासाठी विभागात ३१० मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.’

कोल्हापूर जिल्ह्यात सर्वाधिक पदवीधर मतदार असून पुणे जिल्ह्यात सर्वाधिक शिक्षक मतदार आहेत. पदवीधरसाठी बहुतांश मतदान केंद्रांवर सुमारे ४०० ते ७००, तर शिक्षक मतदारसंघासाठी बहुतांश केंद्रांवर २०० पेक्षा कमी मतदार मतदान करतील. प्रत्येक मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष, तीन मतदान अधिकारी, व एक शिपाई असे पथक असेल. राखीव कर्मचाऱ्यांसह पदवीधर मतदारसंघासाठी ४,७१५ व शिक्षक मतदारसंघासाठी २,२२७ असे सुमारे ६,९०० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रासाठी वैद्यकीय कर्मचारीही उपलब्ध असतील, असे त्या म्हणाल्या. पदवीधर मतदार संघासाठी २,१५८ व शिक्षक मतदारसंघासाठी ७०३ मतपेट्या (राखीवसह) लागणार असून यांची उपलब्धता करण्याचे काम सुरू असल्याचे तेली यांनी यावेळी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यात निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची समन्व यक अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. प्रत्येक जिल्ह्यात तीन भरारी पथके (एकूण १५) कार्यरत असून पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभागालाही सतर्क ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यांना भेटा, ठोस निर्णय घ्या..!

**पुणे** - एमपीएससीच्या अध्यक्षांना हटवण्याच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर आमदार रोहित पवार यांनी सरकारला आज संध्याकाळपर्यंत ठोस निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करावी आणि आंदोलनाबाबत तोडगा काढावा, अशी मागणी त्यांनी केली. अन्यथा उद्या विद्यार्थी वेगळा निर्णय घेऊ शकतात, असा इशाराही त्यांनी दिला.रोहित पवार यांनी एमपीएससीच्या अध्यक्षांना पदावरून हटवण्याची मागणी पुन्हा अधोरेखित केली. आयोगाचे शुद्धीकरण करायचे असेल, तर अध्यक्षांना हटवणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी मांडली. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची हीच प्रमुख मागणी असून, त्यावर सरकारने ठोस भूमिका घ्यावी, असे ते म्हणाले.दरम्यान, आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना ‘अर्बन नक्षल’ संबोधणे आणि त्यांनी पैसे घेतल्याचे आरोप करणे, यावरूनही रोहित पवार यांनी टीका केली. स्वतःच्या हक्कांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारे संबोधणे म्हणजे गरीब आणि शेतकरी कुटुंबांतील तरुणांची थट्टा करण्यासारखे असल्याचे त्यांनी म्हटले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना गांभीर्याने घेऊन त्यांच्याशी संवाद साधण्याची गरज असल्याचे सांगत, सरकारने आज संध्याकाळपर्यंत विद्यार्थ्यांना निर्णयाबाबत निरोप द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.



### पुण्याच्या तरुणाला फ्रान्समध्ये २० वर्षे तुरुंगवास

**पुणे** - राज्यातील पुणे येथून फ्रान्समध्ये शिक्षणासाठी गेलेल्या एका तरुणाला स्थानिक न्यायालयाने २० वर्षांच्या कठोर कारावासाची शिक्षा ठोठावली. रोहन राणे (वय २९) असे या मुख्य आरोपीचे नाव आहे. राणे हा आंतरराष्ट्रीय बाल लैंगिक शोषण आणि छळ करणाऱ्या ऑनलाईन टोळीचा म्होरक्या असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. खटल्यातही त्याच्यावर हाच आरोप होता. या गंभीर गुन्ह्यात फ्रान्समधील कायद्यान्वये त्याला कमाल शिक्षा झाल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.प्राप्त माहितीनुसार, रोहन राणे हा उच्च शिक्षणासाठी फ्रान्समध्ये राहत होता. त्याने यादरम्यान डिस्कॉर्ड या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करत जगभरातील अल्पवयीन मुलांना आपल्या जाळ्यात ओढले. सीव्हीएलटा नावाच्या एका गुन्हेगारी ऑनलाईन गटाच्या माध्यमातून तो या अल्पवयीन मुलांवर दबाव टाकत असे. या मुलांकडून ही टोळी हिंसक आणि लैंगिक स्वरुपाचे व्हिडिओ तयार करून घेत होती. याविषयीचे टास्क या मुलांना देण्यात येत होते.



### अखेरचा निरोपही गैरसोयींच्या वाटेवर!

**नागपूर :** एखाद्या आप्तस्वकीयाच्या निधनानंतर त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी स्मशानभूमीत आलेल्या कुटुंबीयांकरिता तो दुःखाचा क्षण असतो. अशावेळी निदान परिसरात स्वच्छता असावी, बसण्यासाठी जागा असावी, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृह उपलब्ध असावे आणि अंत्यसंस्काराची व्यवस्था सुरळीत असावी, एवढीच अपेक्षा असते. मात्र, नागपूर शहरातील स्मशानभूमींची प्रत्यक्ष पाहणी केली असता या मूलभूत अपेक्षांनाही अनेक ठिकाणी तडे गेल्याचे चित्र दिसते. मोडकळीस आलेले बाक, तुटलेल्या फरशा, जीर्ण चबुतरे, साचलेली पाने, वाढलेले गवत, अस्वच्छ परिसर आणि काही ठिकाणी भटक्या कुत्र्यांचा वावर यामुळे अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.



### आरोग्य सेवांची ‘नाडी’ तपासण्यासाठी ‘आरोग्य संवाद यात्रा’

**मुंबई :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्यासाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकारातून १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत राज्यव्यापी ‘आरोग्य संवाद यात्रा’ राबविण्यात येणार आहे. या यात्रेद्वारे आरोग्यमंत्री थेट नागरिकांशी संवाद साधून सरकारी आरोग्य सेवांची सद्यस्थिती जाणून घेणार आहेत. आरोग्य योजनांचा लाभ, रुग्णालयांमधील उपलब्ध सुविधा, औषधांचा पुरवठा आणि मनुष्यबळाच्या समस्यांचा आढावा घेऊन आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे.राज्यातील आरोग्य सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचतात की नाही, हे तपासण्यासाठी या यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि दोन ग्रामीण रुग्णालयांच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करून तेथील सुविधांचा आढावा घेतला जाणार आहे.



### नाशिकमधील नऊ कंपन्यांना क्लोजर नोटीस

**नाशिक :** अंबड औद्योगिक परिसरातून रसायनयुक्त सांडपाणी जमिनीत झिरपल्याने दत्तनगर भागातील बोअरवेल आणि हातपंपांचे पाणी दूषित झाल्याचा प्रकार समोर आल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) कठोर कारवाई सुरू केली आहे. प्रदूषण नियंत्रणाचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या अंबड परिसरातील एकूण नऊ कंपन्यांना ‘क्लोजर नोटीस’ बजावण्यात आली आहे. यापैकी चार कंपन्यांना यापूर्वीच बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते, तर आणखी पाच कंपन्यांना आता ‘क्लोजर डायरेक्शन्स’ जारी झाले आहेत.दत्तनगर परिसरात काही दिवसांपासून बोअरवेल आणि हातपंपांद्वारे पिवळसर, दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात होत्या.

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## तरुणाईचा विद्रोही आवाज

राजधानी दिल्लीतील नीट परीक्षा घोटाळ्याविरोधातील रोष असो, पुण्यातील डीजेच्या कर्णकर्कश संस्कृतीविरोधातील एल्गार असो किंवा एमपीएससीच्या पेपरफुटीविरोधात पुण्यातील विद्यार्थ्यांचे आंदोलन असो, या प्रत्येक संघर्षामागे एक समान धागा आहे. तरुणाईचे निडर नेतृत्व आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती. उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेलेला एक तरुण 'नीट'सारख्या परीक्षेतील पेपरफुटीने अस्वस्थ होतो. सोशल मीडियावर 'कॉक्रोच जनता पार्टी' नावाची एक पार्टी स्थापन करतो. परदेशातील शिक्षणाचा मार्ग सोडून मायदेशी परततो आणि देशव्यापी आंदोलन उभे करतो. दुसरा एक तरुण गणेशोत्सवातील डीजेच्या कर्णकर्कश दणदणाटाविरोधात आवाज उठवतो. तर्कशुद्ध मुद्दे मांडत विरोधकांच्या आक्षेपांना सामोरा जातो, तर कोल्हापूर जिल्ह्यातील एका गावखेड्यातून आलेला आणखी एक तरुण आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर विद्यार्थी आंदोलनाला धार देतो. मराठवाड्यातील अभिजित दीपके, पुण्यातील विद्यानंद बापट आणि कोल्हापूरचा विवेकानंद पाटील जेन- झीच्या पिढीतील आवाज म्हणून पुढे आलेल्या या तिघांमध्ये स्थळ- काळाच्या पलीकडे जाणारे बरेच साम्य आहे. अभिजित संविधानाची भाषा बोलतो. विद्यानंद तर्कशुद्ध आणि बुद्धिप्रामाण्यवादी मांडणी करतो तर विवेकानंद राज्यशास्त्रीय दृष्टिकोनातून आपले मुद्दे स्पष्ट करतो. ही तरुण मंडळी उच्चशिक्षित आहेतच, शिवाय भारतीय संविधानापासून इमॅन्युएल कांट, नोम चॉम्स्की, जॉन स्टुअर्ट मिल, कार्ल मार्क्स, मिशेल फुको अशा जगभरातील लोकशाहीवादी आणि वैचारिक परंपरेतील विचारवंतांच्या ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केलेला आहे. त्यामुळे चर्चेच्या मैदानात त्यांची मांडणी अनेकदा प्रभावी ठरते. या तिघांच्या लढ्यांचे विषय वेगळे, मांडणीची शैली वेगळी आणि संघर्षाची पद्धतही वेगळी आहे. मात्र, अभिव्यक्तीचे माध्यम एकच- सोशल मीडिया आणि सार्वजनिक संवाद. या तिन्ही तरुणांची पार्श्वभूमी अत्यंत सर्वसामान्य कुटुंबातील आहे. घराण्याचा वारसा नाही, राजकीय वलय नाही, सत्तेची पाठराखण नाही. स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहण्याची धडपड आणि वाट्याला आलेल्या प्रश्नांशी दोन हात करण्याची जिद्द हेच त्यांचे खरे भांडवल आहे. विवेकानंद पाटील यांचा संघर्ष तर विशेष चटका लावणारा आहे. आर्थिक अडचणींवर मात करत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका तरुणाच्या डोळ्यांत सरकारी सेवेत जाण्याचे स्वप्न असते. ज्या व्यवस्थेवर विश्वास ठेवून तो आपले भविष्य पणाला लावतो, त्याच व्यवस्थेतील कथित गैरप्रकाराचा सामना त्याला करावा लागतो. पण तो गप्प बसत नाही. स्वतःच्या जखमेवर फुंकर घालून बाजूला होण्याऐवजी तो त्या जखमेलाच व्यवस्थेसमोर प्रश्न बनवून उभा करतो. पाटलांच्या गावातील घराचा व्हिडीओ पाहून भारती विद्यापीठाचे विश्वजित कदम यांनी त्यांना घर बांधून देण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र, पाटलांनी ती मदत नम्रपणे नाकारली. 'घर तर केव्हाही बांधता येईल; पण डोळ्यांतील स्वप्नांचे काय?' हा त्यांनी उपस्थित केलेला सवाल अंतर्मुख करणारा आहे. मात्र, प्रश्न विचारण्याची किंमतही मोजावी लागते. बापटांनी डीजेविरोधात भूमिका घेतली, तेव्हा त्यांना मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले. 'सीजेपी'चे अभिजित दीपके, 'आयसा'ची नेहा बोरा किंवा विवेकानंद पाटील यांनी व्यवस्थेला सवाल केला, तेव्हा त्यांच्यावर 'अर्बन नक्षलवादी' अशी लेबल्स लावली गेली. मात्र, एखाद्याला कोणते लेबल लावले जाते, यापेक्षा त्याने उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर काय आहे, हे अधिक महत्त्वाचे असते. म्हणूनच, 'अशा आंदोलनांतून काय मिळते?' या प्रश्नाचे उत्तर केवळ तात्कालिक परिणामांत शोधता येणार नाही. प्रत्येक लढा कायदा बदलत नाही, प्रत्येक आंदोलन व्यवस्था बदलत नाही आणि प्रत्येक मागणी तातडीने मान्यही होत नाही. काही लढे कायदे बदलतात, काही व्यवस्था बदलतात; तर काही केवळ समाजाचा सुप्तावस्थेत गेलेला विवेक जागा करतात. आणि कधी कधी तेवढेच पुरेसे असते. आंदोलनकर्त्यांच्या प्रत्येक मुद्द्याशी सहमत असणे आवश्यक नाही. त्यांच्या प्रत्येक पद्धतीला समर्थन द्यावे, असेही नाही. पण किमान त्यांचे म्हणणे ऐकण्याइतका विवेक समाजात शिल्लक असला पाहिजे. कारण प्रश्न विचारणारे आवाज बंद झाले, तर समाज हळूहळू बहिरा होत जातो.

# शेषन आणि ज्ञानेशकुमार

**शेषन यांचा त्यांच्या काळात राजकीय पक्षांना व उमेदवारांना दरारा वाटत होता. आज ज्ञानेशकुमार यांच्यावर ते दोषी आहेत, असे समजून राजकीय पक्ष रोज आरोपांच्या फैरी झाडत आहेत. शेषन हे निवडणूक आयोगाचा ताकदवान चेहरा म्हणून ओळखले जात होते. आज निवडणूक आयोगाच्या ताकदीवर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे.**



एसआयआरमध्ये (मतदार नोंदणी सर्वेक्षण) देशातील तेरा कोटी नावे वगळण्यात आल्याने आणि निवडणूक आयोगाच्या कारभारातील धुसफुस बाहेर पडल्यानंतर काँग्रेससह विरोधी पक्षाला एनडीए सरकार विरोधात आंदोलन करायला आणखी एक निमित्त मिळाले. विरोधी पक्षाने 'ज्ञानेशकुमार हटाओ' असा चंगच बांधला आहे. सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यात संवादाचे दरवाजे बंद झाले आहेत का? निवडणूक आयोग विरोधी पक्षाला चर्चेसाठी नकार देत आहे का? लोकशाहीत संवाद सर्वात महत्त्वाचा असतो, तोच जर संपला असेल, तर रस्त्यावरील संघर्ष किती काळ चालू राहील व कोणत्या थराला जाईल, हे कोणी सांगू शकत नाही.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्यावर विरोधी पक्षाकडून विशेषत: काँग्रेसकडून रोज व्होट चोरीचे आरोप केले जात आहेत. ज्ञानेशकुमार हे मनमानी व हुकूमशाही पद्धतीने सरकारला अनुकूल असेच काम करीत आहेत व भाजपचे ते बाहुले म्हणून वागत आहेत, असे काँग्रेसने आरोप केले आहेत. प्रत्येक निवडणुकीत भाजपला विजय मिळवून देण्यासाठी ते अधिकाराचा गैरवापर करीत आहेत व निवडणूक आयोगाच्या मदतीनेच भाजप पाठोपाठ निवडणुका जिंकत आहे, निवडणूक आयोगाचा कारभार पक्षपाती आहे असे त्यांच्यावर रोज आरोप होत आहेत. ज्ञानेशकुमार यांना जणू आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून विरोधी पक्ष त्यांच्यावर आरोपांचा भडिमार करीत आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांना सरकारचे व कायद्याचे पूर्ण संरक्षण आहे. त्यांना हटवणे सोपे नाही, २०२३ मध्ये कायद्यात केलेल्या सुधारणेनुसार मुख्य निवडणूक आयुक्तांवर गुन्हा दाखल करता येणार नाही, त्यांच्यावर खटला चालवता येणार नाही. विशेष म्हणजे, निवृत्तीनंतरही त्यांच्यावर खटला चालवता येणार नाही; मात्र राहुल गांधींपासून ते ठाकरे बंधूंपर्यंत, ममता बॅनर्जीपासून ते अभिजित दीपके यांच्या कॉक्रोच जनता पार्टीपर्यंत, अखिलेश यादव यांच्यापासून विद्यार्थी नेता नेहा बोरापर्यंत सारे ज्ञानेश कुमारांच्या विरोधात शक्तिप्रदर्शन करून तुटून पडत आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी, तर दिल्लीतील आंदोलनात पोलिसांनी उभारेल्या बॅरिकेड्?सवर चढून ज्ञानेशकुमारांच्या विरोधात घोषणा दिल्या. प्रियांका वड्रांसह त्यांनी पोलिसांच्या बसमधून खाली उतरून थेट आकाशवाणी भवनात घुसून आठ तास ठिय्या मांडला. त्यांच्यावर दिल्ली पोलिसांनी गुन्हे दाखल केल्याने काँग्रेसजन आणखी भडकले आहेत. दिल्ली, मुंबईतील असंख्य आंदोलकांवर गेल्या आठवड्यात पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. यापूर्वी देशातील कोणत्याही मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात असा रोष प्रकट झाला नव्हता. अशा वातावरणात दिवंगत मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांच्या कारभाराची आठवण होते.

भारताच्या संविधानाबरोबरच मुख्य निवडणूक आयुक्तपद अस्तित्वात आले. मुख्य निवडणूकपदावरील व्यक्तीला मोठे अधिकार आहेत, तसेच जबाबदारीही मोठी आहे. या पदाला काय अधिकार असतात, हे सर्वप्रथम टी. एन. शेषन यांनी दाखवून दिले व प्रत्यक्षात राबवले. शेषन यांच्या अगोदर नऊ मुख्य निवडणूक आयुक्त झाले; पण त्यांच्या नावाची कधी राजकीय वर्तुळात चर्चा झाली नाही. दि. १२ डिसेंबर १९९० रोजी १० वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून शेषन यांनी सूत्रे हाती घेतली. त्यानंतर त्यांनी आपल्या कारभाराने निवडणूक आयोगाच्या कारभाराची प्रतिमाच बदलून दाखवली. केवळ देशातील निवडणुका घेणारी संस्था म्हणजे निवडणूक आयोग नाही, तर एक कठोर प्रशासनिक, संविधानिक यंत्रणा अशी त्यांनी आयोगाची प्रतिमा निर्माण केली. त्यांनी राज्यातील निवडणूक अधिकाऱ्यांना अधिकार दिले व त्यांना सक्रिय बनवले. तसेच आदर्श आचारसंहिता जारी करून निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना नियमांच्या चौकटीत आणले. निवडणुकीचे नियम सर्वांना सारखेच आहेत व या नियमांपुढे मोठ मोठ्या राजकीय पक्षांनाही झुकावे लागते, हे त्यांनी देशाला दाखवून दिले. शेषन यांनी मुख्य निवडणूक आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतली तेव्हा बूथ कॅप्चरिंग, बोगस मतदान, हिंसाचार असे मोठे प्रश्न होते. विशेषत: उत्तर प्रदेश, बिहारमधील निवडणुकांमध्ये मोठी बदनामी होत असे. मतदानाच्या वेळी जिथे गडबड घोटाळे झाले, तेथे शेषन यांनी मतदान स्थगित केले. चुकीचे वागणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

बूथवर कब्जा करणारा कितीही ताकदवान असो, त्यापेक्षा निवडणूक आयोगाची शक्ती मोठी आहे, हे शेषन यांनी कारवाईतून दाखवून दिले. शेषन यांचे काम निवडणूक आयोगाच्या दिल्लीतील कार्यालयापुरते मर्यादित नव्हते, तर देशातील कानाकोपऱ्यातील लहान गावापासून ते दिल्लीतील मोहल्ल्यांपर्यंत त्यांच्या नावाची चर्चा होती. निवडणुकीतील आचारसंहितेचे कठोर पालन झाले पाहिजे, खर्चाची रोज नोंद व खर्चाची मर्यादा पाळली गेली पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता. निवडणुकीच्या काळात सरकारी इमारती, कार्यालये, सरकारी मोटारी, सरकारी यंत्रणांचा किंचितही वापर होता कामा नये, याविषयी ते स्वत: दक्ष असत. जे सत्तेवर आहेत त्यांना निवडणूक काळात सत्तेचा वापर करता येणार नाही, असा त्यांचा दंडक होता. निवडणूक काळात रस्त्यावर किंवा भिंतींवर वा सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज, पक्षाचे झेंडे दिसता कामा नयेत, ही प्रथा त्यांच्या काळात सुरू झाली. उमेदवार वा मतदार श्रीमंत असो वा गरीब, हे सर्व सारखेच आहेत, ही भावना त्यांनी सर्व देशभर रुजवली. मतदार फोटो ओळखपत्र ही संकल्पना शेषन यांच्या काळातच अमलात आली. बोगस मतदान रोखण्यासाठी त्यांनी मतदार ओळखपत्र सुरू केले. शेषन यांनी लागू केलेल्या नियमांना सुरुवातीला राजकीय पक्षांकडून विरोध झाला. हे कसे शक्य आहे, असे प्रश्न विचारले गेले. निवडणूक प्रक्रिया नि:पक्ष व पारदर्शक व्हावी असा त्यांनी प्रयत्न केला. निवडणुकीतील वारेमाप खर्चाच्या उधळपट्टीला त्यांनी लगाम घातला. शेषन यांच्या कारभाराची तुलना करताना आज राज्याचे अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांचे नाव घेतले जाते. शेषन यांनी तेव्हा आणि मुंढे यांनी आज त्यांच्या कठोर कारभाराने जनतेच्या मनात स्थान मिळवले. शेषन यांना १९९६ मध्ये प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या रेमन मेगासिस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

तीन दशकांनंतर विद्यमान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार हे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. ज्ञानेशकुमार हे देशाचे २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त आहेत. त्यांच्या काळात सुरू झालेल्या स्पेशल इन्टेसिव्ह रिव्हिजन (एसआयआर) मतदार सर्वेक्षणावरून मोठे वादंग पेटले आहे. मतदार यादीचे शुद्धीकरण करणे व अपात्र मतदार यादीतून हटवणे हे निवडणूक योगाचे कामच आहे; मात्र मतदारांची नावे वगळण्यावरून व एकूणच एसआयआर प्रक्रियेवरून मोठा असंतोष प्रकटला आहे. पुरावे म्हणून मागितले जाणारे दस्तावेज व एसआयआरची प्रक्रिया यावरून लोकांना बराच त्रास सहन करावा लागला. महाराष्ट्रातून २ कोटी ७ लाख नावे वगळण्यात आली. पुन्हा लाखो लोकांनी त्यावर दाद मागण्यासाठी याचिका केल्या आहेत; पण पुरावे देऊन पात्र ठरल्यावरही त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्याचे अधिकार राज्याच्या निवडणूक अधिकाऱ्यांना आहेत का? फॉर्म ६ वरून तर मोठा गहजब झाला. २००२ मध्ये आई-वडिलांनी किंवा आजी-आजोबांनी कुठे मतदान केले, त्याचा पुरावा सादर करा, असे सांगण्यात येत होते, या प्रश्नातून काय साध्य करायचे होते? देशपातळीवर ज्यांची मतदार यादीतून नावे वगळली, त्यात बांगला देशी किंवा रोहिंगे घुसखोर किती होते? मयत किंवा स्थलांतरित यांची नावे वगळली पाहिजेत यावर दुमत नाही; पण ज्यांच्याकडे आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, रेशन कार्ड आहे, शिवाय ज्यांनी गेल्या लोकसभा, विधानसभा व महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मतदान केले आहे, त्यांना का अपात्र ठरवले गेले? अन्य राज्यांतून लग्न करून महाराष्ट्रात सुना म्हणून आलेल्या हजारो मुलींना मतदार सर्वेक्षणात त्रास झाला. शेवटी त्याचे खापर मुख्य निवडणूक आयुक्तांवरच फुटले ना? राज्याच्या निवडणूक अधिकाऱ्याचे अधिकार काढून घेऊन ते दिल्लीत केंद्रित केल्यामुळे पात्र ठरलेल्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट होऊ शकली नाहीत. निवडणूक आयोगाचे काम प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क मिळवून देणे आहे की, त्याचा अधिकार काढून घेणे आहे, असा प्रश्न माजी मुख्य निवडणूक आयुक्तांनी व निवृत्त न्यायमूर्तींनीच विचारला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगातील तिन्ही आयुक्तांना नोटीस बजावून व तुम्ही घेतलेले निर्णय हे एकमताने आहेत की बहुमताचे असे विचारणे, हे प्रथमच घडले असावे. शेषन यांचा त्यांच्या काळात राजकीय पक्षांना व उमेदवारांना दरारा वाटत होता. आज ज्ञानेशकुमार यांच्यावर ते दोषी आहेत असे समजून राजकीय पक्ष रोज आरोपांच्या फैरी झाडत आहेत. शेषन हे निवडणूक आयोगाचा ताकदवान चेहरा म्हणून ओळखले जात होते. आज निवडणूक आयोगाच्या ताकदीवर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे.

**डॉ. सुकृत खांडेकर**

## राजीनामा एका आयुक्तांचा; कसोटी लोकशाहीच्या विश्वासाची!

विरोधाकडून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची केली जाणारी मागणी ही केवळ राजकीय संघर्षापुरती मर्यादित नसून, ती लोकशाहीच्या संस्थात्मक स्वायत्ततेची आणि जनविश्वासाची मोठी कसोटी आहे.

मतदारयाद्यांमधील कथित बदलांवरून निर्माण झालेल्या शंका, संविधानातील अनुच्छेद ३२४(५) नुसार असणारी कडक कायदेशीर चौकट आणि सरकारच्या राजकीय रणनीतीचा हा एक गुंतागुंतीचा पेच आहे. केवळ कायदेशीर संरक्षण न घेता पारदर्शकता दाखवणे आणि प्रत्येक पात्र नागरिकाच्या मताधिकाराचे रक्षण करून निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास टिकवून ठेवणे, हीच आजच्या लोकशाहीसमोरील खरी परीक्षा आहे.

**राहूल इंगळे**
मो.९८९०५७७१२८

## काँग्रेसचे 'डावे' वळण

**संवाद**

भारतीय राजकारणात गेल्या दशकभरात (२०१४ ते २०२६) झालेला सर्वात मोठा वैचारिक बदल म्हणजे काँग्रेस पक्षाची 'मध्यममार्गी' भूमिकेकडून 'डाव्या' विचारसरणीकडे झालेली वेगवान वाटचाल. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस हा उजव्या आणि डाव्या विचारांचा समतोल साधणारा 'सर्वसमावेशक' पक्ष होता. १९९१ मध्ये मनमोहन सिंग आणि नरसिंह राव यांनी आणलेल्या 'मुक्त अर्थव्यवस्थेची' ओळख मागे टाकत, राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने आज आक्रमक डावा व समाजवादी मार्ग स्वीकारला आहे. भाजपच्या उजव्या व हिंदुत्ववादी राजकारणाला शह देण्यासाठी डावा आणि कल्याणकारी मार्ग निवडून काँग्रेसने आपली नवी ओळख तर निर्माण केली खरी;

मात्र, लोकशाहीत विचारांची स्पष्टता जितकी महत्त्वाची असते, तितकीच व्यवहार्यता आणि सर्वसमावेशकताही आवश्यक असते. हे डावे वळण काँग्रेसला भविष्यात सत्तेचा मार्ग दाखवणार की मध्यमवर्गीय मतदारांना अधिक दुरावणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

भारतीय लोकशाहीच्या सक्षमतेसाठी एका सशक्त आणि वैचारिकदृष्ट्या स्पष्ट विरोधी पक्षाची उपस्थिती ही काळाची गरज आहे.

**अविनाश देशपांडे**

# दुबई तेल अवीव फ्लाईटवर काय घडले?

३० सप्टेंबर २०२६ रोजी तेल अवीवला जाणारे फ्लायदुबई या कंपनीचे विमान दुबईवरून उडा३.५ तासांचा प्रवास, १७० प्रवासी होते, बहुतेक इस्त्रायली होते.स्मित मच्छर आणि हम्माम अल हम्मामी हे दोन पायलट होते.विमान सुरु झाल्यावर काही वेळाने हम्मामने खुर्चीच्या मागे ठेवलेला हातोडा हस्तगत केला आणि स्मित मच्छरवर हल्ला केला. संकट समयी काच फोडण्यासाठी हा हातोडा ठेवलेला असतो, तो लॉक्ड नसतो, खुल्ला असतो.हल्ला झाला,स्मित कोसळला. विमान वेगाने जमिनीकडे निघाले. ३४ हजार फुटावरून झपकन १४ हजार फुटावर आले. स्मितची किंचाळी ऐकून प्रवाशांमधे बसलेला एक पायलट कॉकपिटमधे गेला. त्याने हम्मामच्या गळ्याभोवती कोपर गुंडाळून हम्मामला घुसमटवले, त्याला निकामी केले त्याला बाजूला करून पायलटने विमान सांभाळले.आणखी पाच सेकंद गेले असते तर विमान कोसळले असते.विमान वाचले. प्रवासी वाचले. स्मितला हॉस्पिटलमधे दाखल करण्यात आले, तो वाचला.

पत्रकार आणि राजकीय नेते सुसाट सुटले.विमान वाचवणाऱ्या माणसाला नेतान्याहू भेटले. तो एक प्लंबर होता असे नेतान्याहू म्हणाले. नरेंद्र मोदीनी उपचार घेत असलेल्या मच्छरला फोन करून त्याचे आभार मानले. नेतान्याहूनी जाहीर केले की इराणने विमान पळवण्याचा, अपघात घडवण्याचा डाव रचला होता.लगोलग डोनल्ड ट्रंपनीही जाहीर केलं की या घटनेत इराणचा हात आहे.इराणने जाहीर केले या घटनेचा इराणशी संबंध नाही.हम्मानीकडे चाकू कुठून आला इत्यादी प्रश्न लोकांनी विचारल्याचे माध्यमांत प्रसिद्ध झाले.इस्त्रायल, ओमान, अमिराती, सौदी पोलिसांनी चौकशीही सुरु केली नव्हती. घटनेनंतर काही मिनिटातच माध्यमे,
नेतान्याहू,ट्पंप,मोदी इत्यादी लोक दणादण बोलत सुटले.

विमानात ४ पायलट प्रवासी म्हणून प्रवास करत होते. पायलट नव्या ड्यूटीसाठी, आधीची ड्यूटी संपवून कुठल्या ना कुठल्या तरी विमानतळाकडे जात असतात. त्यांना कठीण प्रसंगी कसे वागायचे याचे प्रशिक्षणही दिलेले असते. एक पायलट सरसावला.




दुबई विमानतळावर सुरक्षा ढिली होती?मी माझा अनुभव सांगतो. मी एकदा जेरुसलेमला जात होतो. माझ्याकडं रीतसर व्हिसा होता. तरीही मुंबई विमानतळावर मला जवळ जवळ दीडेक तास रोखून ठेवलं,माझी उलट तपासणी केली गेली. एका मराठी जाणणाऱ्या सेक्युरिटीवाल्याने माझी कसून चौकशी केली, अनंत प्रश्न विचारून भंडावून सोडले. मी पुस्तके लिहितो म्हटल्यावर त्याने पुस्तकांची नावे विचारली. त्याने इंटरनेटवर जाऊन त्या पुस्तकांची माहितीही घेतली. मी जाम वैतागलो, त्या माणसाला म्हणालो की झक मारली आणि निघालोय, मी नाही जात, मी परत जातो. तो माणूस हसला. म्हणाला असा अविचार करू नका. आमची सेक्युरिटी फार कडक असते. सर्वांचीच अशी चौकशी आम्ही करतो.

जेरुसलेममधे एका दहशतवाद्यानं आत्मघाती हल्ला केला होता, त्याची माहिती गोळा करून त्यावर लिहिण्यासाठी मी जेरुसलेमला निघालो होतो.मुंबई विमानतळावर इस्त्रायलच्या विमानांसाठी कोपऱ्यात एक स्वतंत्र गेट होते.दुसरा अनुभव अगदी नुकताच. सिटल ते ॲम्स्टरडॅम प्रवास करत होतो. माझ्या पाठी दोन सिटा सोडून एक पायलट बसला होता. तो युनिफॉर्ममधेच होता. ॲमस्टरडॅममधे जाऊन तो दुसऱ्या पायलटची सुटका करणार होता.

नंतर ॲवम्स्टरडॅम ते मुंबई फ्लाईट होते. दोन पायलट युनिफॉर्ममधे त्या विमानात होते.ते मुंबईतल्या पायलटना रिलीव्ह करण्यासाठी निघाले होते.खाली उतरताना एका पायलटकडे मी हळूच ३० सप्टेंबर घटनेचा उल्लेख केला. तो काय बोलला ते नीट समजले नाही. आमच्या फ्लाईटवर फ्लायदुबई विमानासारखी घटना घडली असती तर तो पायलट नक्कीच सरसावला असता. तो पायलट धिप्पाड होता.

हम्मामी कोण होता? तो ओमानी होता.त्याने हल्ला का केला याची हकीकत ओमान, सौदी, अमिराती किंवा इस्त्रायली पोलिसानी सांगितलेली नाही. अमेरिकेतल्या वर्तमानपत्रांनी मिळवलेल्या माहिती नुसार हम्मामीकडं अयमान जवाहिरीचा फोटो सापडला. जवाहिरी हा ओसामा बिन लादेनचा दोन नंबर होता. ओसामा मारला गेल्यावर जवाहिरी अल कायदाचा प्रमुख होता. हम्मामीवर अल कायदाचा प्रभाव होता. हा प्रभाव केव्हापासून होता याचा तपशील अजून पेपरांना मिळालेला नाही. पण हम्मामी कुठल्याही इस्लामी संघटनेचा कार्यकर्ता होता असा पुरावा मिळालेला नाही येवढं नक्की.गोळा झालेल्या माहिती नुसार तो 'लोन वुल्फ' या वर्गातला होता असं लक्षात येते. एकटा कार्यकर्ता. अल कायदाचा इस्लाम, राजकारण इत्यादी बद्दलचा विचार ओसामाने जाहीरपणे नेटवर टाकला होता. गैर इस्लामी सत्ता हिसक मार्गाने उलथवणे हे मुख्य सूत्र; शस्त्र कशी तयार करावीत; शस्त्रे कशी वापरावीत; याची माहिती अल कायदाने नेटवर टाकली होती.

अल कायदा हे मुक्त विद्यापीठ होते.अभ्यासक्रम, विचार, शिक्षक, सारे काही नेटवर खुले होते. संस्था काढावी, अभ्यासक्रम आखावा, प्रशिक्षण द्यावे, चिंतन बैठकांमधून विचार पक्का करावा असली भानगडच नव्हती. ज्याने त्याने आपली हिंसक कारवाई आखावी, पार पाडावी. अशा रीतीने तयार झालेले मुक्त विद्यार्थी अमेरिकेत, इंग्लंडमधे तयार झाले. त्यांनी व्यक्तिगत कारवाया केल्या. इंग्लंडमधे एका माणसाने चक्क साधी सुरी वापरून खासदाराला ठार मारलं होते.

हिंसेचा वापर करणारे अनेक गट जगभर आहेत. प्रत्येक गटाचे स्वतंत्र ध्येय, स्वतंत्र शैली, स्वतंत्र विचार असतो. अमिराती, ओमान, कतार, सौदी अरेबिया, इजिप्त, पॅलेस्टाईन, पाकिस्तान अशा अनेक ठिकाणी हिंसक गट आहेत आणि भारावलेले मुक्त सैनिकही आहेत. त्यांना बोलविता धनी नसतो. बोलतात तेच आणि धनीही तेच असतात. हम्मामी हा त्यापैकी एक. असे आत्ता दिसतेय.

**निळू दामले**

सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## ॲट्रॉसिटी व अपहरण प्रकरणात कारवाईचा वेग स्थिरावला..!

### तपास अधिकाऱ्यांच्या भूमिकेची वरिष्ठ स्तरावर चौकशी करण्याची चंदन हातगाडे यांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ११ : ॲट्रॉसिटी, अपहरण, विवस्त्र करून मारहाण आणि व्हिडिओ प्रसारित केल्याच्या कथित गंभीर प्रकरणात संबंधित आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यासोबतच तपास यंत्रणेच्या भूमिकेचीही चौकशी करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा तक्रारदार चंदन हातगाडे यांनी केली आहे. या प्रकरणातील तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी ११ ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथे पत्रकार परिषद घेऊन पोलीस संरक्षणाची मागणी केली.**



हातगाडे यांच्या म्हणण्यानुसार, २० मे २०२१ रोजी च्या गुन्हा क्रमांक ४८१ मधील प्रकरणात सगीर अन्सारी, समीर राजा, सलीम अन्सारी, सचिन म्हल्ले, अमोल तंबाखे व त्यांच्या इतर साथीदारांविरुद्ध निष्पक्ष आणि सखोल तपास करून उपलब्ध पुराव्यांच्या आधारे कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. या प्रकरणात तपासादरम्यान दिरंगाई झाली का, महत्त्वाच्या पुराव्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले का किंवा आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न झाला का, याची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली. संबंधित व्हिडिओ आणि अन्य पुरावे सुरक्षित ठेवून नियमानुसार न्यायालयात सादर करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### तक्रारदाराच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची?

**गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात तक्रारदार कुटुंबाला असुरक्षिततेची भावना निर्माण होत असेल, तर त्यांच्या सुरक्षिततेबाबत पोलिसांनी गांभीर्याने निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामुळे तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांना तातडीने पोलीस संरक्षण द्यावे, तसेच प्रकरणाचा तपास पारदर्शक पद्धतीने पूर्ण करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी हातगाडे यांनी केली. या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासातून आणि न्यायालयीन प्रक्रियेतून स्पष्ट होणे महत्त्वाचे असून, पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, हीच आपली भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.**

## दुष्काळाचे सावट नवरात्रोत्सवावरही,देवीच्या मूर्तींच्या खपात घट!

### शेतात पीक नाही, हातात पैसा नाही, सणासुदीचा उत्साह आर्थिक दुष्काळ, शेतकरी कुटुंबांवर संकटाचे सावट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ११ :** यवतमाळ जिल्ह्यात यंदा दुष्काळाचे सावट गडद होत असताना त्याचे पडसाद आता सण-उत्सवांवरही उमटू लागले आहेत. पावसातील खंडामुळे खरीप पिकांचे नुकसान, हातात उत्पन्न नसल्याने वाढलेली आर्थिक ओढाताण आणि भविष्याची चिंता यामुळे शेतकरी कुटुंबांचा सणासुदीचा उत्साहही मावळताना दिसत आहे.





जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजऱ्या होणाऱ्या नवरात्रोत्सवात यंदा घरगुती दुर्गामूर्तींच्या खपात घट झाल्याचे मूर्तिकार आणि विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. एकीकडे शहरात झगमगाट, आकर्षक देखावे आणि भव्य मंडपांची सजावट; तर दुसरीकडे ग्रामीण भागात आर्थिक विवंचनेमुळे सण साजरा करण्याचीही चिंता, असे विरोधाभासी चित्र दिसत आहे. दरवर्षी घटस्थापनेच्या निमित्ताने अनेक शेतकरी कुटुंबे घरात दीड ते दोन फुटांच्या दुर्गामूर्तींची स्थापना करतात. यंदाही बाजारात विविध आकारांच्या मूर्ती विक्रीसाठी दाखल झाल्या; मात्र अपेक्षेप्रमाणे विक्री झाली नसल्याचे मूर्तिकार आणि विक्रेत्यांचे म्हणणे आहे. पिके हातची गेल्याने किंवा अपेक्षित उत्पन्नाची खात्री नसल्याने काही कुटुंबांनी घरगुती मूर्तींची स्थापना टाळल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागातील लहान-मोठ्या मंडळांमध्येही मूर्तींच्या मागणीत घट जाणवत असल्याचे सांगितले जाते. यवतमाळ शहरात विविध दुर्गोत्सव मंडळांनी आकर्षक रोषणाई, देखावे आणि मंडपांची उभारणी केली आहे. सार्वजनिक मंडळांचा उत्साह कायम असला, तरी शेतकरी कुटुंबांची आर्थिक परिस्थिती वेगळीच कहाणी सांगत आहे. शेतात पीक नाही, उत्पन्नाची हमी नाही आणि खर्च मात्र वाढत आहेत. अशा परिस्थितीत सणासाठी अतिरिक्त खर्च करणे अनेक कुटुंबांना कठीण झाले आहे. देवीकडे संकटातून बाहेर पडण्याचे साकडे नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत दुर्गामातेच्या चरणी सुख-समृद्धी आणि संकटमुक्तीचे साकडे घातले जात आहे. मात्र, श्रद्धेबरोबरच शेतकऱ्यांना आता ठोस आर्थिक मदतीचीही गरज आहे. पिकांच्या नुकसानीचे योग्य मूल्यांकन, वेळेत मदत आणि पाणीटंचाईवरील प्रभावी उपाययोजना झाल्या नाहीत, तर दुष्काळाचे परिणाम आगामी सणांवरही अधिक तीव्रतेने जाणवू शकतात. देवीच्या उत्सवात रोषणाई कितीही असली, तरी शेतकऱ्यांच्या घरातील आर्थिक अंधार दूर करण्याची जबाबदारी शासनाला टाळता येणार नाही.

## थोडक्यात



### कपाशी-तुरीच्या आड गांजाची शेती,कुंभारीत ४.२१ क्विंटल गांजा जप्त!

**८४८ झाडांवर पोलिसांचा छापा; अवैध लागवडीमागील साखळीचा शोध घेण्याचे आव्हान**

**घाटंजी :** कपाशी आणि तुरीच्या पिकांच्या आड प्रतिबंधित गांजाची लागवड केल्याचा धक्कादायक प्रकार घाटंजी तालुक्यातील कुंभारी शिवारात उघडकीस आला आहे. पोलिसांनी धडक कारवाई करत गांजाची तब्बल ८४८ झाडे जप्त केली. या झाडांचे अंदाजे वजन ४ क्विंटल २१ किलो असून, या प्रकरणी राजू रामा सलाम (वय ३८, रा. कुंभारी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, कुंभारी शिवारातील शेतात कपाशी आणि तुरीच्या पिकासोबत गांजाची बेकायदेशीर लागवड केली जात असल्याची माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला. तपासादरम्यान गांजाची ८४८ झाडे आढळली. पोलिसांनी ती जप्त करून पंचनामा केला. शेतीच्या आड अमली पदार्थांची लागवड होत असेल, तर त्यामागील संपूर्ण साखळी उघड होणे गरजेचे आहे.
जप्त केलेला गांजा कोणासाठी पिकवला जात होता? त्याची विक्री कुठे आणि कोणामार्फत होणार होती? या लागवडीत आणखी कोणाचा सहभाग आहे का? असे प्रश्न या कारवाईनंतर उपस्थित होत आहेत.
पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक केशव ठाकरे, सहायक पोलीस निरीक्षक सचिन राठोड यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.
आता केवळ जप्तीपुरती कारवाई न थांबता गांजाच्या लागवडीमागील आर्थिक व्यवहार, संभाव्य पुरवठा साखळी आणि संबंधितांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

### सातव्या सामूहिक ग्रामगीता पारायणाची सांगता,गुरुदेव सेवा मंडळाचा उपक्रम!



**पुसद :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित ग्रंथराज 'ग्रामगीते'चा घरोघरी प्रचार व प्रसार व्हावा, या उदात्त हेतूने ५१ सामूहिक ग्रामगीता पारायणाचा संकल्प श्री गुरुदेव सेवा मंडळ, तालुका शाखा पुसद व स्वाध्याय माऊली भवन, अमरनगर यांच्या संयुक्त विद्यमाने समन्वयाचार्य, हभप विठ्ठल महाराज भोयर यांच्या विशेष प्रयत्नातून दर महिन्याला राबविण्यात येत आहे.
एकूण ५१ पैकी सातव्या सामूहिक ग्रामगीता पारायणाची सांगता रविवारी दि.११करण्यात आली. येथील बंजारा कॉलनीतील हरिओम मंदिर सभागृहात आयोजित या ग्रामगीता पारायण सप्ताहात दररोज सकाळी १२:३० ते ३ या वेळेत हभप, समन्वयाचार्य विठ्ठल महाराज भोयर, गुरुदेव सेवा मंडळाचे तालुकाध्यक्ष प्रा. प्रकाश लामणे, उपाध्यक्ष प्रा. नंदकुमार खैरे, प्रचार प्रमुख राजेंद्र काळबांडे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर सुरडकर, भजन प्रमुख माधव जाधव, रमेश सरागे, किसन गरडे, निळकंठ घाटगे, शिवशंकर नागरे, जयसिंग राठोड, यशवंत देशमुख, शंकर मंदाडे, रमाकांत मामीडवार, महिला प्रतिनिधी छाया लामणे, कुसुम इंगोले, शांताबाई राठोड, उषा पांगारकर, हेमा तरटे, अनिता राठोड, ताई बोरकर, कांताबाई गरडे आदींनी सक्रीय सहभाग नोंदविला.
समारोपीय कार्यक्रमात मंडळाचे अध्यक्ष प्रा प्रकाश लामणे, उपाध्यक्ष प्रा नंदकुमार खैरे, राजेंद्र काळबांडे, रमाकांत मामीडवार, माधव जाधव, शिवशंकर नागरे आदींनी समयोचित विचार मांडले. याप्रसंगी आठवे सामूहिक ग्रामगीता पारायण नोव्हेंबरमध्ये होणार असल्याची माहिती विठ्ठल महाराज भोयर यांनी दिली.

### नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी संशयित गोमांस वाहतूक उघडकीस

**गांधी चौकात पोलिसांची कारवाई,एक युवक ताब्यात.**

**वणी :** नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी वणी शहरात संशयित गोमांस वाहतुकीचा प्रकार समोर आला. शिरपूर मार्गाने दुचाकीवरून आणले जात असल्याच्या संशयावरून सुमारे एक क्विंटल मांस गांधी चौक परिसरात पोलिसांनी जप्त केले असून, एका युवकाला ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना याबाबत माहिती मिळाली. त्यानंतर सुमित नीलावार, सुमित पवार,अमर कुलकटवार आणि संग्राम उईके यांनी संबंधित दुचाकीचा पाठलाग करून गांधी चौक परिसरात दुचाकीस्वाराला पकडले आणि पोलिसांना माहिती दिली.
पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मांस जप्त केले. हे मांस नेमके कोणत्या प्राण्याचे आहे, त्याचा स्रोत काय आहे आणि वाहतुकीमागे कोणाचा सहभाग आहे,याचा तपास सुरू आहे.या प्रकरणाचा पुढील तपास एपीआय प्रियंका चौधरी करीत आहेत.

## जिवाजी महाले हे स्वराज्याचे खरे पाईक - सुधिर देशमुख

### शुर पराक्रमी योद्धा जिवाजी महाले यांची जयंती उत्साहात साजरी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ११ :** रयतेचे राजे शेतकऱ्यांचे कैवारी बहुजन प्रतिपालक कुळवाडी भुषण छत्रपती शिवाजी महाराज यांचे विश्वासू अंगरक्षक जिवाजी महाले यांची जयंती ९ ऑक्टोंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी इतिहासाचा उजाळा देत स्वताच्या जिवाची पर्वा न करता छत्रपती शिवाजी महाराजावर झालेला वार अंगावर घेणारे जिवाजी महाले हे स्वराज्याचे खरे पाईक होते असे विचार संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष सुधिर देशमुख यांनी जिवा महाले यांच्या जयंतीदिनी आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले. पुसद येथिल श्रीरामपुर-कारला रोडवरील जिवाजी महाले चौकात न्हावी समाजबांधवांच्या वतीने पराक्रमी योध्दा जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्य अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन सुधिर देशमुख व जयकुमार भालेकर उपस्थित होते. यावेळी सुधिर देशमुख यांनी जिवाजी महाले यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकला. जयकुमार भालेकर यांनी जिवाजी महाले हे स्वराज्याचे खंदे शिलेदार होते त्यांच्या पराक्रमामुळे व अठरापगड जातीच्या मावळ्यांच्या एकोप्याने छत्रपती शिवरायांना स्वराज्याची निमिर्ती करता आली असे सांगीतले.यावेळी आयोजित कार्यक्रमास उपस्थित गोपाल जाधव,अरविंद पवार,शुभम कुबडे,वसंत घेणेकर,किरण देशमुख,बंडु सोनटक्के,नंदु दवणे,गजानन भालेकर यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

## यवतमाळात डॉ.संगीता शिंदे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्‌घाटन..!

### १२ शैक्षणिक संघटनांचा पाठिंबा, १८ ऑक्टोबरला जिल्हास्तरीय शिक्षक मेळावा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ११ :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व शिक्षण संघर्ष संघटनेच्या अधिकृत उमेदवार डॉ. संगीता सचिंद्र शिंदे (बोंडे) यांच्या यवतमाळ जिल्हा प्रचार कार्यालयाचे उद्घाटन रविवार, ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेच्या मुहूर्तावर करण्यात आले. नऊ लहान बालिकांचे पूजन करून श्रीजी निवास, महादेव मंदिर रोड, येरावार चौक, इंद्रप्रस्थ प्लाझाजवळ या कार्यालयाचा प्रारंभ झाला.



शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर मागील १२ वर्षांपासून संघर्ष करीत असल्याचा दावा डॉ. शिंदे यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे. त्यांना आतापर्यंत १२ शैक्षणिक संघटनांचा पाठिंबा मिळाल्याने यवतमाळ जिल्ह्यातील प्रचाराला गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्यातील प्रचाराचे नियोजन, शिक्षकांशी संवाद आणि संघटनात्मक बांधणी अधिक प्रभावी करण्यासाठी या कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. यानिमित्ताने रविवार, १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता अभ्यंकर विद्यालय, यवतमाळ येथे जिल्हास्तरीय शिक्षक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेश मदने, जिल्हा कार्यवाह संतोष पवार, देवानंद जाधव, सचिन देशपांडे, विनोद चिरडे, सुधीर कानतोडे, विवेक अलोणे, हेरंभ पुंड, सूर्यकांत वरभे, महेश देशकर, अरविंद राव, ज्ञानेश्वर पवार, प्रदीप पुरोहित यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. तसेच डॉ. कृपा पटेल, शुभांगी आवारी, कांचन देशमुख, रोहिणी गजबीज, तृप्ती पाळेकर, शरयू कोंडागिरे, नलिनी घोडाम, गीतांजली मानेकर, उज्वला गिते, साक्षी त्रिपाठी, डॉ. शितल संतोष पवार, कांचन बोरकर यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

## दुष्काळाचे सावट,पशुधन वाचविण्यासाठी चारा नियोजनावर भर!

### आसेगाव येथे चारा साक्षरता कार्यशाळा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. ११ :** संभाव्य दुष्काळाचे संकट लक्षात घेता शेतातील पिकांसोबतच पशुधन वाचविण्याचे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. चारा टंचाईमुळे जनावरांचे हाल होऊ नयेत, यासाठी आतापासूनच नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर ९ ऑक्टोबर रोजी आसेगाव (देवी) येथील पशुचिकित्सालयात शेतकरी व पशुपालकांसाठी चारा साक्षरता अभियानांतर्गत कार्यशाळा घेण्यात आली.



कार्यशाळेत निकृष्ट चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्यासाठी युरिया प्रक्रिया, मुरघास निर्मिती आणि हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाची माहिती प्रात्यक्षिकांसह देण्यात आली. उपलब्ध चाऱ्याची नासाडी टाळणे, जनावरांना सकस आहार देणे तसेच स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सुलेखा नामवाड, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत झाडे आणि डॉ. पियुष झोपे यांनी मार्गदर्शन केले. सरपंच सचिन चव्हाण, पशुधन पर्यवेक्षक, पशुसखी, बचतगट प्रतिनिधी यांच्यासह शेतकरी व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गरब्यातून बळीराजाच्या समृद्धीसाठी देवीला साकडे!

### महागावात १७ ऑक्टोबरला महिला गरबा महोत्सव.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ११ :** एका बाजूला दुष्काळाचे सावट, आर्थिक संकटाने ग्रासलेला बळीराजा आणि महागाईने त्रस्त सर्वसामान्य जनता, तर दुसरीकडे सुख-समृद्धीच्या अपेक्षेने देवीच्या चरणी साकडे घालण्याचा संकल्प! याच सामाजिक जाणिवेतून महागाव येथील माउंट लिटेरा झी स्कूलमध्ये १७ ऑक्टोबर रोजी भव्य महिला गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.




हा सोहळा केवळ नृत्य आणि मनोरंजनापुरता मर्यादित नसून महिला एकजूट, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणार आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती दूर व्हावी, शेतशिवार हिरवेगार व्हावे, बळीराजाच्या घरात सुख-समाधान नांदावे आणि महागाईतून सामान्य जनतेला दिलासा मिळावा, यासाठी आदिशक्ती जगदंबेच्या चरणी सामूहिक आरतीद्वारे प्रार्थना करण्यात येणार आहे. 'बळीराजा सुखी तर जग सुखी' या भावनेतून आयोजित या महोत्सवात महागाव तालुक्यातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## वाढदिवसाला ड्रेस नको, झाड लावा! चिमुकल्या प्रांजलीचा मोठा संदेश

### वडिलांनी वडाचे झाड आणि ट्रीगार्ड देत पूर्ण केला लेकीचा पर्यावरणपूरक संकल्प

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ११ :** वाढदिवस म्हटला की नवीन कपडे, केक आणि भेटवस्तूंचा हट्ट करणाऱ्या मुलांच्या गर्दीत उमरखेड येथील प्रांजली नारायण शेळके हिने आपल्या अनोख्या इच्छेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. "बाबा, वाढदिवसाला नवीन ड्रेस नको, त्याऐवजी झाड लावूया!" अशी विनंती करत इयत्ता सातवीत शिकणाऱ्या या चिमुकलीने पर्यावरण संवर्धनाचा मोलाचा संदेश दिला आहे.



श्री गुरुदेव गोरोबा विद्यामंदिर येथे शिक्षण घेणाऱ्या प्रांजलीच्या या विचाराचे तिचे वडील नारायण शेळके यांनी मनापासून स्वागत केले. मुलीच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी वडाचे झाड आणि त्याच्या संरक्षणासाठी ट्रीगार्ड उपलब्ध करून देत तिचा संकल्प पूर्ण केला. आज वाढदिवसाच्या नावाखाली अनावश्यक खर्च आणि दिखाव्याला महत्त्व दिले जात असताना, एका चिमुकलीने स्वतःच्या आनंदापेक्षा निसर्गाच्या संरक्षणाला प्राधान्य दिले, ही बाब निश्चितच विचार करायला लावणारी आहे. केवळ झाड लावून थांबण्याऐवजी त्याच्या संगोपनाची गरज ओळखून ट्रीगार्डची मागणी करण्यामागेही प्रांजलीची पर्यावरणाप्रती असलेली जाणीव दिसून येते. वाढदिवसाला महागडी भेटवस्तू देण्यापेक्षा एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची संस्कृती रुजली, तर पर्यावरण संवर्धनाला खऱ्या अर्थाने हातभार लागेल. प्रांजलीच्या या छोट्याशा कृतीतून मोठ्यांनीही निसर्गाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## आदिवासी लोककलेचा युवा महोत्सवात दमदार ठसा!

### राजीव महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून पारंपरिक नृत्याचे प्रभावी सादरीकरण



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. ११ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सव २०२६ मध्ये राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, झरी येथील विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्याच्या माध्यमातून आदिवासी संस्कृती, परंपरा आणि लोक जीवनाचे प्रभावी दर्शन घडविले.

पारंपरिक वेशभूषा, लोक वाद्ये आणि आकर्षक नृत्य रचनेच्या संगमातून विद्यार्थ्यांनी आदिवासी लोककलेचा ठसा उमटविला.

आदिवासी समाजाची समृद्ध सांस्कृतिक परंपरा जपणाऱ्या या नृत्य प्रकारात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जोश पूर्ण नृत्याविष्कार आणि पारंपरिक सादरीकरणातून त्यांनी आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. या सादरीकरणाला उपस्थिता कडून दाद मिळाली. या नृत्य संघाला समन्वयक प्रा. संतोष सोनुने आणि महिला समन्वयक प्रा. सुमांजली केशट्टी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सरावासाठी घेतलेली मेहनत आणि सांघिक समन्वय त्यांच्या सादरीकरणातून दिसून आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एन. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन दिले. राजीव महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे आदिवासी लोक कलेची समृद्ध परंपरा नव्या पिढीसमोर मांडण्याची संधी मिळाली. या सहभागाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## घारफळकर विद्यालयात विज्ञान प्रकल्पांचे प्रदर्शन..! विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला प्रयोगांची जोड!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. ११ :** मातोश्री नानीबाई घारफळकर विद्यालय, बाभुळगाव येथे आयोजित विज्ञान प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर करून वैज्ञानिक जिज्ञासा, सर्जनशीलता आणि प्रयोगशीलतेचे दर्शन घडविले. विद्यालयाचे मुख्याध्यापक रामटेके सर यांच्या हस्ते प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.



प्रदर्शनीत विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित आकर्षक व उपयुक्त प्रकल्प मांडण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रकल्पांची कार्यपद्धती आणि त्यामागील वैज्ञानिक तत्त्वे परीक्षकांना समजावून सांगितली. काही विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. मातोश्री नानीबाई घारफळकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका पाटील, दिघाडे आणि गावंडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. पाठांतरापलीकडे जाऊन कृतीतून विज्ञान शिकण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरला. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, निरीक्षणक्षमता आणि समस्या सोडविण्याच्या कौशल्यांना प्रोत्साहन मिळाले. प्रदर्शनीच्या आयोजनासाठी गजबे, भिसे, धुर्वे, भगत, निघोट, भेंडे, मानेकर, शुभम कडू, गारघाटे, गाडेकर, स्थूल, जांभुरे, बावणे आणि आखरे या शिक्षकांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. शिक्षकेतर कर्मचारी समीर गायकवाड, सूरज कांबळे, कुणाल महाजन, अभय पाटील, प्रफुल गोंडाणे आणि रोशन तुरकाने यांनीही परिश्रम घेतले. प्रदर्शनीला विद्यार्थी, शिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मेळघाटातील सावकारी व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह; परवानाधारक सावकारांचीही तपासणी करण्याची मागणी

**मेळघाट/वार्ताहर**

मेळघाटातील कर्जबाजारी शेतकरी व गरजू नागरिकांकडून होणाऱ्या सावकारी वसुलीच्या पद्धतीबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होत आहेत. अमरावती जिल्ह्यात सावकारीविरोधात विविध ठिकाणी कारवाई होत असल्याची माहिती समोर येत असतानाच, केवळ विनापरवाना सावकारांवरच कारवाई न करता परवानाधारक सावकारांच्या व्यवहारांची आणि कागदपत्रांचीही नियमित तपासणी करण्यात यावी, अशी मागणी पुढे येत आहे.

शासनाने सावकारी व्यवसायासाठी ठरवून दिलेले नियम व कायदेशीर प्रक्रिया असताना, प्रत्यक्ष व्यवहारात त्याचे पालन केले जाते का, याची पडताळणी होणे आवश्यक आहे. काही ठिकाणी कर्जाच्या कागदपत्रांवर नमूद केलेली रक्कम, व्याजाची गणना आणि प्रत्यक्ष वसुली यामध्ये तफावत असल्याच्या तक्रारी व चर्चा स्थानिक पातळीवर होत असल्याचे सांगितले जाते.

मात्र, अशा तक्रारींची संबंधित विभागाकडून स्वतंत्रपणे पडताळणी होणे गरजेचे आहे.दाखविलेले कागदपत्र आणि प्रत्यक्ष व्यवहार तपासणे आवश्यक कर्जदार शेतकऱ्यांना दिली जाणारी पावती, कर्जाची रक्कम, व्याजदर, वसुलीचा तपशील तसेच खातेवहीतील नोंदी शासनाच्या नियमांनुसार आहेत का, याची सखोल तपासणी होणे गरजेचे आहे. विभागीय तपासणीच्या वेळी सावकारांकडून सादर करण्यात येणारी कागदपत्रे आणि प्रत्यक्ष व्यवहारातील नोंदी यांची पडताळणी केली जाते का, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. काही प्रकरणांत वेगवेगळ्या पावती पुस्तिका किंवा स्वतंत्र नोंदी ठेवल्या जात असल्याची तक्रार असल्यास, त्याचीही नियमानुसार चौकशी होणे आवश्यक आहे.

तक्रारीची वाट न पाहता नियमित तपासणीची गरज ग्रामीण भागातील कर्जबाजारी शेतकरी अनेकदा आर्थिक किंवा सामाजिक दबावामुळे तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. त्यामुळे केवळ तक्रार प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्याऐवजी संबंधित विभागाने वेळोवेळी सावकारांच्या कर्जखाती, पावती पुस्तिका, व्याजवसुली, व्यवहार नोंदी आणि परवान्याच्या अटींची तपासणी करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

अमरावती जिल्ह्यात निबंधक भुयार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सावकारीविरोधात विविध ठिकाणी कारवाई होत असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे आता परवानाधारक सावकारांच्या व्यवहारांचीही अशाच प्रकारे सखोल तपासणी होते का, याकडे मेळघाटातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. कायद्याने परवाना घेतला असला तरी त्या परवान्याच्या अटी आणि शासनाच्या नियमांचे पालन प्रत्यक्षात होते का, हे तपासणे तितकेच महत्त्वाचे आहे. पुढे प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## श्री समर्थ विद्यालयात राबविले स्वच्छता अभियान

**अमरावती/का.प्र.**



अमरावती शहरातील नावलौकिकअसलेल्या श्री समर्थ विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व दिवंगत पंतप्रधान लाल बहाद्दुर शास्त्री यांच्या जयंती निमित्त शाळा स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शाळेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तथा स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी या स्वच्छता अभियानात उत्स्फुर्तपणे भाग घेऊन शालेय वर्गातल्या, प्रयोगशाळा, कार्यालय, तथा शालेय परिसर स्वच्छ केला.शाळेच्या वर्ग ६ वी च्या त्रिशा रमेश मंडळे व नेहा अनिल गाढवे या विद्यार्थिनींनी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर भाषणे दिले. त्यानंतर मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी एकत्रितपणे वर्ग खोल्या, प्रयोगशाळा व संपूर्ण शालेय परिसरात स्वच्छता अभियान राबविले.कार्यक्रमाचे संचालन तसेच आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षक ममता तायडे यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांचा सहभाग लक्षणीय होता. मुख्याध्यापक धनंजय पाठक यांच्या मार्गदर्शनात शाळेचे स्वच्छता समिती प्रमुख पुरुषोत्तम जिचकार व सारिका जोशी यांच्या नेतृत्वाखाली शालेय स्वच्छता अभियानाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले. स्वच्छता अभियानानंतर स्वच्छता मोहिमेत सहभागी सर्वांना शाळेच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला.

## सेवा संकल्प अभियानातून महावितरणच्या विविध सेवांचा २,३०० ग्राहकांना लाभ

**अमरावती/का.प्र.**



महावितरणच्या अमरावती परिमंडळातर्फे राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'चा थेट लाभ परिमंडळातील तब्बल २ हजार २९५ ग्राहकांना मिळाला असून, आणखी ६४७ कामे प्रगतीपथावर आहेत. आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामांमध्ये अमरावती जिल्ह्यातील ८९५, तर यवतमाळ जिल्ह्यातील २ हजार कामांचा समावेश आहे.

मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणतर्फे अमरावती परिमंडळात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ दरम्यान हे विशेष अभियान राबवले जात असून या अभियानाअंतर्गत तालुकानिहाय 'सेवा सेतू कॅम्प' उभारण्यात आले आहे. एकाच छताखाली नवीन वीज जोडणी, प्रलंबित वीज जोडण्या तत्काळ देणे, ग्राहकांच्या तक्रारी सोडवणे, नाव व पत्त्यात बदल करणे, वीज भारात सुधारणा करणे, तसेच 'महाराष्ट्र रूफ टॉप सोलर आवासीय (स्मार्ट) योजना' आणि 'पीएम सूर्यघर मोफत वीज योजने'ची जनजागृती करून ग्राहकांना थेट लाभ मिळवून देण्याला प्राधान्य देण्यात येत आहे.

या अभियानादरम्यान मागील २४ दिवसांत ४८३ ग्राहकांना नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या असून २२१ जोडण्यांचे काम प्रगतीपथावर आहे. यासोबतच १४० ग्राहकांचा वीज भार बदलणे, ४१२ ग्राहकांच्या नावात सुधारणा आणि ८२ ग्राहकांचा पत्ता बदलण्यात आला आहे. तसेच ५६५ बिलिंगविषयक, १०८ रूफटॉप सोलर, ३१ सौर कृषी पंप आणि ६८ इतर अशा एकूण ७७२ तक्रारींचे घटनास्थळीच निवारण करण्यात आले आहे.

अभियानात सौर ऊर्जा योजनांनाही नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. दारिद्र्यरेषेखालील किंवा १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर असणाऱ्या ग्राहकांसाठी लागू असलेल्या 'महाराष्ट्र रूफ टॉप आवासीय (स्मार्ट) योजने'बाबत ७० ग्राहकांनी विचारणा केली असून ४९ ग्राहकांनी यात सहभाग नोंदवला आहे. या योजनेत १ किलोवॅटची सौर यंत्रणा छतावर बसवली जाते, ज्यामध्ये दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना २५०० रुपये, अनुसूचित जाती/जमाती वर्गातील ग्राहकांना ५००० रुपये आणि इतर ग्राहकांना १० हजार रुपये भरावे लागतात, तर उर्वरित रक्कम केंद्र व राज्य सरकारकडून अनुदान म्हणून दिली जाते.

तसेच 'पीएम सूर्यघर मोफत वीज योजने'अंतर्गत २८७ ग्राहकांनी माहिती घेतली असून २५० ग्राहक सहभागी झाले आहेत. या योजनेत छतावर सौर यंत्रणा बसवणाऱ्या ग्राहकांना ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. हे सेवा संकल्प अभियान येत्या १७ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असल्याने परिमंडळातील जास्तीत जास्त वीज ग्राहकांनी महावितरणच्या सेवा सेतू कॅम्पला भेट देऊन योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## शाळेजवळील दोन गतिरोधक अज्ञात व्यक्तीकडून हटविले

**लेहेगाव/वार्ताहर**

नेरपिंगळाई ते लेहेगाव मार्गावरील विद्यानिकेतन शाळेजवळ सार्वजनिक बांधकाम विभागाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी बसविलेले दोन गतिरोधक अज्ञात व्यक्तीने हटविल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेची सार्वजनिक बांधकाम विभागाला कोणतीही पूर्वकल्पना नव्हती. गतिरोधक हटविल्याची माहिती आठवड्याच्या अखेरीस मिळाल्यानंतर आता संबंधित अज्ञात व्यक्तीविरुद्ध सोमवारी पोलिसांत एफआयआर दाखल करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे मोर्शी येथील कनिष्ठ अभियंता सागर धोटे यांनी दिली.

नेरपिंगळाई ते लेहेगाव हा रस्ता दिवसभर वर्दळीचा असून, या मार्गावरून मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते.



विद्यानिकेतन शाळा मुख्य रस्त्यालगत असल्याने विद्यार्थ्यांची सतत ये-जा सुरू असते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच संभाव्य अपघात टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने शाळेजवळ दोन गतिरोधक बसविले होते.सार्वजनिक रस्त्यावरील वाहतूक सुरक्षेच्या उपाययोजना संबंधित विभागाच्या परवानगीशिवाय हटविण्यात आल्या असतील, तर अशा प्रकाराची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

सोमवारी पोलिसांत एफआयआर दाखल होणार या प्रकरणाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे मोर्शी येथील कनिष्ठ अभियंता सागर धोटे यांनी माहिती देताना सांगितले की, विभागाला गतिरोधक हटविल्याची पूर्वकल्पना नव्हती. हा प्रकार आठवड्याच्या अखेरीस समजल्यानंतर सोमवारी अज्ञात व्यक्तीविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत प्रशासनाने तातडीने गतिरोधक पुन्हा बसवावेत आणि अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

## दुर्गा-शारदा उत्सवासाठी आसेगाव पोलिसांचा सतर्कतेचा इशारा

### रहदारीला अडथळा नको; डीजे, लेझर लाईट व वादग्रस्त देखाव्यांवर निर्बंध

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**



आगामी दुर्गा व शारदा देवी उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा, यासाठी आसेगाव पूर्णा पोलिसांकडून खबरदारी घेण्यात येत आहे. याच अनुषंगाने शनिवारी (१० ऑक्टोबर) सायंकाळी ५.३० ते ७ वाजेदरम्यान पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. अमरावती ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना विविध सूचना देण्यात आल्या.

परिवीक्षाधीन पोलीस उपअधीक्षक वैशाली भोये व आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सतीश खेडेकर यांनी उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले. मंडळांनी मंडप व स्टेज उभारताना वाहतुकीला अडथळा होणार नाही, याची काळजी घ्यावी. विद्युत मीटर अधिकृत असावे, मूर्तीची उंची मर्यादित ठेवावी, तसेच वादग्रस्त देखावे, आक्षेपार्ह बॅनर व पोस्टर लावू नयेत, अशा सूचना देण्यात आल्या.

उत्सवादरम्यान पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे आणि वादग्रस्त गाणी वाजवू नयेत. बळजबरीने वर्गणी गोळा करू नये. प्रत्येक मंडळाने स्वयंसेवक नेमून सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, तसेच मूर्तीच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असेही सांगण्यात आले. स्थापना व विसर्जन मिरवणुका ठरवून दिलेल्या पारंपरिक मार्गानेच काढाव्यात. विसर्जनाची तारीख व वेळ पाळावी, लेझर लाईटचा वापर टाळावा आणि उत्सवादरम्यान कोणीही मद्यपान करू नये, अशा स्पष्ट सूचना पोलिसांनी दिल्या. मंडळांनी ऑनलाइन परवानगी अर्ज भरून पोलिसांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले. यावेळी गुप्तवार्ता विभागाचे सचिन सालफळे यांनीही मार्गदर्शन केले. बैठकीला पोलीस ठाण्याचे दोन अधिकारी, १० पोलीस अंमलदार, ४० पोलीस पाटील, दुर्गा व शारदा मंडळांचे ६० ते ७० पदाधिकारी व सदस्य, पाच तंटामुक्ती समिती अध्यक्ष आणि शांतता समितीचे १५ सदस्य उपस्थित होते.

## अंजनगाव सुर्जीचा प्रशासकीय कारभार 'सक्षम महिलां'च्या हाती

### मंदिरात मूर्तीची पूजा, तर प्रशासनात जिवंत दुर्गाचा जागर !

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



सध्या संपूर्ण देशात आणि राज्यात नवरात्रोत्सवाचा मोठा उत्साह आहे. एकीकडे शहरात दुर्गा मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून अतिशय भक्तिभावाने पूजा-अर्चा केली जात असताना, दुसरीकडे अंजनगाव सुर्जी शहर आणि तालुक्याचा संपूर्ण प्रशासकीय कारभार प्रत्यक्षात 'आधुनिक दुर्गा' अवतार असलेल्या सक्षम महिला अधिकाऱ्यांनी अतिशय समर्थपणे सांभाळला आहे. शहराच्या तांत्रिक विकासापासून ते शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत सर्वत्र या महिला शक्तीचा ठसा उमटत असून, अंजनगाव सुर्जीमध्ये महिला सक्षमीकरणाचे एक जिवंत आणि प्रेरणादायी उदाहरण पाहायला मिळत आहे.

तालुक्याच्या महसूल प्रशासनाची मुख्य धुरा तहसीलदार पुष्पा सोळंके ( दाभेराव ) यांच्या खांद्यावर आहे. सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यात आणि शेतकऱ्यांच्या अडीअडचणींमध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. कायदा व सुव्यवस्थेचा विचार केला, तर अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनमध्ये दुय्यम ठाणेदार साहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून प्रक्षाली काळे या अत्यंत सक्षमपणे आपली जबाबदारी पार पाडत असून गुन्हेगारीला वचक निर्माण करत आहेत.तालुक्यातील भावी पिढी घडवणाऱ्या शिक्षण विभागाची महत्त्वाची जबाबदारी प्रभारी गटशिक्षणाधिकारी शिला आठवले या समर्थपणे पेलत आहेत. तर ग्रामीण भागाचा विकास आणि बळीराजाच्या मदतीसाठी जि.प.ग्रामीण पाणीपुरवठा विभागात कनिष्ठ अभियंता म्हणून आणि कृषी विभागातही महिला अधिकारी भारती जाधव अत्यंत तत्परतेने कार्यरत आहेत.शहराच्या विकासाचा कणा असलेल्या अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत तर चक्क महिला अभियंत्यांची फौजच कार्यरत आहे.

यामध्ये प्रामुख्याने सुप्रिया रिठे विद्युत अभियंता,वैष्णवी काळे बांधकाम अभियंता, वैष्णवी अहीर घरकुल अभियंता, सविता सालवडे प्रकल्प व्यवस्थापक, शहराच्या तांत्रिक आणि पायाभूत विकासाच्या या सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्या या महिला अभियंता अत्यंत कौशल्याने हाताळत आहेत. त्यांना लोकप्रतिनिधी म्हणून उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाणे आणि सभापती सौ. उज्वला कविटकर, सौ सुनिता बाळे सभापती तर न.प. सभागृहात गटनेता म्हणून सौ योगिता प्रदिप देशमुख आपली जबाबदारी पार पाडत असून यांची भक्कम राजकीय व सामाजिक साथ लाभत आहे. याशिवाय, सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) स्थापत्य अभियंता म्हणून शिल्पा अस्वार या महिला अधिकारी आपले योगदान देत आहेत. तर दुय्यम निबंधक म्हणून तालुक्यात खरेदी विक्रीशी असलेला महत्वाचा पदभार महिला अधिकारी सक्षम पणे संभाळत आहेत एकंदरीत, अंजनगाव सुर्जी शहर आणि तालुक्याचा संपूर्ण गाडा महिला अधिकारीच अत्यंत सक्षमपणे ओढत आहेत. नवरात्रीचा खरा संदेश केवळ पूजा-अर्चा करणे हा नसून, स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित न राहता ती प्रशासक, अभियंता, पोलीस अधिकारी म्हणूनही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करू शकते, हेच अंजनगाव सुर्जीने सिद्ध केले आहे.आपण मंदिरांमध्ये ज्या दुर्गेच्या मूर्तीची पूजा करतो, त्याच दुर्गेचा जिवंत आणि कार्यशील अवतार अंजनगाव सुर्जीकर नागरिक रोज आपल्या सेवेत पाहत आहेत. हा महिला सक्षमीकरणाचा अनोखा पॅटर्न येणाऱ्या पिढीसाठी नक्कीच एक 'दीपस्तंभ' ठरणार आहे.

## संक्षिप्त

### ऑर्थोपेडिक संशोधनाचे जागतिक स्तरावर सादरीकरण

**अमरावती -** अमरावती तसेच विदर्भातील ऑर्थोपेडिक वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे, डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (PDMMC), अमरावती येथे



करण्यात आलेले क्लिनिकल संशोधन जपानमधील क्योटो आयोजित प्रतिष्ठित ४६ व्या SICOT ऑर्थोपेडिक वर्ल्ड कॉंग्रेसमध्ये सादर करण्यात आले.PDMMC तसेच अमरावती ऑर्थोपेडिक असोसिएशनचे प्रतिनिधित्व करत डॉ. संग्राम देशमुख यांनी गुडघा आणि नितंबाच्या जटिल दुखापतींच्या प्रगत शस्त्रक्रियात्मक उपचारांवर आधारित दोन विशेष ई-पोस्टर्स सादर केले.या संशोधनाचे सहलेखक तसेच मार्गदर्शक डॉ. गणेश पुंडकर, प्राध्यापक आणि ऑर्थोपेडिक्स विभागप्रमुख, इञ्श्शण हे होते.या संशोधनाची निवड अमरावतीमध्ये उपलब्ध असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्लिनिकल उपचारपद्धतीचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. SICOT Scientific Program Committee कडे ९५ पेक्षा अधिक देशांमधून ५,००० हून अधिक संशोधन सारांश (Abstracts) प्राप्त झाले होते. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे, अमरावतीचे माननीय अध्यक्ष श्री. हर्षवर्धन देशमुख यांच्या दूरदर्शी नेतृत्वाबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख यांनी दिलेल्या सातत्यपूर्ण प्रशासकीय मार्गदर्शन व प्रोत्साहनाबद्दल आणि ऑर्थोपेडिक्स विभागाचे प्रमुख डॉ. गणेश पुंडकर यांनी दिलेल्या अमूल्य क्लिनिकल मार्गदर्शन, सहकार्य आणि सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल मनःपूर्वक आभारी असल्याचे कळविले आहे.'

### क्रीडा स्पर्धेत राजश्री शाहू सायन्स कॉलेजचे यश

**चांदुर रेल्वे -** येथे आयोजित तालुका स्तरीय शालेय



क्रिडा स्पर्धेत राजर्षी शाहू विज्ञान व अतुल जगताप कला कनिष्ठ महाविद्यालयाच्या चमूने १९ वर्षा खालील मुलांमध्ये झालेल्या मैदानी खेळात ३००० मीटर रनिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक यश रवींद्र देवघरेने पटकविला. ८०० मीटर रनिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक निशांत अरविंद गडलिंग याने तर १०० मीटर रनिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक अंशुल बंडू बनसोड यांनी पटकावला. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अतुल विद्या मंदिर संस्थेच्या अध्यक्षा प्रा. उत्तरा वी. जगताप, सचिव प्रा.वीरेंद्र भाऊ जगताप तसेच परिक्षीत वी. जगताप, प्राचार्य डॉ. पराग आर वडनेरकर व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

### पुलाजवळ खड्डयांमुळे अपघातांचा धोका

**बेलोरा -** बेलोरा गावापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर बांधण्यात आलेल्या छोट्या पुलाच्या दोन्ही बाजूंना पुरेसा मुरूम न टाकल्यामुळे मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्डयांमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत



असून, या ठिकाणी वारंवार छोटे-मोठे अपघात होत आहेत. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराच्या कामाबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.पुलाच्या दोन्ही बाजूंना टाकण्यात आलेला मुरूम अपुरा असल्याने रस्त्याच्या कडेला खड्डे निर्माण झाले आहेत. या खड्डयांमुळे एका ऑटोरिक्षालाही अपघात होऊन तो पलटी झाल्याची घटना घडली. तसेच अनेक वाहनांचे ॲक्सल तुटत असल्याने वाहनचालकांचे आर्थिक नुकसान होत आहे. दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या हातातील लहान बाळ खड्डयांमुळे झालेल्या अपघातात खाली पडून जखमी झाल्याची घटनाही समोर आली आहे.याशिवाय, परिसरात चार ठिकाणी नाल्यांसाठी खोदकाम करून खड्डे तसेच सोडण्यात आले आहेत. या खोल खड्डयांमुळेही अपघातांचा धोका वाढला आहे. संबंधित काम करताना योग्य खबरदारी न घेतल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.संबंधित विभागाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन पुलाच्या दोन्ही बाजूंना बारीक मुरूम टाकून खड्डे बुजवावेत. तसेच नाल्यांसाठी खोदण्यात आलेले खड्डेही त्वरित बुजवून रस्ता सुरक्षित करावा, अशी मागणी बेलोरा व परिसरातील गावांतील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### शहरात कलावंतांसाठी कलामंचाचे उद्घाटन

**अमरावती -** अमरावती शहरातील विविध क्षेत्रांतील



कलावंतांना एकत्र आणून त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांचा उत्कर्ष साधण्यासाठी एक नवीन कलामंच सुरू करण्यात आला आहे. 'संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषद अमरावती जिल्हा' व 'शिवस्वर कराओके क्लब' यांच्या संयुक्त विद्यमाने या कलामंचाची स्थापना करण्यात आली. या कलामंचाचे उद्घाटन स्वामी विवेकानंद थीम पार्क व्ही.एम.व्ही. रोड, अमरावती येथे उत्साहात झाले. या उपक्रमांतर्गत शहरातील कलावंतांना आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी सायंकाळी ६ वाजता आपली कला सादर करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. कलामंचाचे उद्घाटन आ.सुलभा खोडके,'गीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषद, अमरावती जिल्हा) वर्षा धाबे (प्रदेशाध्यक्ष, संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषद,यांच्या हस्ते मनाली तायडे (प्रदेश संघटक, जिजाऊ ब्रिगेड संगीता राऊत ,भोजराज काळे (स्वीकृत नगरसेवक, अमरावती महानगरपालिका) प्रशांत डवरे (उपाध्यक्ष, पंजाबराव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. व शहराध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस अमरावती) राजा राऊत,ॠतुराज राऊत (राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस शहराध्यक्ष, अमरावती शहर) हिंमतराव काळे (कार्याध्यक्ष, संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषद अमरावती जिल्हा) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.यावेळी 'संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषद अमरावती जिल्हा' व 'शिवस्वर कराओके क्लब' यांनी सर्व नागरिक, रसिक प्रेक्षक आणि कलाप्रेमींना कला मंचाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**पश्चिम बंगाल,पुडूचेरी, तामिळनाडू या राज्यांतील पाच विधानसभा मतदारसंघांत झालेल्या पोटनिवडणुकीचे आणि आसाममध्ये नागांव लोकसभा मतदार संघात झालेल्या पोटनिवडणुकीचे निकाल अपेक्षित आहेत.**

# 'पोटनिवडणुकांचा अन्वयार्थ!

पश्चिम बंगालमधील नंदिग्राम आणि रेजीनगर या विधानसभा मतदारसंघांतील पोट निवडणूक सत्ताधारी भाजपने जिंकली आहे.पुडूचेरी या केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणूक सत्ताधारी पक्ष ऑल इंडिया एन.रंगासामी कॉंग्रेसने जिंकली आहे.तामिळनाडूमधील विधान सभेच्या दोन पोटनिवडणुकांत सत्ताधारी टीव्हीके या पक्षाने विजय मिळवला आहे आसाममधील नागांव लोकसभा मतदार संघात झालेल्या पोटनिवडणुकीत, तेथे सत्तेवर असलेल्या भाजपने विजय प्राप्त केला आहे.

पोटनिवडणुकीत साधारणत: तेथील सत्ताधारी पक्ष विजयी होतो अशी परंपरा आहे,ती परंपरा यावेळीही कायम राहिली आहे. पश्चिम बंगालमधील नंदिग्राम मतदार संघातील पोटनिवडणूक सुवेंदू अधिकारी ( मुख्यमंत्री )यांनी त्या जागेचा राजीनामा दिला म्हणून घेण्यात आली होती.सुवेंदू अधिकारी, मे महिन्यात झालेल्या विधान सभा निवडणुकीत,नंदिग्राम व भवानीपूर या दोन मतदारसंघातून निवडून आले होते.नंतर त्यांनी नंदिग्राम येथील जागेचा राजीनामा देऊन भवानीपूर येथील जागा आपल्याकडे कायम ठेवली होती.त्यामुळे नंदिग्राम येथे पोटनिवडणूक घेण्यात आली होती.राज्यातील रेजीनगर येथील जागेचा हुमायून कबीर यांनी राजीनामा दिल्याने तेथे पोटनिवडणूक घेण्यात आली होती.मे महिन्यात पश्चिम बंगाल मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत आम जनता उन्नयन पार्टीचे सर्वेसर्वा हुमायून कबीर यांनी रेजीनगर व नोवडा या दोन मतदारसंघातून निवडणूक लढवली होती त्यापैकी रेजीनगर जागेचा त्यांनी राजीनामा दिल्याने त्या ठिकाणी पोटनिवडणूक घेण्यात आली होती.रेजीनगर मतदारसंघातील पोटनिवडणु कीत हुमायून कबीर यांचा मुलगा गुलाम नबी आझाद हा उमेदवार होता.

मात्र तो पोटनिवडणुकीत पराभूत झाला.मुस्लीम बहुसंख्य असलेल्या या मतदारसंघात भाजपाच्या उमेदवाराने आझादचा सुमारे पंचाहत्तर हजार मताधिक्याने पराभव केला.मुस्लिम बहूल मतदारसंघातील (रेजीनगर)भाजपाच्या उमेदवाराचा विजय निश्चितच आश्चर्य करण्यासारखा आहे.विरोधी पक्षांनी मात्र,भाजपाने हा विजय दहशतीच्या जोरावर मिळवल्याचा आरोप केला आहे.आश्चर्याची गोष्ट अशी आहे की,सत्तर टक्के मुस्लिम लोकसंख्या असलेल्या काही बुथ्सवर भाजपाच्या उमेदवाराला ८० ते ९० टक्के मतदान झाल्याचे बोलले जात आहे.आम जनता उन्नयन पार्टीचे सर्वेसर्वा हुमायून कबीर जे विधानसभा निवडणुकीत रेजीनगर मतदारसंघातून मोठे मताधिक्य घेऊन विजयी झाले होते,त्यांनी राजकारणातून निवृत्त होण्याचे संकेत दिले आहेत.

नंदिग्राम हा मतदारसंघ भाजपाचा बालेकिल्ला असल्याने तेथील भाजपचा विजय आश्चर्यकारक मानता येणार नाही. २०२१साली पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत नंदिग्राम येथून सुवेंदू अधिकारी,राज्याचे मुख्यमंत्री यांनी माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा परा भव केला होता.मात्र भाजपाच्या विजयी उमेदवाराला मिळालेले मताधिक्य हे आश्चर्य



करण्यासारखे आहे.नंदिग्राममध्ये भाजपाच्या उमेदवाराने कॉंग्रेसच्या उमेद वाराचा सुमारे एक लाख तेवीस हजार मताधिक्याने पराभव केला आहे.विधान सभा निवडणुकीत सुवेंदू अधिकारी यांना मिळालेल्या मताधिक्यापेक्षा,या खेपेस मिळालेले मताधिक्य खूपच जास्त आहे. नंदिग्राममध्ये ममतांच्या नेतृत्वाखालील गटाने कॉंग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा दिला होता.मात्र रेजीनगर मतदारसंघात ममतांचा उमेदवार चौथ्या क्रमांकावर फेकला गेल्याने,ममतांना आत्मपरीक्षण करावे लागेल.कॉंग्रेस आणि डावे पक्ष यांची कामगिरीही चांगली झालेली नाही.त्यांनाही आत्मचिंतन करण्याची गरज आहे. तामिळनाडूमध्ये मदूरंतकम आणि धारा पूरम या मतदारसंघांतील पोटनिवडणूक निवडणूक जिंकून,तेथील सत्ताधारी पक्ष,टीव्हीकेने आपले स्थान बळकट केले आहे.या दोन मतदारसंघांत विधानसभा निवडणुकीत अण्णा द्रमुकचे उमेदवार निवडून आले होते.

आसाममधील नागांव लोकसभा मत दारसंघातील पोटनिवडणुकीत भाजपचा दणदणीत विजय झाला आहे.कॉंग्रेसचे खासदार प्रद्युत बोरडोलोई यांनी विधान सभा निवडणुकीपुर्वी पक्षाचा राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर आपल्या खासदारकीचा राजीनामा दिला होता.त्यामुळे नागांव लोकसभा मतदार संघात पोटनिवडणूक घ्यावी लागली होती.प्रद्युत बोरडोलोई यांनी कॉंग्रेसच्या तिकिटावर नागांव मतदारसंघातून दोन वेळा ( २०१९ आणि २०२४ ) निवडणूक जिंकली होती.मुस्लिम बहूल नागांव मत दारसंघातून भाजपाचा झालेला प्रचंड विजय,कॉंग्रेस करता आत्मपरीक्षण करा यला लावणारा आहे.नागांव मतदारसंघा मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपनेदुसऱ्या क्रमांकावरील ऑल इंडिया युना यटेड डेमॉक्रॅटिक फ्रंटच्या उमेदवाराचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला आहे.या पोटनिवडणुकीत भाजप उमेदवाराला सुमारे सात लाख चौदा हजार मते मिळत असताना, दुसऱ्या क्रमांकावरील ऑल इंडिया? युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटच्या उमे दवाराला सुमारे पाच लाख बहात्तर हजार मते मिळाली.कॉंग्रेसचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला.त्याला केवळ एक लाख एकोणतीस हजार मते मिळाली.अशाप्रकारे नागांव पोटनिवडणु कीत मुस्लिम समाजाने मोठ्या प्रमाणात कॉंग्रेसकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले आहे. रायजोर दल या पक्षाचे सर्वेसर्वा अखिल गोगोई यांनी असा दावा केला आहे की कॉंग्रेसच्या खराब कामगिरीसाठी प्रदेशा ध्यक्ष तरूण गोगोई हे सर्वस्वी जबाबदार आहेत.एआययुडीएफचे उमेदवार आणि पक्षाचे सर्वेसर्वा बद्रुद्दीन अजमल यांनी जेंव्हा नागांव मतदारसंघातून आपली उमेदवारी घोषित केली तेंव्हाच ही गोष्ट निश्चित झाली होती,ती म्हणजे अजमल हे मुस्लिम मतांचे विभाजन घडवतील व त्याचा फायदा भाजपाला मिळेल.मात्र बद्रुद्दीन अजमल यांना मिळालेली मोठ्या प्रमाणातील मते लक्षात घेता कॉंग्रेसच्या उमेदवाराने मुस्लिम मतांची विभागणी करून भाजपाचा फायदा करुन दिलेला दिसत आहे.२०१९ आणि २०२४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत नागांव मतदारसंघात विजय मिळवणारा कॉंग्रेस पक्ष पोटनिवडणुकीत तिसऱ्या स्थानावर फेकला गेला ही गोष्ट पक्षाला नामुष्की आणणारी आहे.चार राज्यांत झालेल्या पोटनिवडणुकांचे निकाल भाजपा आणि टीव्हीके या पक्षांसाठी दिलासा देणारे असले तरी कॉंग्रेससाठी मात्र ते निकाल निराशाजनकच म्हणावे लागतील.

**अभय गोखले**



# देवीचे माहात्म्य!

देवीच्या उपासनेची परंपरा पुष्कळ पूर्वीपासून भारतात चालत आलेली आहे. देवीचे मूळ रूप निर्गुण असले, तरी तिच्या सगुण रूपाची उपासना करण्याची परंपरा भारतात प्रचलित आहे. कुलदेवी, ग्रामदेवी, शक्तीपीठ आदी रूपांमध्ये देवीच्या विविध सगुण रूपांची उपासना केली जाते. हिंदु संस्कृतीमध्ये जितके महत्त्व देवाला आहे, तितकेच देवीलाही आहे, हे विशेषत्वाने सांगावेसे वाटते.

भारतात अन्य संप्रदायांप्रमाणेच शाक्त संप्रदायही कार्यरत आहे. पंचायतन पूजेमध्ये शिव, विष्णु, गणपति आणि सूर्य यांसमवेत देवीच्या पूजनाचेही विशेष महत्त्व आहे. उपासकांच्या हृदयात देवीला विशेष स्थान असल्यामुळेच प्रतीवर्षी नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहाने भारतभर साजरा केला जातो. भारतामध्ये विविध संप्रदाय कार्यरत आहेत. या संप्रदायांनुसार संबंधित देवतेची उपासना प्रचलित आहे. गाणपत्य, शैव, वैष्णव, सौर्य, दत्त आदी संप्रदायांप्रमाणे शाक्त संप्रदायाचे अस्तित्वही पुष्कळ प्राचीन काळापासून भारतामध्ये आहे. शाक्त संप्रदायाने सांगितल्याप्रमाणे शक्ती उपासना करणारे अनेक शाक्त भारतात सर्वत्र आढळतात. आद्य शंकराचार्य यांनी पंचायतन पूजेची प्रथा भारतात चालू केली. त्यामध्ये देवीचे स्थान महत्त्वाचे आहे. भारतात ज्या उपास्यदेवतांची उपासना केली जाते, त्या प्रमुख पाच देवतांपैकी एक शक्ती, म्हणजे देवी आहे. तंत्रशास्त्राचे पालन करणारे तांत्रिक तंत्रशास्त्राचे जनक सदाशिवाची उपासना करतात, त्याप्रमाणे त्रिपुरसुंदरी, मातंगी, उग्रतारा आदी तांत्रिक शक्तींचीही उपासना करतात. शिवाप्रमाणेच शक्तीही तंत्रशास्त्राची आराध्य देवता असल्याचे सुस्पष्ट होते.

पार्वतीमाता ही शिवाची अर्धांगिनी असली, तरीही शिवाकडून गूढ ज्ञान प्राप्त करतांना पार्वतीची भूमिका एखाद्या जिज्ञासूची असल्याचे जाणवते. तीव्र जिज्ञासेपोटी तिला तहान-भूक आणि झोप यांचेही भान रहात नाही. ज्ञानप्राप्तीच्या लालसेने ती शिवाला अनेक प्रश्न विचारते. यांतूनच प्रसिद्ध शिव-पार्वती यांचा वार्तालाप किंवा त्यांचे संभाषण यांचा उल्लेख पुराणांमध्ये झालेला आढळतो. पार्वती स्वतः आदिशक्ती असली, तरी गुरुसमान असणाऱ्या शिवाकडून ज्ञानार्जन करण्यासाठी ती जिज्ञासू आणि मुमुक्षु यांचे मूर्तीमंत स्वरूप बनते. त्यामुळेच शिवाने पार्वतीला तंत्रशास्त्राचे गूढ ज्ञान दिले.

**जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई

## त-ड-का

### जय माता दी ..!

दुर्गामातेचा उत्सव
फुलवी भक्तिचा मळा
मनी आत्मसमाधानाचा
आनंद मिळे वेगळा ..!

संसाराचा गाडा ओढता
मन जेंव्हा जेंव्हा हारते
भिऊ नकोस आहे पाठीशी
हे आश्वासन उभारी देते . !!



**प्रा. अशोक सारडा मेहकर**
९४२१३९४३३९




# समाजसेवीका आणि साहित्यिक सरस्वती रूप शोभा रोकडे



**दुसरी माळ**

प्राचार्या, डॉ. शोभाताई रोकडे हे नाव,व्यक्ती किंवा अमरावतीकरांना अजिबात नवीन नाही. आता तर सौ.शोभाताई, विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारणी सदस्य व मराठी साहित्य महामंडळ,मुंबई निधी समितीच्या विश्वस्त असल्याने त्यांना न ओळखण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.पण इथपर्यंतचा हा प्रवास सोपा नव्हता हे निश्चित.

अगदी सर्वसाधारण कुटुंबात जन्मलेल्या ह्या शोभाताई हुशार, जिद्दी आणि मेहनती असल्याने परिस्थितीवर मात मिळवून त्या आज ह्या पदावर आहेत.सुरुवातीला त्या बालवाडी मध्ये एक वर्षभर शिक्षिका होत्या. पुढे दहा वर्षे प्राथमिक शिक्षिका झाल्या आणि डी.एड, एम ए ,एम फिल् आणि पीएच.डी पर्यंत त्यांनी आपली शैक्षणिक पात्रता वाढविली. स्व. छगनलाल मूलजीभाई कढी कला आणि विज्ञान महाविद्यालय अचलपूर येथून त्या प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झाल्या.

लेखन,वाचन ही त्यांची आवड.म्हणून फार कमी वयात त्या लेखन क्षेत्रामध्ये रमल्या आणि भरपूर लेखन केले. 'सांजभूल','संभ्रम सावल्या', 'तू निरंतन माझ्यातून','धुक्यात विरलेले आर्त', 'सूर्याची मशाल ..बाप माझा', 'भेटी लागी जीवा' सारखे कवितासंग्रह त्यांनी निर्माण केले. साहित्याच्या आवडीमुळेच त्यांनी परिवर्तन प्रबोधनी नावाने साहित्य संस्था अमरावतीला सुरू केली आणि त्या ह्या संस्थेच्या अध्यक्ष आहेत.ह्या संस्थेच्या माध्यमातून त्या साहित्य संमेलने,चर्चासत्रे, परिषदा आयोजित करीत असतात. व यशस्वीपणे पार पडतात.

कुष्ठरोग्यांवरील साहित्यावर त्यांनी पाच समीक्षा ग्रंथ लिहिले आहेत. 'शैली चित्र' आणि 'सामाक्षोचा बिल्वदले' हे समीक्षा ग्रंथ त्यांचे प्रसिद्ध आहेत.'बाई समजून घेताना' 'मराठी पत्रकारिता ..बिंबप्रतिबिंब', 'हूंकार काळोखाचे' हे ग्रंथही त्यांनी लिहिले आहेत. विश्व महिला परिषद विशेषांकाचे संपादनही त्यांनी केलेले आहे. आणि विविध विषयांवरील अकराशेच्या वर व्याख्याने त्यांनी दिलेली आहेत.आजवर बासष्ट पुस्तकांना त्यांच्या प्रस्तावना व पाठराखण आहे.



सामाजिक प्रश्नांना वाचा फोडून त्यावर उपाययोजना करून त्या समाजसेवाही करीत असतात.त्यांना राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील ३२ पुरस्कार मिळालेले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचा 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर समाजसेवा पुरस्कार,' 'इंदिरा संत राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार', 'इचलकरंजी लोपामुद्रा राष्ट्रीय सन्मान', 'रायपुर यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय वांङमय पुरस्कार पुणे','तुका म्हणे राज्य पुरस्कार,बुलढाणा ','पद्मगंधा राज्य वाङ्मय पुरस्कार नागपूर' आणि राष्ट्रीय नारीरत्न पुरस्कार दिल्ली आणि अशाच कित्येक पुरस्कारांचा समावेश आहे.

सौ. शोभाताई अभंगही सुंदर लिहितात.त्यांचो अभंगवृत्तातील सहा संग्रह व एक ध्वनिमुद्रिका प्रकाशीत आहेत. आकाशवाणी वरील कार्यक्रमांमध्ये मुंबई, पुणे, नागपूर कडून त्यांच्या प्रगट मुलाखती सुद्धा प्रसारीत झालेल्या आहे.आकाशवाणीच्या बहूभाषिक कवीसंमेलनात इंदोर येथे त्यांचा सहभाग होता.

हे साहित्य क्षेत्रातले त्यांचे सन्मान पुरस्कार नक्कीच अभिनंदनीय आहेत पण त्या इतकेच त्या नवोदित साहित्यिकांसाठी व्यासपीठ निर्माण करून ज्ञा सरस्वतीची सेवा करीत आहेत ती विशेष उल्लेखनीय बाब मला वाटते.

सौ.शोभाताईंच्या स्वभावातील साधेपण मला जास्त भावतो. सुविद्य व पदाधिकारी असून सर्वांशी आपुलकीने वागतात ह्यातच त्यांचे मोठेपण आहे. सामाजिक क्षेत्रामध्ये स्वतःला झोकून देऊन काम करण्याची त्यांची तयारी आणि उत्साह उल्लेखनीय आहे.आणि म्हणूनच अंबाबाईच्या ह्या समाजसेवी.. सरस्वती रूपाला मी वंदन करते. आणि डॉ.शोभाताई ह्यांचेकडून अशीच साहित्यिक सेवा घडावी ही अंबाबाईच्या चरणी प्रार्थना. आणि म्हणूनच माझी ही माळा त्यांना अर्पण करते..

**ॲड. सुलभा गोगरकर**
अमरावती
मो.९४२३६००४६८

# हमने सनम को खत लिखा!

'हमने सनम को खत लिखाष्ठ ' आठवते ना! साधारण १९८२ मध्ये आलेल्या शक्ती चित्रपटातील हे गाणे. अमिताभ आणि स्मिता पाटील यांच्यावर चित्रित झालेलंष्ठ आनंद बक्षी यांनी कल्पकतेने लिहिलेले आणि आर. डी. यांनी अजरामर केलेले हे गाणंष्ठ ज्यांनी त्या काळात पत्रं लिहिली असतीलष्ठ आणि ज्यांच्या पत्राचे उत्तरच कधी मिळाले नसेलष्ठ त्यांना या पत्रातल्या या ओळी अवघ्या आयुष्याची शिदोरी होऊन गेल्या आहेत.

**पीपल का ये पत्ता नहीं**
**काग़ज़ का ये टुकड़ा नहीं**
**इस दिल का ये अरमान है**
**इसमें हमारी जान है**

खरंच, पत्रावळीचा तो सुवर्णकाळ! केवळ ६०-७० किलोमीटरवर असताना सुद्धा दळणवळणाची साधने नसायचीष्ठ अगदी तालुक्याच्या गावाला जाणंसुद्धा न परवडणाऱ्या या काळात फक्त पत्रे सोबतीला होती. त्यातली काही पत्रं अजूनही कपाटाच्या कोपऱ्यात जपून ठेवली आहेत अनेकांनी! त्यातला सुगंध गेला. अक्षरंही अस्पष्ट झाली मात्र भावना तशाच ओल्यागच्च अगदी नव्वदीतल्या हे सगळे आठवायला कारण म्हणजे नुकताच ९ ऑक्टोबर जागतिक टपाल दिन साजरा झाला.

आज पन्नाशी ओलांडलेली पिढी या जादूची साक्षीदार आहे. काळ बदलला. मोबाईल आला, संदेश आले, छायाचित्रे क्षणात पोहोचू लागली. तरीही पत्राची जादू संपलेली नाही. कारण मोबाईलवरचा संदेश वाचला जातो; पण पत्र भावनांनी ओथंबलेले असते. ते कपाटात जरी जीर्ण झाले, तरी हृदयात मात्र वर्षानुवर्षे जपून ठेवले जाते.

मित्रांनो! ९ ऑक्टोबर जागतिक टपाल दिन. जगातील टपाल व्यवस्थेला एकत्र आणणाऱ्या सार्वत्रिक टपाल संघाची स्थापना ९ ऑक्टोबर १८७४ रोजी स्वित्झर्लंडमधील बर्न येथे झाली. पुढे १९६९ मध्ये ९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक टपाल दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पण, ही झाली एक नोंद आपली पत्रावळी अनादी काळापासून सुरू आहे. भाग्यश्रीने 'मैने प्यार किया 'मध्ये कबुतराला पत्र घेऊन 'कबूतर जा-जा' केले होते. तेव्हा आमच्या मनात कबुतरंही पत्रे घेऊन जातात याबद्दल यत्किंचितही शंका नव्हतीष्ठ फक्त आमची जिंदगी हे शोधण्यात गेली की ते पत्र पाठवणारी नेमकी कोण होती ! बाकी आपली जिंदगी तर फक्त लिहिण्यात गेली.

**न जाने कौन थे वो लोग**
**जिन के खत़ केजवाब आए,**
**हमारा क्या है,हम ने तो बस**
**खत़ पर खत़ लिखे हैं**

बरे, ही झाली आपली चित्तरकथाष्ठ तसेही माणसाने संदेश पाठवण्याची सुरुवात टपाल कार्यालयापासून केलेली नाही. प्राचीन काळात माणूसच संदेशवाहक होता. धूर, अग्नी, नगारे, ध्वज, घोडेस्वार आणि धावते दूत अशा अनेक माध्यमांतून निरोप पोहोचवले जात. प्राचीन इजिप्तपासून पर्शियाच्या राजमार्गापर्यंत आणि भारतातील प्राचीन राजवटींपर्यंत संदेशवहनाची स्वतःची व्यवस्था होती.

भारततही संदेशवाहकांची परंपरा प्राचीन आहे. अलाउद्दीन खिलजीच्या काळातील टपाल व्यवस्था, 'इब्न बतूता ' या जागतिक पर्यटकाने केलेले तिचे वर्णन आणि शेरशाह सूरीने १५४१ मध्ये उभारलेली घोडेस्वार टपाल व्यवस्था हा आपल्या टपाल इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

पुढे ब्रिटिश काळात आधुनिक टपाल व्यवस्थेला आकार मिळाला. १७७४ मध्ये कलकत्ता येथे मुख्य टपाल कार्यालय सुरू झाले. त्यानंतर मद्रास आणि मुंबई येथेही टपाल कार्यालये सुरू झाली. १८५४ मध्ये टपाल खात्याचे एकसंध स्वरूप निर्माण झाले आणि भारतातील आधुनिक टपाल व्यवस्थेचा पाया अधिक मजबूत झाला. या प्रवासात टपाल




तिकिटाची कहाणीही तितकीच रंजक आहे. जगातील पहिले चिकटवता येणारे टपाल तिकीट म्हणजे ब्रिटनचे 'पेनी ब्लॅक'. १८४० मध्ये प्रसिद्ध झालेले हे तिकीट राणी व्हिक्टोरियाचे चित्र असलेले होते. टपालाच्या शुल्काची पद्धतच त्याने बदलून टाकली.

भारतातील पहिले टपाल तिकीट म्हणून 'सिंध डाक'चा उल्लेख केला जातो. १८५२ मध्ये सिंध प्रांतात ते वापरात आले. पुढे १८५४ मध्ये भारतासाठी नियमित टपाल तिकिटांची मालिका प्रसिद्ध झाली. टपाल तिकीट म्हणजे केवळ टपाल शुल्क भरल्याची खूण नव्हे; कालांतराने ते देशाचा इतिहास, संस्कृती, कला, व्यक्तिमत्त्वे आणि राष्ट्रीय स्मृती जपणारे छोटेसे दस्तऐवज बनले.त्या काळाने गावागावात असे 'फिलॅटली ' बघितले आहे आणि त्यांची जिद्द ही अनुभवली आहे.

एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे, ऐतिहासिक घटनेचे, सांस्कृतिक वारशाचे किंवा राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयाचे स्मारक टपाल तिकीट काढण्याची प्रक्रियाही औपचारिक असते. संबंधित व्यक्ती किंवा संस्थेकडून प्रस्ताव येतो. त्याची छाननी केली जाते. तज्ज्ञ समितीच्या स्तरावर विचार होतो. सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतल्यानंतर तिकिटाची रचना, छपाई आणि प्रकाशनाची प्रक्रिया पूर्ण केली जाते.टपाल तिकीट संग्राहकांसाठी त्याला विशेष महत्त्व असते.टपाल म्हणजे फक्त पत्र नव्हे. तार, मनीऑर्डर, टपाल,बचत बँक, जीवन विमा, पार्सल अशा अनेक सेवांनी भारतीय समाजजीवनाशी टपाल खात्याचे नाते जोडले. धावणारा टपालवाहक, घोडे, उंट, रेल्वे, मोटार आणि विमान असा टपाल वाहतुकीचा प्रवासही विलक्षण आहे.आणि मग आले स्पीड पोस्ट.

१९८६ मध्ये सुरू झालेल्या स्पीड पोस्टने भारतीय टपाल व्यवस्थेला नवा वेग दिला. आज पत्र किंवा पार्सल कुठे पोहोचले, याचा मागोवा घेता येतो. संगणकीय नोंदणी, भ्रमणध्वनीवर लघुसंदेश, एकवेळचा संकेतांक, ऑनलाइन सेवा अशा सुविधांमुळे टपाल व्यवस्था काळानुसार बदलत गेली.पण गंमत अशी की, डिजिटल युगातही हाताने लिहिलेल्या पोस्टकार्डची ओढ संपलेली नाहीष्ठ गावाच्या डोंगरावर क्रिकेट खेळत असताना तुमच्या गावचा पोस्टमन तुम्हाला शोधत तुमचे खासगी पत्र तुमच्या हातात द्यायला आल्यावर होणारा आनंद काय असतोष्ठ तज्ज्ञांनाही गुदगुल्या करणारी ही आठवण आहे.

सज्जनाचा 'अ नॉस्टॅल्जिक सोल' करणारा हा सारा पसारा आहे. याच भावनेतून जगभर लोकप्रिय झालेली एक आगळीवेगळी चळवळ म्हणजे 'पोस्टक्रॉसिंग'. २००५ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील अनोळखी व्यक्तीला पोस्टकार्ड पाठवायचे आणि बदल्यात जगातील दुसऱ्या कोणत्या तरी कोपऱ्यातून आपल्याला पोस्टकार्ड मिळायचे. इंटरनेटच्या युगात अनोळखी माणसाने हाताने लिहिलेले पोस्टकार्ड आपल्या घराच्या टपालपेटीत येणे हीच या उपक्रमाची खरी गंमत!

म्हणूनच एक छोटासा प्रयोग करूया. तुम्ही, मी सारेच पुन्हा तो कालावधी आठवूया! चला, 'पोस्टकार्ड'च्या आजूबाजूला लिहिलेला मजकूर, आंतरदेशीय पत्राच्या आत सुरक्षित कोंबलेला मजकूर आणि लिफाफ्याच्या आत अंतराच्या सुगंधात भिजवलेल्या कागदावर मनाच्या शब्दांचे अक्षर करून गोंदलेला तो मजकूर आठवूया तो सध्या काय करत असेल ती सध्या काय करत असेल 'लिखे जो खत़ तुझे, जो तेरी याद में' पुन्हा करूया.

**चला ! एक पोस्ट कार्ड तरी पोस्ट करूया !**

बस्, एक पोस्टकार्ड घ्या. पेन हातात घ्या. आपल्या अक्षरांमध्ये आपले मन उमटू द्या. एखाद्या जुन्या मित्राला, मैत्रिणीला किंवा आपल्या आयुष्यात खास असलेल्या व्यक्तीला लिहा.'तू माझ्या आयुष्यात खास आहेस 'आणि ते पोस्टकार्ड टपालपेटीत टाका.ज्या पिढीने टपालाचे सुवर्णयुग पाहिले आहे, त्या पिढीने पुन्हा एकदा पत्र लिहावे. कारण अक्षरांमध्ये फक्त शब्द नसतात भावनांचा सुगंध असतो मी आठवणार आहे, तुम्हीही आठवा चला, पुन्हा एक पत्र लिहूया!

**-प्रवीण टाके**
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
९७०२८५८७७७

# राजपुतपुऱ्यात इमारतीचा भाग कोसळला

## जीवितहानी टळली ! काही रहिवासी किरकोळ जखमी

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील राजपुतपुरा परिसरात गोपाल कुटिया जवळ संभव अपार्टमेंटच्या बाजूला असलेल्या एका इमारतीचा काही भाग रविवारी सकाळी अचानक कोसळला. सकाळी ६.१५ ते ६.३० वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेत काही रहिवाशांना किरकोळ दुखापत झाली. सुदैवाने, या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

प्रकाश यादव व इतरांच्या मालकीच्या या इमारतीचा भाग खचून पडल्याची माहिती मिळताच महापालिका प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. आयुक्त सुनील लहाने यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोणे आणि उपायुक्त गणेश




शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली इमारतीचा कमकुवत व धोकादायक भाग हटविण्याची कारवाई करण्यात आली.

जखमी रहिवाशांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले. दुर्घटनेनंतर संभाव्य धोका टाळण्यासाठी महापालिकेच्या पूर्व झोन कार्यालयासह अग्निशमन आणि अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या पथकांनी कारवाईत सहभाग घेतला.

यावेळी अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोणे, सहाय्यक आयुक्त (पूर्व) राजेश सरप, स्वच्छता विभागप्रमुख प्रशांत राजुरकर, मुख्य अग्निशमन अधिकारी मनीष कथले, सहाय्यक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, नगररचना विभागाचे कनिष्ठ अभियंते राहुल राऊत व अक्षय बोर्डे, तसेच पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि महापालिकेचे संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

# ‘संघटना आपल्या दारी’ उपक्रमातून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी लढा

## संगीता जाधव ठरल्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या ‘नवदुर्गा’; पदोन्नतीपासून पुरस्कारापर्यंत न्यायासाठी संघर्ष

■ प्रतिनिधी | अकोला ■

आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यापासून ते त्यांच्या हक्कांसाठी प्रशासकीय आणि न्यायालयीन स्तरावर लढा देण्यापर्यंत सातत्याने कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेच्या अकोला जिल्हाध्यक्ष संगीता मधुकर जाधव यांनी जिल्ह्यात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ‘संघटना आपल्या दारी’ या उपक्रमातून ग्रामीण भागातील आरोग्य कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचत त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या जाधव यांना आरोग्य विभागातील महिला कर्मचाऱ्यांसह इतर कर्मचाऱ्यांसाठीही प्रेरणास्थान मानले जात आहे. राज्याध्यक्ष अशोकराव जयसिंगपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली संगीता जाधव जिल्ह्यातील आयुष्मान आरोग्य मंदिर आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देऊन कर्मचाऱ्यांच्या अडचणी जाणून घेतात. केवळ तक्रारी ऐकून न थांबता संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करणे, हा त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे.

### पुरस्कारांतून कार्याचा गौरव

सामाजिक आणि कर्मचारी चळवळीतील कार्याची दखल घेत संगीता जाधव यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. यात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा कर्तृत्ववान कामगार महिला पुरस्कार (८ मार्च २०२४), सावित्रीची लेक गौरव पुरस्कार, राष्ट्रीय कला गौरव पुरस्कार, राज्यस्तरीय स्वामी विवेकानंद युवाश्री पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.



अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार, आदर्श आरोग्य सेविका पुरस्कार, वुमन आयकॉन पुरस्कार, राज्यस्तरीय जिजाऊ साहित्य गौरव पुरस्कार आणि महाराष्ट्र गौरव पुरस्कारांचा समावेश आहे. जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडूनही त्यांना फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्कारात द्वितीय क्रमांक मिळाला आहे.

### नोकरीसोबत सामाजिक कार्याचीही धुरा

संगीता मधुकर जाधव या २००९ पासून जिल्हा परिषद आरोग्य विभागात आरोग्य सेविका म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी बी.एस्सी. न्यूट्रिशनचे शिक्षण घेतले आहे. महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदासोबतच अकोला जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी मर्यादित पतसंस्थेच्या सचिवपदाची जबाबदारीही त्या सांभाळतात. जुन्या पेन्शन योजनेशी संबंधित संघटनात्मक कार्यातही त्यांचा सहभाग आहे.

> आरोग्य कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, पदोन्नती, आर्थिक लाभ आणि प्रशासकीय न्याय या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या संगीता जाधव यांचा प्रवास हा नोकरीच्या जबाबदाऱ्या सांभाळत कर्मचारी हितासाठी लढणाऱ्या महिलेच्या जिद्दीचे उदाहरण ठरत आहे. त्यामुळेच आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या ‘नवदुर्गा’ म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.
>
> **सतीश काशीराम राठोड,**
> दगडपारवा, ता. बार्शीटाकळी, जि. अकोला

### पदोन्नती, वेतनलाभासाठी आंदोलन

जिल्हा परिषद आरोग्य विभागात चार दिवसांचे कामबंद आंदोलन करून १२ वर्षांपासून रखडलेल्या महिला विस्तार अधिकारी आणि आरोग्य अभियांत्रिकीशी संबंधित पदांच्या पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघटनेने पाठपुरावा केला. तसेच कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठीही प्रयत्न करण्यात आले. अकोला जिल्ह्यातील ४२ महिला कर्मचाऱ्यांना प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून संबंधित लाभ मिळावा, यासाठी कामगार न्यायालयात न्यायालयीन लढा सुरू असल्याचे सांगण्यात आले.

आरोग्य सेविकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे, यासाठीही जाधव यांनी पाठपुरावा केला. जिल्ह्यात आरोग्य सेविकांच्या सन्मानाचा कार्यक्रम आयोजित करण्याची परंपरा सुरू करण्यात त्यांचा पुढाकार राहिला आहे. १२ मे रोजी आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त २०२२ पासून आयोजित कार्यक्रमांतर्गत सुमारे १५० आरोग्य सेविकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# पिंजर परिसरात तीन जुगार अड्डे सुरू असल्याचा आरोप; पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह!

- जुगार अड्डे कायमस्वरूपी बंद करण्याची वंचित बहुजन आघाडीची मागणी
- शहराध्यक्ष तसवर खान यांचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

पिंजर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन जुगार अड्डे गेल्या वर्षभरापासून सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कथित अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी जुगाराच्या विळख्यात सापडत असून, सर्वसामान्यांच्या कष्टाच्या पैशांची उधळपट्टी होत असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीने केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित जुगार अड्डे कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी संघटनेचे मूर्तिजापूर शहराध्यक्ष तसवर खान यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पिंजर परिसरात कथितरीत्या सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांबाबत स्थानिक पोलीस प्रशासनाने कोणती कारवाई केली, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अवैध जुगाराला आळा घालण्याची जबाबदारी पोलिसांची असताना, संबंधित ठिकाणी जुगार सुरू असल्याच्या तक्रारींची दखल घेण्यात आली का आणि कारवाई झाली असल्यास तिचे स्वरूप काय, याची स्पष्टता येणे आवश्यक आहे.

### ‘आमचे कोणी काही करू शकत नाही’ म्हणत दादागिरीचा आरोप

दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करीत असताना, जुगारामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. तरुणांकडून घरातील कष्टाने कमावलेले पैसे जुगारात खर्च होत असल्याने कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत असल्याचा दावा करण्यात आला आहे. जुगाराची उधारी वसूल करण्यासाठी दादागिरी केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ‘आम्ही सर्वांना हप्ते पुरवतो, त्यामुळे आमचे कोणी काही करू शकत नाही आणि आमचे धंदे कोणी बंद करू शकत नाही,’ अशी भाषा संबंधितांकडून वापरली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. मात्र, या दाव्यांची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे.

### पत्रकाराला मारहाण, खंडणीच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी?

यातील एका कथित जुगार अड्ड्याचे वृत्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकाराला अड्डा चालविणाऱ्या व्यक्तीकडून मारहाण झाल्याचा आरोप यापूर्वी करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. तसेच पत्रकाराला खंडणीच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिल्याचाही दावा करण्यात आला आहे. या आरोपांची स्वतंत्र चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची गरज आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष

पिंजर परिसरातील कथित जुगार अड्ड्यांची तातडीने चौकशी करावी, संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करावी आणि अवैध धंदे कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी तसवर खान यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि अमरावती येथील पोलीस आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आता या निवेदनाची वरिष्ठ पोलीस अधिकारी कितपत दखल घेतात, कथित जुगार अड्ड्यांची प्रत्यक्ष तपासणी होते का आणि आरोपांमागील वस्तुस्थिती काय समोर येते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# महानगरात निघाली महाराजा अग्रसेन यांची भव्य शोभायात्रा



■ प्रतिनिधी | अकोला ■

अग्रवाल समाजाचे आराध्य महाराजा अग्रसेन यांची भव्य शोभायात्रा त्यांच्या जयंती पर्वावर रविवारी महानगरात काढण्यात आली.अग्रवाल समितीच्या वतीने आयोजित या जयंती शोभायात्रेचा प्रारंभ स्थानीय राणी सती धाम येथून करण्यात आला. आकर्षक रथात महाराजा अग्रसेनजी यांच्या प्रतिमेला स्थापित करून आकर्षक देखावे व घोडेस्वार समवेत ही शोभायात्रा काढण्यात आली.या शोभायात्रेत प्रमुख पाहुणे पुणे येथील सुप्रसिद्ध उद्योगपति पवन सराफ तथा संभाजीनगर येथील उद्योगपति डॉ. सुशील भारुका,माजी आ बबनराव चौधरी,मनपा स्थायी समिति सभापती विजय अग्रवाल,डॉ मनोज अग्रवाल,हरीश खेतान,नवल भरतीया,अशोक गुप्ता, डॉ जुगल चिरानिया, जगदीश बाचुका,नवीन झुणझुण वाला,डॉ मोदी,डॉ के के अग्रवाल,भवन ट्रस्ट के सचिव शैलेंद्र कागलीवाल,समितीचे अध्यक्ष महेंद्र खेतान, संतोष अग्रवाल, ओम साव, पुरुषोत्तम गुप्ता, आदी मान्यवर उपस्थित होते.

### अंध विद्यालयात भोजनदान

**अकोला :** सकल अग्रवाल समाजाचे आराध्य महाराजा श्री अग्रसेन यांच्या जयंतीनिमित्त रविवारी अग्रवाल समितीच्या वतीने स्थानीय मलकापूर परिसरातील अंध विद्यालयात विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले.अग्रवाल समितीचे अध्यक्ष महेंद्र खेतान यांच्या पुढाकारात आयोजित या उपक्रमात समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अंध विद्यालयात उपस्थित होऊन अंध विद्यार्थ्यांना अन्नदान केले.

# बूथ बांधणीसाठी शहर काँग्रेसचा ‘ॲक्शन प्लॅन’ !

## महेंद्र गवई यांच्या अध्यक्षतेखाली मासिक बैठक; एसआयआर, शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीवर मंथन, युवा कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी राजकीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शहर काँग्रेसने संघटनात्मक बांधणीवर लक्ष केंद्रित केले आहे. बूथस्तरावर समित्यांची स्थापना, प्रभागनिहाय संघटना मजबूत करणे आणि मतदार यादीतील एसआयआर प्रक्रियेच्या अनुषंगाने नियोजन करण्यासाठी अकोला जिल्हा शहर काँग्रेस कमिटीच्या मासिक बैठकीत कृती आराखड्यावर चर्चा करण्यात आली. स्वराज्य भवन येथे झालेल्या या बैठकीत अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या तयारीचाही आढावा घेण्यात आला.

शहरातील प्रत्येक बूथवर पक्षाची पकड मजबूत करण्यासाठी बूथ समित्या स्थापन करणे, प्रभाग अध्यक्षांच्या नियुक्त्यांबाबत नियोजन करणे आणि ब्लॉक अध्यक्षांच्या माध्यमातून स्थानिक कार्यकारिणी तयार करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेत सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहनही करण्यात आले.



### पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

बैठकीला शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र गवई, विजय तिवारी, हरिष कटारिया, मनिष मिश्रा, संघटन महासचिव योगेश थोरात, श्रिकांत सरोदे, माजी ब्लॉक अध्यक्ष विनोद नालट, उत्तर ब्लॉक अध्यक्ष प्रशांत प्रधान, रफिउल्ला खान, रवी पाटणे, शेख झाकीर, सुनिल वानखडे आणि तश्वर पटेल उपस्थित होते. बैठकीचे आभार हरिष कटारिया यांनी मानले.

### प्रा. खंडारे यांच्यावर सचिवपदाची जबाबदारी

बैठकीत प्रा. प्रविण खंडारे यांची शहर काँग्रेस कमिटीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. यासोबतच पंकज कोठाडे, राम पाचपोर यांच्यासह अनेक युवा कार्यकर्त्यांनी शहराध्यक्ष महेंद्र गवई यांच्या नेतृत्वात काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे संघटनात्मक बांधणीच्या चर्चेसोबतच नव्या कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडण्यावरही भर दिसून आला.

# वाढत्या वयातील किडनी, प्रोस्टेटच्या आजारांवर आज मार्गदर्शन



### डॉ. प्रशांत मुळावकर यांचा रेड क्रॉसतर्फे सत्कार; ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य सत्र

■ प्रतिनिधी | अकोला ■

वाढत्या वयात उद्भवणारे किडनी व प्रोस्टेटचे आजार, लघवीच्या समस्या आणि त्यावरील आधुनिक उपचारपद्धतींबाबत ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी विदर्भातील प्रसिद्ध युरोलॉजिस्ट डॉ. प्रशांत मुळावकर यांचे विशेष आरोग्य मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता भारतीय रेड क्रॉस सोसायटीच्या अकोला शाखेत हा कार्यक्रम होणार आहे.

डॉ. प्रशांत मुळावकर यांना नुकतेच ‘युरोलॉजी गोल्ड मेडल २०२६’ (पश्चिम विभाग) या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या गौरवाबद्दल भारतीय रेड क्रॉस सोसायटी, अकोला शाखेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ते उपस्थितांना वाढत्या वयात आढळणारे मूत्रपिंडाचे विकार, प्रोस्टेटची वाढ, लघवी करताना जाणवणाऱ्या अडचणी तसेच उपलब्ध आधुनिक उपचारांबाबत सविस्तर माहिती देणार आहेत.

वाढत्या वयात अशा आरोग्य समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्रास वाढू शकतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी वेळीच योग्य वैद्यकीय सल्ला घेणे आणि आजारांविषयी जागरूक राहणे महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या मोफत आरोग्य मार्गदर्शन सत्राचा ज्येष्ठ नागरिकांसह त्यांच्या कुटुंबीयांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रेड क्रॉस सोसायटीच्या अकोला शाखेतर्फे करण्यात आले आहे.

# चारधाम यात्रेत गैरसोय ; सावनी टूर्सला ग्राहक आयोगाचा दणका!

## १४ ज्येष्ठ प्रवाशांना ६.५१ लाख रुपये परत करण्याचे आदेश ; व्याजासह नुकसान भरपाई आणि न्यायालयीन खर्चही द्यावा लागणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

चारधाम यात्रेदरम्यान नियोजित सेवा-सुविधा न पुरविणे आणि प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागल्याच्या प्रकरणात अकोला जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने सावनी टूर्स अँड ट्रॅव्हल्सविरुद्ध महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. १४ तक्रारदारांना प्रत्येकी ४६ हजार ५०० रुपये याप्रमाणे एकूण ६ लाख ५१ हजार रुपये परत करण्यासह, त्यावर २८ जुलै २०२३ पासून वार्षिक सहा टक्के व्याज देण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत. याशिवाय २५ हजार रुपये नुकसानभरपाई आणि १० हजार रुपये न्यायालयीन खर्च असे एकूण ६ लाख ८६ हजार रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सावनी टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे संचालक सचिन कुलकर्णी यांच्यामार्फत ९ ते २४ मे २०२२ या कालावधीत अकोल्यातील काही ज्येष्ठ वकिलांनी कुटुंबीयांसह चारधाम यात्रेचे नियोजन केले होते. अकोला, दिल्ली, मसुरी, हरिद्वार, उत्तरकाशी, बारकोट, गुप्तकाशी, जोशीमठ, बद्रीनाथ, औली, चोपटा आणि ऋषिकेश असा प्रवास नियोजित होता. सहलीतील बहुतांश सदस्य ज्येष्ठ नागरिक असल्याने प्रवास, निवास, भोजन आणि अन्य सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, अशी अपेक्षा आयोजकांकडे व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार आवश्यक सुविधा पुरविण्याची हमी देण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला.

### ट्रॅव्हल्स व्यावसायिकांचा बचाव आयोगाने फेटाळला

दुसरीकडे, ट्रॅव्हल्स व्यावसायिकांनी तक्रारींचे खंडन केले. तक्रारदार ग्राहक या संज्ञेत मोडत नसल्याचा दावा करत, त्यांच्याकडून घेतलेले शुल्क संबंधित हॉटेलना आरक्षणासाठी पाठविण्यात आले होते आणि त्या व्यवस्थांशी आपला थेट संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले. सहलीदरम्यान तक्रारदारांनी आनंद घेतल्याचा, हॉटेलमधील कर्मचाऱ्यांशी वाद घातल्याचा तसेच कोरोना महामारीनंतर निर्माण झालेली गर्दी, प्रशासकीय निर्बंध आणि नैसर्गिक अडचणी यांमुळे गैरसोयी झाल्याचा बचावही करण्यात आला. मात्र, दोन्ही बाजूंनी सादर केलेले पुरावे आणि कागदपत्रे तपासल्यानंतर आयोगाने हा बचाव ग्राह्य धरला नाही. शुल्कातील रक्कम नेमकी कोणत्या हॉटेलला, कोणत्या व्यक्तीकडे आणि किती प्रमाणात दिली, यासंबंधी आवश्यक पुरावे व्यावसायिकांनी सादर केले नसल्याचे आयोगाने नमूद केले. मसुरीला न नेण्याच्या तक्रारीबाबतही विरोधी पक्षाकडून ठोस स्पष्टीकरण देण्यात आले नसल्याचे निकालात स्पष्ट करण्यात आले.

### वाहनापासून निवास-भोजनापर्यंत तक्रारी

प्रत्यक्ष सहलीदरम्यान मात्र अपेक्षित सुविधांचा अभाव जाणवल्याचा आरोप तक्रारदारांनी केला. वाहनाची दुरवस्था, टायर पंक्चर होणे, डोंगराळ मार्गावरील प्रवासात ब्रेक निकामी होण्याची घटना, चालकाची उद्धट वर्तणूक आणि वाहन दुरुस्तीमुळे नियोजनात आलेले अडथळे यांचा तक्रारीत उल्लेख करण्यात आला. सहलीचे शुल्क आकारूनही मसुरीला नेण्यात आले नाही, तसेच काही ठिकाणी नियोजित दर्जाच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली नाही, असा आरोपही करण्यात आला. भोजन, नाश्ता आणि चहापानाच्या सुविधांमध्ये त्रुटी, तसेच आवश्यक सोयी-सुविधा नसलेल्या हॉटेलमध्ये खोल्या आरक्षित केल्याचेही तक्रारदारांचे म्हणणे होते. परराज्यात असताना वारंवार दूरध्वनीवरून तक्रारी करूनही त्यांची योग्य दखल घेण्यात आली नसल्याचा दावा करण्यात आला. परिणामी, पैसे भरूनही अपेक्षित सेवा न मिळाल्याने ग्राहक आयोगात धाव घेण्यात आली.

### ४५ दिवसांत आदेशाचे पालन करण्याचे निर्देश

नियोजित प्रवासादरम्यान आवश्यक सेवा आणि सुविधा पुरविण्यात त्रुटी राहिल्याचे तक्रारदारांनी सिद्ध केल्याचे आयोगाने नमूद केले. या त्रुटींमुळे संपूर्ण यात्रा त्रासदायक ठरल्याचे निरीक्षण नोंदवत आयोगाने परतावा, व्याज, नुकसानभरपाई आणि न्यायालयीन खर्च देण्याचा आदेश दिला. आदेशाचे पालन करण्यासाठी तक्रारीची प्रत मिळाल्यापासून ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

आयुष्यभराची बचत खर्चून ज्येष्ठ नागरिक पर्यटनासाठी बाहेर पडतात, तेव्हा त्यांना केवळ आश्वासनांवर नव्हे, तर ठरलेल्या दर्जाच्या सेवा-सुविधांवर विश्वास ठेवता आला पाहिजे. पर्यटन आयोजकांनी शुल्क स्वीकारल्यानंतर आपली जबाबदारी झटकता येत नाही, हा संदेश या निकालातून मिळत असल्याची चर्चा पर्यटन क्षेत्रात होत आहे. ग्राहकांना दिलेल्या आश्वासनांनुसार सेवा पुरविणे आणि त्यातील त्रुटींसाठी उत्तरदायित्व स्वीकारणे, ही पर्यटन व्यवसायातील विश्वासार्हतेची मूलभूत अट असल्याचे या प्रकरणातून अधोरेखित झाले आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३००**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# समृद्धी महामार्गावर झायलो कारमध्ये जनावरांची निर्दयी कोंडवणूक

## टायर फुटल्याने वाहन थांबले; गोरा आणि गाय मृतावस्थेत,१० जनावरांची सुटका





**विरुळ आकाजी/जनमाध्यम**

समृद्धी महामार्गावरून जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार शनिवारी, १० ऑक्टोबर रोजी उघडकीस आला. मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेज क्रमांक ८१/३०० येथे पांढऱ्या रंगाची झायलो कार मागील बाजूचा टायर फुटल्याने रस्त्यावर उभी होती. या वाहनाची पाहणी केली असता, आतमध्ये जनावरांना अक्षरशः कोंबून भरल्याचे आढळले. या कारवाईत आठ गोरे जिवंत, तर एक गोरा आणि एक गाय मृतावस्थेत आढळून आली. एकूण दहा जनावरांना वाहनातून बाहेर काढून गोशाळेत पाठविण्यात आले.

**टायर फुटल्याने उघड झाला प्रकार**

मिळालेल्या माहितीनुसार, १० ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास संभाजीनगर येथील नियंत्रण कक्षातून जाम पोलिसांना समृद्धी महामार्गावरील झायलो वाहनात जनावरे भरून असल्याची माहिती मिळाली. या माहितीची गांभीर्याने दखल घेत सहायक पोलीस निरीक्षक सरिता यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले.पोलिसांनी चॅनेज क्रमांक ८१/३०० येथे पोहोचून पाहणी केली असता, एमएच ३० एए ०५५० क्रमांकाची पांढऱ्या रंगाची झायलो कार रस्त्याच्या बाजूला उभी असल्याचे दिसले. वाहनाचा उजव्या बाजूचा मागील टायर फुटला होता.

**आठ गोरे जिवंत, दोघांचा मृत्यू**

वाहनातील जनावरांची अवस्था पाहून पोलिसांनी तातडीने पुढील कार्यवाही सुरू केली. वाहनात एकूण दहा जनावरे आढळली. त्यापैकी आठ गोरे जिवंत होते, तर एका गोऱ्याचा आणि एका गायीचा मृत्यू झाला होता.

घटनेची माहिती वर्धा पोलीस नियंत्रण कक्ष आणि पुलगाव पोलीस ठाण्याला देण्यात आली. त्यानंतर पुलगाव पोलीस ठाण्याचे हवालदार भागीरथ बेंडे, पोलीस शिपाई विश्वजीत वानखेडे आणि वाहनचालक हवालदार निलेश महाजन घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पुढील कारवाईची सूत्रे हाती घेतली.

**जनावरांची गोशाळेत रवानगी**

कारवाईदरम्यान वाहनातील सर्व दहा जनावरांना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर जनावरांना ४०७ टेम्पोमध्ये भरून पुलगाव पोलिसांच्या अंमलदारांसह पडेगाव येथील गोशाळेत पाठविण्यात आले. जनावरे वाहून नेण्यासाठी वापरण्यात आलेली झायलो कार टोइंग व्हॅनच्या मदतीने पुलगाव पोलीस ठाण्यात नेण्यात आली.या घटनेमुळे महामार्गावरून जनावरांची वाहतूक कोणत्या परिस्थितीत केली जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जनावरांना वाहनात कोंबून नेण्याच्या प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची गरजही या घटनेतून अधोरेखित झाली आहे.दरम्यान, कारवाई सुरू असताना महामार्गावरील वाहतूक सुरळीत होती. घटनास्थळी शांतता असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक सरिता यादव यांनी दिली. या प्रकरणात पुढील तपास व कायदेशीर कारवाई पुलगाव पोलीस करीत आहेत.

आयुर्वेदातून रुग्णसेवेचा वसा; देशमुख दाम्पत्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

# 'आयकॉन ऑफ हेल्थकेअर २०२६' पुरस्काराने डॉ.सौरभ आणि डॉ. तृप्ती देशमुख सन्मानित



**वर्धा/जनमाध्यम**

रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानून आयुर्वेदाच्या माध्यमातून रुग्णांना आरोग्याचा आधार देणाऱ्या वर्धेतील डॉ. सौरभ देशमुख आणि डॉ. तृप्ती देशमुख (ठाकरे) या डॉक्टर दाम्पत्याच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर आणि महाराष्ट्र टाइम्स यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात येणाऱ्या 'आयकॉन ऑफ हेल्थकेअर २०२६' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपूर येथील हॉटेल सेंटर पॉईंटमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे वर्धेच्या वैद्यकीय क्षेत्राचा नावलौकिक वाढला आहे.

डॉ. सौरभ देशमुख गेल्या १४ वर्षांपासून महात्मा गांधी आयुर्वेद रुग्णालय आणि दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, सालोड येथे कार्यरत आहेत. सोरायसिस, पक्षाघात, कोलायटिस, पचनसंस्थेचे विकार, एव्हॅस्क्युलर नेक्रोसिस (एव्हीएन), पुरुष वंध्यत्व, त्वचारोग, केस व टाळूचे विकार, पित्ताशयातील खडे, किडनी स्टोन आणि मणक्यातील डिस्कशी संबंधित समस्यांवर ते उपचार करतात. हंटिंग्टन डिसीजसारख्या दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या आजाराच्या रुग्णावरही त्यांनी आयुर्वेदिक औषधोपचार केले आहेत.

डॉ. तृप्ती देशमुख (ठाकरे) गेल्या सात वर्षांपासून दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, सालोड येथे कार्यरत आहेत. बालरोग क्षेत्रात त्या आयुर्वेदिक उपचार आणि रुग्णसेवा देतात. बालकांची अपेक्षित वजनवाढ न होणे, कुपोषण, दमा, पचनसंस्थेचे विकार, सेरेब्रल पाल्सी आणि बौद्धिक विकासाशी संबंधित समस्यांमध्ये त्या उपचार करतात. बालकांच्या आरोग्यविषयक समस्यांवर समग्र उपचारपद्धतीच्या माध्यमातून सेवा देण्याचे कार्य त्या सातत्याने करीत आहेत. आयुर्वेदाच्या माध्यमातून रुग्णांना उपचारसेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच आरोग्यसेवेतील समर्पण आणि सातत्यपूर्ण योगदानामुळे या दाम्पत्याला हा सन्मान मिळाला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत मिळालेला हा पुरस्कार भविष्यातील रुग्णसेवेसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## संक्षिप्त

### पत्नीशी फोनवर बोलल्यानंतर पतीची आत्महत्या

**कारंजा (घा.)**-पत्नीशी दूरध्वनीवर बोलताना जीवन संपविण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर एका ३० वर्षीय व्यक्तीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कारंजा तालुक्यातील कन्नमवार ग्राम येथे १० ऑक्टोबर रोजी सकाळी घडली.राजेश सोनबाजी सोनकुवर (वय ३०, रा. कन्नमवार ग्राम, ता. कारंजा) असे मृताचे नाव आहे. त्याची पत्नी चार दिवसांपूर्वी माहेरी गेली होती. १० ऑक्टोबर रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास राजेशने पत्नीला फोन करून तिला घरी आणण्यासाठी येत असल्याचे सांगितले. याच संभाषणादरम्यान त्याने आपण आता जीवन जगू शकत नसल्याचे सांगून फोन बंद केला.पत्नीला संशय आल्याने तिने घराशेजारी राहणाऱ्या नातेवाइकाला घरी जाऊन पाहण्यास सांगितले. त्याने खिडकीतून पाहिले असता राजेश घरातील लोखंडी पाइपला साडीच्या पदराने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी कारंजा पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

### दम्याच्या आजाराने ज्येष्ठाचा मृत्यू

सेलू - दम्याचा त्रास असलेल्या ६६ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना सेलू येथे उघडकीस आली. रामाजी नारायणराव नांदकर (वय ६६, रा. सेलू) असे मृताचे नाव असल्याची नोंद आहे.मिळालेल्या माहितीनुसार, नांदकर यांना दम्याचा जुना आजार होता. ६ ऑक्टोबर रोजी त्यांनी नेहमीची औषधे घेतली होती. त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडल्याने कुटुंबीयांनी त्यांना उपचारासाठी सेलू येथे दाखल केले. प्रकृतीत सुधारणा न झाल्याने पुढील उपचारासाठी त्यांना सावंगी येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली.

# दुष्काळाचा दणका, राज्याची तिजोरी रिकामी

## रस्ते-बांधकामांना वर्षभरासाठी ब्रेक; लाडक्या बहिणींच्या योजनेचा आर्थिक भार अन् दुष्काळाच्या संकटाने सरकारची कोंडी



**वर्धा/जनमाध्यम**

राज्यात दुष्काळाचे संकट गडद होत असतानाच आता राज्याच्या तिजोरीवरही आर्थिक संकटाचे सावट पसरले आहे. राज्यातील ३०० हून अधिक तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर दुष्काळ निवारणासाठी सुमारे ४५ हजार कोटी रुपयांची गरज असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, एवढा मोठा निधी उभारायचा कुठून, असा प्रश्न सरकारपुढे उभा ठाकला आहे. निधीची चणचण दूर करण्यासाठी सरकारी तिजोरीतील पैशांवर सुरू असलेली रस्ते आणि अन्य बांधकाम प्रकल्पांची कामे पुढील वर्षभर थांबविण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त आहे. दुसरीकडे, विविध सरकारी योजनांच्या निधीलाही कात्री लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुष्काळाने शेतकरी होरपळत असताना राज्य सरकारच्या आर्थिक नियोजनाचीही कसोटी लागली आहे.

राज्याच्या आर्थिक अडचणींमध्ये भर घालणारा आणखी एक मुद्दा म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना. या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर सुमारे ३० हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडत असल्याचे अर्थ खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितल्याचे वृत्त आहे. परिणामी सामाजिक न्याय विभागासह अन्य विभागांच्या निधीचे पुनर्विनियोजन करावे लागत आहे. आधीच अनेक योजनांना पुरेसा निधी मिळत नसल्याची स्थिती असताना आता दुष्काळ निवारणासाठी मोठी आर्थिक तरतूद करावी लागणार आहे. केंद्राच्या मदतीची प्रतीक्षा; कर्जाचा पर्याय समोर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन दुष्काळ निवारणासाठी केंद्राकडून भरीव आर्थिक मदतीची गरज व्यक्त केल्याचे वृत्त आहे. केंद्र सरकारकडून मदतीचे आश्वासन मिळाल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात किती निधी आणि कधी मिळणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

**खरीप हातातून गेला, रब्बीवरही संकटाचे ढग**

दुष्काळाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. आता रब्बी हंगाम तोंडावर असताना पाण्याची उपलब्धता आणि सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित उत्पन्न पडण्याची शक्यता कमी झाली आहे. अशा परिस्थितीत दुष्काळी मदत, पीक नुकसानभरपाई, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी लागणार आहे.

**उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाईचे नियोजन**

आगामी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेऊन सरकारने पाणी व्यवस्थापनावर भर दिला आहे. महापालिका क्षेत्रांत २० टक्के पाणीकपात आणि उद्योगांसाठी ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर बंधनकारक करण्यासारखे उपाय प्रस्तावित किंवा लागू करण्यात आल्याचे वृत्त आहे. मात्र, पाणीपुरवठ्याच्या पर्यायी व्यवस्था, टँकर, जलस्रोतांचे बळकटीकरण आणि अन्य उपाययोजनांसाठीही मोठ्या निधीची आवश्यकता भासणार आहे. एकूणच, दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असताना आता राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचीही परीक्षा सुरू झाली आहे. विकासकामांना स्थगिती, योजनांच्या निधीवर मर्यादा आणि केंद्राच्या मदतीची प्रतीक्षा, अशा परिस्थितीत सरकारला आर्थिक शिस्त आणि जनतेला दिलासा यांचा समतोल साधावा लागणार आहे. अन्यथा दुष्काळाचे संकट केवळ शेताच्या बांधावरच नव्हे, तर राज्याच्या अर्थकारणावरही दीर्घकाळ परिणाम करू शकते.

### पुलगावात गांजाच्या सेवनाचे साहित्य जप्त

**पुलगाव**-शहरात गांजाच्या सेवनासाठी वापरले जाणारे साहित्य बाळगल्याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत संशयितांकडून चिलीमसह इतर साहित्य जप्त करण्यात आले.पोलिसांनी दिलेल्या नोंदीनुसार, या प्रकरणात विकेश ऊर्फ विक्की कृष्णा पाटील याच्यासह अन्य व्यक्तींची नावे समोर आली आहेत. संबंधित साहित्यामध्ये चिलीम आणि गांजाच्या सेवनासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचा समावेश आहे. जप्त साहित्याची किंमत नोंदीत शून्य रुपये दर्शविण्यात आली आहे.या प्रकरणी पुलगाव पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून संबंधित व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.



केळझर येथे महिला सक्षमीकरणाचा जागर

### शासकीय योजनांसह आर्थिक स्वावलंबन आणि आरोग्याबाबत मार्गदर्शन

**सेलू/जनमाध्यम**

केळझर येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. ९ ऑक्टोबर रोजी भरारी प्रभाग संघाच्या कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात महिलांना शासकीय योजना, आर्थिक स्वावलंबन, बचत गटांचे कार्य आणि आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. कार्यक्रमात केळझरच्या माजी सरपंच अर्चना लोणकर आणि प्रभाग संघाच्या अध्यक्ष सुनीता यांनी महिला बचत गट व महिला शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांची माहिती दिली. महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून व्यवसायाच्या संधी शोधून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे आणि शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रभाग समन्वयक रंजना ठाकरे यांनी बचत गटांच्या कार्यपद्धतीविषयी मार्गदर्शन केले. महिला शेतकरी प्रमाणपत्र आणि आरोग्य शिबिराबाबतही माहिती देण्यात आली. आदित्य बिर्ला ट्रस्टच्या उज्ज्वास उपक्रमातील रेणुका चौके व धन्वंतरी गवळे यांनी स्त्री प्रजनन प्रणाली, मासिक पाळी, स्वच्छता आणि आरोग्य या विषयांवर मार्गदर्शन केले. सेवा संकल्प अभियान १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान सेलू तालुक्यात राबविण्यात येत आहे. यशस्वितेसाठी प्रभाग संघाचे पदाधिकारी, सीएलएफ व्यवस्थापक अर्चना रननवरे आणि ग्रामसखींनी सहकार्य केले.

# घनदाट जंगलात वसलेले तेलाई मातेचे जागृत देवस्थान

## दोनशे वर्षांची परंपरा; नवरात्रात दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

घनदाट जंगल, डोंगरमाथा, नागमोडी घाटवळणांचा रस्ता आणि निसर्गाच्या कुशीत वसलेले देवीचे श्रद्धास्थान... अशा भक्तिमय आणि निसर्गरम्य वातावरणात आष्टी तालुक्यातील श्री अंबा तेलाई मातेचे मंदिर भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. आष्टी-वरूड राष्ट्रीय महामार्गावरील पांढुर्णा गावाजवळ असलेल्या या जागृत देवस्थानाला सुमारे दोनशे वर्षांची परंपरा असल्याचे सांगितले जाते. नवरात्रोत्सवात येथे दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. पहाटेपासूनच देवीच्या दर्शनासाठी रांगा लागतात. आष्टी, साहूर, बोटोणा, पांढुर्णा यांसह परिसरातील अनेक गावांमधील भाविक श्रद्धेने मातेच्या चरणी नतमस्तक होतात.

धार्मिक श्रद्धा, जुन्या आख्यायिका आणि निसर्गरम्य परिसर यांचा संगम असलेल्या या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे देवीचे स्थान डोंगरमाथ्यावर असून, मंदिराच्या सभोवताल घनदाट जंगल आहे. पूर्वी उघड्यावर असलेल्या देवीच्या स्थानाला भाविक आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने मंदिराचे स्वरूप प्राप्त झाले. आज हे ठिकाण केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र राहिले नसून, परिसरातील भाविकांच्या आस्थेचा अविभाज्य भाग बनले आहे.

**बोराच्या झाडाखाली प्रकट झाल्याची आख्यायिका**

तेलाई मातेच्या प्रकट होण्याविषयी परिसरात विविध आख्यायिका सांगितल्या जातात. स्थानिक जाणकारांच्या कथनानुसार, देवी बोराच्या झाडाखाली स्वयंभू स्वरूपात प्रकट झाली. पूर्वी या परिसरातून गावकरी बैलगाड्यांनी प्रवास करीत असत. जंगलातील दगडधोंडे, घाटातील वळणे आणि अवघड रस्त्यांमधून मार्ग काढत नागरिकांना आष्टी येथे बाजारासाठी जावे लागत असे. साहूर, माणिकवाडा आणि तारा सावंगा परिसरातील लोकही याच मार्गाने ये-जा करीत असत.

**तेलाई माता नावामागेही वेगळी कथा**

देवीला तेलाई माता हे नाव कसे पडले, याबाबतही स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या कथा प्रचलित आहेत. एका आख्यायिकेनुसार, पूर्वी आष्टीतील एक वृद्ध महिला देवीच्या अंगावर तेल वाहत असे. त्या परंपरेतून देवीला तेलाई माता हे नाव प्राप्त झाल्याचे सांगितले जाते.दुसऱ्या कथेनुसार, या मार्गाने प्रवास करणाऱ्या एका तेल व्यापाऱ्याच्या तेलाच्या डब्यातील तेल या ठिकाणी सांडले. त्यानंतर बोराच्या झाडाखाली देवीचे स्वरूप दिसू लागल्याची आख्यायिका प्रचलित झाली. या कथांना स्थानिक धार्मिक परंपरेचा आधार असला, तरी त्यांची ऐतिहासिक सत्यता स्वतंत्रपणे प्रमाणित झालेली नाही. मात्र, या कथांमुळे तेलाई मातेच्या स्थानाविषयी भाविकांमध्ये असलेली श्रद्धा आणि या देवस्थानाशी जोडल्या गेलेल्या लोकपरंपरा स्पष्ट होतात.



नवरात्र दुसरा दिवस रंग पांढरा

**घाटातील वळणांवरून मंदिराचे दर्शन**

आष्टी शहरापासून ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या या मंदिराकडे जाताना घाटाचा रस्ता लागतो. नागमोडी वळणांचा हा मार्ग पार केल्यानंतर डोंगरमाथ्यावरील मंदिराचे दर्शन होते. पांढुर्णा गावाच्या जवळ असलेले हे देवस्थान आष्टी-वरूड मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांचेही लक्ष वेधून घेते.मंदिराच्या सभोवताल असलेला जंगल परिसर, डोंगरावरील शांत वातावरण आणि निसर्गाची हिरवाई यामुळे या ठिकाणाला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रवासादरम्यान अनेक नागरिक येथे थांबून देवीचे दर्शन घेतात. धार्मिक श्रद्धेबरोबरच निसर्गाच्या सान्निध्यात काही क्षण घालविण्याची संधीही भाविकांना येथे मिळते.

नवरात्रोत्सव हा तेलाई माता मंदिरातील महत्त्वाचा धार्मिक काळ मानला जातो. या दिवसांत सकाळपासूनच भाविक दर्शनासाठी येण्यास सुरुवात करतात. अनेक भक्त पायी मंदिरात पोहोचतात, तर काही जण वाहनाने येऊन देवीचे दर्शन घेतात. सकाळ-संध्याकाळच्या आरतीच्या वेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होते.चैत्र नवरात्रातही येथे मोठ्या संख्येने भाविक येत असल्याची माहिती स्थानिक वृत्तांतांमध्ये नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे या मंदिरातील धार्मिक परंपरा केवळ शारदीय नवरात्रापुरती मर्यादित नसून वर्षातील इतर काळातही भाविकांची वर्दळ कायम असते.

धार्मिक स्थळांची ओळख केवळ मंदिराच्या वास्तूवर अवलंबून नसते, तर त्या स्थळाशी जोडलेल्या श्रद्धा, लोकपरंपरा, भजन-आरत्या आणि पिढ्यानपिढ्या जपल्या गेलेल्या आठवणींमधूनही ती घडत असते. तेलाई माता मंदिराच्या बाबतीतही ही भक्तीपरंपरा महत्त्वाची ठरते.

श्रद्धा, निसर्ग आणि परंपरेचा त्रिवेणी संगम आष्टी तालुक्यातील तेलाई माता मंदिर हे ग्रामीण भागातील श्रद्धास्थान कसे काळाच्या ओघात विकसित होते, याचे उदाहरण ठरते. बोराच्या झाडाखाली देवी प्रकट झाल्याची आख्यायिका, डोंगरमाथ्यावरील मंदिर, जंगलाने वेढलेला परिसर आणि नवरात्रातील भक्तांची गर्दी यांमुळे या देवस्थानाला स्वतंत्र ओळख मिळाली आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनातही भाविक आपल्या श्रद्धेसाठी वेळ काढून देवीच्या दर्शनाला येतात. कुणी कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना करतो, कुणी नवस फेडण्यासाठी येतो, तर कुणी केवळ मातेच्या दर्शनाने मनाला समाधान मिळावे म्हणून मंदिरात पोहोचतो. श्रद्धेची ही परंपरा पिढ्यानपिढ्या पुढे जात आहे.घनदाट जंगलाच्या सान्निध्यात वसलेले तेलाई मातेचे हे देवस्थान धार्मिक परंपरेचा वारसा जपत असून, नवरात्रोत्सवात येथे अनुभवायला मिळणारा भक्तिभाव परिसरातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचे दर्शन घडवतो.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३१५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# सेवा संकल्प अभियानांतर्गत चोबिता येथे 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषद कृषि विभागामार्फत सेवा संकल्प अभियानांतर्गत चिखलदरा तालुक्यातील चोबिता गावाला प्रत्यक्ष भेट देऊन बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत नवीन विहिरीचा लाभ मिळालेल्या बुडी रावजी कास्देकर या लाभार्थ्याच्या घरी 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्यात आला.



जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, कृषि विकास अधिकारी मल्ला तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. विहिरीचा लाभ मिळाल्यामुळे संबंधित लाभार्थ्याच्या शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होऊन कृषी उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे.

सदर भेटीदरम्यान निलेश राठोड, जिल्हा कृषी अधिकारी, (वि.घ.यो.) तसेच अश्विन राठोड, कृषी अधिकारी, पंचायत समिती चिखलदरा हे उपस्थित होते.

यावेळी लाभार्थी कुटुंबाशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेअंतर्गत मोटर, पाईप, पंपसंच, परसबाग इत्यादी घटकांचा लाभ घेणेबाबत आवाहन करण्यात आले.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध कृषिविषयक योजना, सेवा व विकासकामे ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील अनुसूचित जमातीतील आदीवासी शेतकरी बांधवांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावे असे आवाहन निलेश राठोड जिल्हा कृषी अधिकारी(वि.घ.यो.) यांनी केले आहे.

> आदीवासी बांधवांचे स्थलांतर कमी करुन योजनेच्या माध्यमातून त्यांच्या शेतीमध्ये ख-या अर्थाने क्रांती घडून येणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त आदीवासी शेतकरी बांधवांनी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचा लाभ घ्यावा.
>
> **-निलेश राठोड,**
> जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती.

# आट्यापाट्या संघाचे मुले व मुलींच्या गटात सुवर्ण यश

## अमरावतीच्या चार लेकींची राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** हैद्राबाद तेलंगणा राज्य येथे आयोजित करण्यात आलेल्या ३३ व्या आशियाई आट्यापाट्या अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राच्या सब ज्युनिअर आट्यापाट्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावून राज्याचा गौरव वाढविला. या विजेत्या संघामध्ये अमरावती जिल्ह्यातील आदर्श विद्यालय भुगावच्या कन्या आरोही राजकुमार वानखडे, मेघा निलेश हुड, भक्ती गणेश कडू व चैताली मनोज देऊळकर व मुलांच्या संघात श्रेयस संजय कडू यांचा समावेश असून त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे संपूर्ण अमरावती जिल्हा व महाराष्ट्र राज्य अभिमानाने भारावून गेले आहे. लहानपणापासून खेळाप्रती असलेली आवड, सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द, शिस्त आणि समर्पण यांच्या जोरावर आदर्श विद्यालय भूगांव येथील खेळाडू दरवर्षी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतात.



महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत कुमारी आरोही राजकुमार वानखडे हिच्या नेतृत्वात सुवर्णपदक जिंकणे ही केवळ तिच्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. याचबरोबर मुलांच्या संघाने सुद्धा सुवर्णपदक मिळवत महाराष्ट्राच्या शिरोपेचात आणखीन एक मानाचा तुरा रोवला आहे. या दैदिप्यमान यशामुळे ग्रामीण भागातील अनेक खेळाडूंना प्रेरणा मिळणार असून कठोर परिश्रम व आत्मविश्वासाच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते हे त्यानी आपल्या कामगिरीतून सिद्ध करून दाखविले आहे.

या अभूतपूर्व यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील काळातही अमरावती व भुगावाचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. यावेळी विविध मान्यवरांनी महाराष्ट्र संघातील या पाचही खेळाडूंचे विशेष अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहे. यामध्ये प्रदीप मा. पाटील अध्यक्ष आदर्श शिक्षण संस्था भुगाव, प्राचार्य डॉ. दीपक काविश्वर सचिव, आट्यापाट्या फेडरेशन ऑफ इंडिया प्रा. डॉ. अमरकांत चकोले सचिव, महाराष्ट्र राज्य आट्यापाट्या महामंडळ, नागपूर प्रा. डॉ. श्रीधर धाकुलकर सचिव, अमरावती जिल्हा आट्यापाट्या संघटना तसेच उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आट्यापाट्या संघटना, नागपूर यांचा समावेश आहे. निकेश शिंगणे मार्गदर्शक व प्रशिक्षक, प्रदीप भुरे व राम धंडारे क्रीडा मार्गदर्शक व प्रशिक्षक, माजी मुख्याध्यापक राजेंद्र केशवराव गादे, मुख्याध्यापक वैभव काळे व सर्व शिक्षक वृंद आदर्श विद्यालय भुगाव समस्त गावकारी मंडळी भुगांव, रामापूर, नाबाबपूर, मेघनाथपूर तर्फे खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

# बडनेरा ठाण्याची धुरा पुन्हा पीआय पुनीत कुलट यांच्यावर

## उपनिरीक्षक सतीश पाटील यांची नांदगाव पेठ येथे प्रभारी नियुक्ती

**अमरावती/प्रतिनिधीः-** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाकडून बंदोबस्ताच्या अनुषंगाने महत्त्वाचे प्रशासकीय आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यानुसार, नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांची बडनेरा येथील नवरात्रोत्सव बंदोबस्तासाठी प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, अमरावती शहरातील नेमणूक नियंत्रण कक्षातील पोलीस उपनिरीक्षक सतीश पाटील यांची नांदगाव पेठ येथील नवरात्रोत्सव बंदोबस्तासाठी प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

पोलीस उपायुक्त यांच्या स्वाक्षरीने १० ऑक्टोबर २०२६ रोजी हा बंदोबस्त आदेश जारी करण्यात आला आहे. आदेशानुसार, बडनेरा पोलीस ठाण्याचे सध्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार हे आजारी रजेवर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीत बंदोबस्ताची जबाबदारी सक्षम अधिकाऱ्याकडे सोपविणे आवश्यक होते. नवरात्रोत्सवाच्या काळात सार्वजनिक उत्सव, भाविकांची गर्दी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस यंत्रणेची जबाबदारी महत्त्वाची असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्याकडे बडनेरा येथील नवरात्रोत्सव बंदोबस्ताची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर पोलीस उपनिरीक्षक सतीश पाटील हे नांदगाव पेठ येथील बंदोबस्ताचे प्रभारी म्हणून काम पाहणार आहेत.

# अमरावती-मुंबई एक्स्प्रेस ऑक्टोबरला रद्द

## आसनगाव-कसारा तिसऱ्या लाईनच्या कामामुळे मेगा ब्लॉक

### १७ ऑक्टोबरला एक्स्प्रेस गाड्या ३ ते ७ तास उशिराने

**अमरावती/प्रतिनिधीः-** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात आसनगाव-कसारा तिसऱ्या लाईनचा प्रकल्प आणि कसारा यार्ड मध्ये अप यार्ड लाईनच्या विस्ताराचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी कसारा येथे प्री-नॉन-इंटरलॉकिंग, नॉन-इंटरलॉकिंग आणि पोस्ट-नॉन-इंटरलॉकिंग कामांसाठी विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी धावणारी अमरावती-मुंबई एक्स्प्रेस पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.



माहितीनुसार गाडी क्रमांक १२१३९ / १२१४० नागपूर-मुंबई-नागपूर सेवाग्राम एक्स्प्रेस बुधवार १४ आणि गुरुवार १५ ऑक्टोबर रोजी मुंबईहून सुटल्यानंतर कल्याण- कर्जत-पुणे-मनमाड मार्गे वळवण्यात येणार आहे. शनिवार १७ ऑक्टोबर रोजी ही दोन्ही सेवाग्राम एक्स्प्रेस मुंबईहून परत येणार नाहीत, म्हणजेच रद्द राहणार आहे. बडनेरा मार्गे मुंबई आणि नागपूरकडे जाणाऱ्या अनेक गाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. गाडी क्रमांक १२१०५ मुंबई-गोंदिया विदर्भ एक्स्प्रेस शुक्रवार १६ ऑक्टोबर रोजी मुंबईहून सुटल्यानंतर आपल्या नियमित मार्गाने न जाता जळगाव, नंदुरबार, वसई रोड आणि ठाणे मार्गे मुंबईला पोहोचेल. शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी कल्याणहून सुटणाऱ्या गाड्या कर्जत-पुणे-मनमाड- अकोला- बडनेरा मार्गे धावतील. या दिवशी अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावणार आहेत. गाडी क्रमांक १२८१० हावडा-मुंबई साप्ताहिक एक्स्प्रेस हावडाहून ७ तास उशिराने सुटणार आहे. गाडी क्रमांक १२१०१ एलटीटी-शालिमार ज्ञानेश्वरी एक्स्प्रेस ३ तास ४५ मिनिटे उशिराने, गाडी क्रमांक १२८०९ मुंबई-हावडा मेल ४ तास २० मिनिटे उशिराने, गाडी क्रमांक १८०२९ एलटीटी-शालिमार एक्स्प्रेस ३ तास ३० मिनिटे उशिराने, एलटीटी-हटिया एक्स्प्रेस २ तास १५ मिनिटे उशिराने धावणार आहे. प्रवासाला निघण्यापूर्वी रेल्वेच्या अधिकृत वेबसाईट आयआरटीसी ॲप किंवा रेल्वे चौकशी केंद्रा वरून गाड्यांची स्थिती तपासून घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# दुष्काळात खर्चाला लगाम, आर्थिक नियोजनाला प्राधान्य

## उत्पन्न-खर्चाचे योग्य नियोजन आवश्यक

**खल्लार/प्रतिनिधीः-** सध्या निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा परिणाम शेतीसह सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जिवनावर जाणवू लागला आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्याने शेतीच्या उत्पन्नावर शंभर टक्के परिणाम होण्याची दाट शक्यता असून अशा परिस्थितीत प्रत्येक कुटुंबाने आपल्या आर्थिक व्यवहारांचे योग्य नियोजन करणे गरजेचे बनले आहे.

दुष्काळी परिस्थितीत उत्पन्नाचे स्रोत मर्यादित होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनावश्यक खर्चाला आळा घालून गरजेच्या बाबींना प्राधान्य देणे आवश्यक आहे. दैनंदिन खर्च, शिक्षण, आरोग्य, शेती, घरगुती गरजा तसेच भविष्यातील आकस्मिक खर्च यांचा विचार करून उपलब्ध उत्पन्नाचे नियोजन करणे काळाची गरज आहे.

उत्पन्नापेक्षा खर्च वाढणार नाही. याची काळजी घेतानाच बचतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. अचानक उद्भवणाऱ्या आर्थिक अडचणींचा सामना करण्यासाठी शक्य तेवढी रक्कम राखीव ठेवणे, कर्जाचा अनावश्यक भार टाळणे आणि मोठ्या खर्चाचे निर्णय परिस्थितीचा आढावा घेऊन घेणे फायदेशीर ठरू शकते.

विशेषतः शेतकरी कुटुंबांनी शेतीतील उपलब्ध साधनसंपत्ती, पिक खर्च, पशुपालन, घरगुती गरजा आणि पुढील हंगामासाठी लागणारा खर्च यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजना, सवलती आणि मदतीचा लाभ घेण्यासाठी संबंधित विभागाशी संपर्क ठेवणेही महत्त्वाचे आहे.

दुष्काळ ही केवळ पाण्याची समस्या नसून त्याचा परिणाम कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थेवरही होत असतो. त्यामुळे 'गरज ओळखा, खर्च नियंत्रित करा आणि भविष्यासाठी नियोजन करा' या दृष्टिकोनातून आर्थिक शिस्त पाळल्यास संकटाच्या काळात कुटुंबाला मोठा आधार मिळू शकतो.

दुष्काळी परिस्थितीत संयम, काटकसर आणि योग्य आर्थिक नियोजन हीच काळाची गरज आहे.

# तडीपारासह दोघे जुगारी ताब्यात

## गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ ने सोमवारी ५ ऑक्टोबर रोजी धडक कारवाई केली. वलगाव परिसरातून तडीपार व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले, तर वलगाव आणि नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार अड्ड्यांवर छापे टाकून दोघांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत एकूण ४ हजार ५० रुपये रोख रक्कम व जुगार साहित्य जप्त करण्यात आले.

गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने दुपारी १२ वाजताच्या सुमारास वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई केली. यावेळी तेजस ऊर्फ चेतन राजू भांबुरकर (वय २४, रा. समतानगर, वलगाव) याला ताब्यात घेण्यात आले. तो तडीपार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर दुपारी १२.४५ वाजता वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत नासीर शाह गफ्फर शाह (वय ४५, रा. सतीनगर, वॉर्ड क्रमांक ४, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून २ हजार ३९० रुपये रोख व जुगार साहित्य जप्त करण्यात आले. याचवेळी नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतही गुन्हे शाखेने जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत रिजवान खान रहीम खान (वय २९, रा. यास्मीननगर, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १ हजार ६६० रुपये रोख व जुगार साहित्य जप्त करण्यात आले.

तिन्ही कारवाया पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनावणे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आल्या. कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ आडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फिरोज खान यांच्यासह गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला.

# अमरावती तहसील कार्यालयात महाराजस्व समाधान शिबिर

**अमरावती/प्रतिनिधीः-** सेवा संकल्प अभियानांतर्गत अमरावती तहसील कार्यालयात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करून नागरिकांना विविध शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली सुलभतेने उपलब्ध करून देण्यात आला.

उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती येथे ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वा. हे शिबिर आयोजित करण्यात आले. या अनुषंगाने अमरावती तालुक्यातील शिबिराचे आयोजन तहसील कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती येथे ६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता करण्यात आले. शिबिरात प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वाटप, पाणंद रस्ते उपलब्ध करून देणे, पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र देणे, वन हक्क दावे मंजूर करणे, मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे, नळ जोडणी देणे, मालमत्ता कराची आकारणी व मागणीपत्र देणे, वीज जोडणीसाठी मालमत्ताधारकाचे नाव नोंदविणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे आदी महसूलविषयक सेवा देण्यात आल्या. यासोबतच बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिरीसाठी पात्र लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी, दिव्यांग व विवाह नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, जन्म-मृत्यू नोंदणी व प्रमाणपत्र, शिकाऊ वाहन चालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटप, ७/१२ व ८-अ नोंदी अद्ययावत करणे तसेच इतर खात्यांच्या विशेष सहाय्य योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. या विविध सेवांचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. शिबिराच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी मिळाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला.

# मोर्शीत गोमांस विक्रीसाठी बाळगल्याचा आरोप

## -१८ हजारांचा मुद्देमाल जप्त -पेठपुऱ्यातील इसमाविरुद्ध गुन्हा दाखल

**मोर्शी/प्रतिनिधीः-** गोवंश जनावराची कत्तल करून गोमांस विक्रीच्या उद्देशाने घरात बाळगल्याच्या आरोपावरून मोर्शी पोलिसांनी एका ४६ वर्षीय इसमाविरुद्ध कारवाई केली. रियाज अहमद अब्दुल अजीज (रा. पेठपुरा, मोर्शी) असे आरोपीचे नाव आहे. या कारवाईत गोमांस आणि कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण १८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी सर्व ठाणेदारांना दिले आहेत. त्यानुसार मोर्शी पोलिसांकडून गोवंशाची अवैध कत्तल आणि गोमांस विक्री करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, ९ ऑक्टोबर रोजी पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण हे पथकासह गस्तीवर असताना पेठपुरा परिसरात एका व्यक्तीने स्वतःच्या घरात गोवंश जनावराची कत्तल करून विक्रीसाठी गोमांस ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी रियाज अहमद अब्दुल अजीज हा घरात आढळून आला.

घराची झडती घेतली असता गोमांसाचे तुकडे तसेच मांस कापण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळले. पोलिसांनी पशुधन विकास अधिकारी, मोर्शी यांना घटनास्थळी बोलावून मांसाचा नमुना रासायनिक तपासणीसाठी राखून ठेवला. संबंधित अधिकाऱ्यांनी प्राथमिक तोंडी अभिप्रायात हे मांस गोवंश जनावराचे असल्याचे सांगितले. उर्वरित मांस दुर्गंधीयुक्त असल्याने आणि आरोग्यास धोकादायक ठरू शकत असल्याने नगर परिषद मोर्शीच्या सहकार्याने पंचांसमक्ष जमिनीत पुरून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने घरातील टिनाच्या शेडमध्ये गोवंश जनावराची कत्तल केल्याचे पंचांसमक्ष सांगितले. या प्रकरणात गोमांस व कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण अंदाजे १८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२५, २२१, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम ५, ५(ब), ५(क), ९, ९(अ) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११९ अन्वये गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली, मोर्शीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे, कन्या गडलिंग, कुणाल कवडीसाव आणि चालक विशाल लोही यांनी कारवाईत सहभाग घेतला.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ३८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# चिखलसावंगी येथे अल्पभूधारक शेतकऱ्याची आत्महत्या

## -प्रकाश साबळे यांनी भेट देऊन चोपडे कुटुंबाचे केले सांत्वन

### -फार्मर आयडीतील विलंबाची चौकशी करून न्याय देण्याची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील चिखलसावंगी येथील अल्पभूधारक युवा शेतकरी सचिन उर्फ मोहन चोपडे यांनी दुष्काळाची भयानक परिस्थिती, कर्ज आणि सततची नापिकी याला कंटाळून पाच दिवसांपूर्वी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात आणि शेतकरी वर्गात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. स्व. चोपडे यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी आणि दोन लहान मुले असा उघड्यावर पडलेला परिवार आहे.



रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह चोपडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन शोकाकुल कुटुंबाचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला. कर्जमाफीस पात्र असलेल्या या शेतकऱ्याच्या आत्महत्येमागे 'फार्मर आयडी' वेळेवर न बनल्यामुळे कर्ज मिळण्यास झालेला विलंब हे कारण तर नाही ना? याबाबत उलट-सुलट चर्चा सुरू असून, प्रशासनाने या दिरंगाईची रीतसर चौकशी करून पीडित कुटुंबाला त्वरित आर्थिक न्याय द्यावा, अशी ठाम मागणी यावेळी प्रकाश साबळे यांनी प्रशासनाकडे केली.

याप्रसंगी निलेश उभाड, दत्तात्रय किटूकले, संदीप भदाडे, अंकित वडे, यादवराव चोपडे, सुनील चोपडे, पुरुषोत्तम भुयार तसेच चोपडे परिवारातील सर्व सदस्य गण उपस्थित होते.

# उपकालवा फुटल्याने शेतात शिरले पाणी

## -शेतकऱ्याचे सोयाबीन पीक उद्ध्वस्त

**तिवसा/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांच्या शेतांना सिंचनासाठी पाणी मिळावे, या उद्देशाने सोडण्यात आलेल्या कालव्याचे पाणीच शेतकऱ्यांच्या नुकसानीचे कारण ठरल्याची घटना समोर आली आहे. भांबोरा-अहमदाबाद उपकालवा फुटल्याने येथील शेतात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. त्यामुळे कापणी करून गंजी लावून ठेवलेले सोयाबीन पूर्णपणे भिजल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.

अहमदाबाद परिसरात सारिका बाळू चव्हाण यांची शेती आहे. मागील वर्षापासून अहमदाबाद येथील शेतकरी अतुल गावंडे हे या शेतीचे वाहितदार म्हणून देखभाल करीत आहेत. गेल्या दोन दिवसांपूर्वी त्यांनी शेतातील सोयाबीनची कापणी करून त्याच्या गंजी लावून ठेवल्या होत्या. पीक कापणीनंतर सोयाबीन सुरक्षित ठेवण्याची तयारी सुरू असतानाच कालव्याच्या पाण्यामुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले. शनिवारी रात्रीच्या सुमारास भांबोरा-अहमदाबाद उपकालवा फुटल्याने कालव्यातील पाणी थेट शेतात शिरले. काही वेळातच शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आणि कापणी करून ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजी पाण्याने पूर्णपणे चिंब झाल्या. शेतात इतके पाणी साचले आहे की, त्या ठिकाणी जाणेही कठीण झाले आहे. कालव्यातून वाहून आलेले पाणी शेतातून पुढे डेहनी नदीच्या दिशेने वाहून गेले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# नवी बुलेट घेऊन गावी परतताना काळाचा घाला!

## अमरावती-दर्यापूर मार्गावर ट्रकच्या धडकेत दोघांचा मृत्यू

### -मृतक अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील

**खल्लार/प्रतिनिधीः-** नवी दुचाकी (बुलेट) खरेदी करून आनंदाने गावी परत जात असताना अमरावती-दर्यापूर मार्गावरील म्हैसपूर फाट्याजवळ एक अत्यंत हृदयद्रावक अपघात घडला. भरधाव आयशर ट्रकने दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील दोन तरुणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. रविवारी ११ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

संकेत गोपाल अवतीकर





(वय २७, रा. बारलिंगा, ता. बाळापूर, जि. अकोला) आणि ऋषिकेश संजय म्हैसणे (रा. दहीगाव, ता. बाळापूर, जि. अकोला) अशी मृत पावलेल्या युवकांची नावे आहेत. हे दोघेही रविवारी अमरावती येथील एका शोरूममधून नवीन बुलेट दुचाकी खरेदी करण्यासाठी आले होते. शोरूममधील काम आटोपल्यानंतर दोघेही आनंदाने नवीन दुचाकीवरून खोलापूर मार्गे बाळापूरकडे जाण्यास निघाले होते. दोघेही म्हैसपूर फाट्याजवळ आले असता, अमरावतीच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात ट्रकने त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. अपघाताची तीव्रता एवढी भीषण होती की दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून पसार झाला. अपघाताची माहिती मिळताच खोलापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक☞(पान २ वर)

# शेखर भोयर, संगीता शिंदे, पवार भाजपातून निष्काशीत

## शिक्षक मतदार संघ निवडणूकीतील बंडोखोरी

### नितीन गुडधे यांचे प्राथमिक सदस्यत्व संपुष्टात

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाची जागा महायुतीमध्ये शिवसेनेला देण्यात आली आहे. शिवसेनेने किरण सरनाईक यांना आपला अधिकृत उमेदवार घोषित केल्यानंतर महायुतीच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात भारतीय जनता पक्षाचे चंद्रशेखर भोयर, संगीता शिंदे आणि सुमित पवार हे पदाधिकारी निवडणुकीत अर्ज मागे घेण्याच्या तारखेनंतरही अर्ज कायम ठेवून उभे आहेत. त्यामुळे या तीनही उमेदवारांना




महायुतीच्या उमेदवाराच्या विरोधात आपला अर्ज कायम ठेवल्यामुळे पक्षाचे प्राथमिक सदस्यत्व संपुष्टात आणून सहा वर्षासाठी निष्कासित करण्यात आले आहे तसेच अमरावती जिल्हा ग्रामीण मोर्शीचे सरचिटणीस नितीन गुडधे यांना शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीत केलेल्या शिस्तभंगाच्या कृती बद्दल त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्या नोटीसीला नितीन गुडधे यांनी दिलेल्या उत्तरा दाखलचा खुलासा समाधानकारक नसल्याने ☞(पान २ वर)

# महर्षी पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्याचे मृत्यूप्रकरण

## अधीक्षकेसह चार महिलांविरुद्ध गुन्हा

### -चौकशी अहवालातून निष्काळजीपणा उघड

### -कारवाईच्या मागणीसाठी वडिलांचे पोलीस ठाण्यासमोर आंदोलन




**अमरावती/प्रतिनिधीः-** नवसारी येथील महर्षी पब्लिक स्कूलच्या निवासी शाळेत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी अधीक्षकेसह चार महिलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी चिखलदरा पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक ईश्वर जांबेकर यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली.

दरम्यान, मुलाच्या मृत्यूस जबाबदार असलेल्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी मृत विद्यार्थी राजेश बेठेकर याच्या वडिलांनी पोलीस ठाण्यासमोर रात्रभर आंदोलन केले होते. नवसारी येथील महर्षी पब्लिक स्कूलच्या निवासी शाळेत अकरावीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी भोजन केल्यानंतर त्रास सुरू झाला. दुपारच्या सुमारास काही विद्यार्थ्यांना उलट्या, जुलाब आणि तापाचा त्रास जाणवू लागला. यामध्ये आशीष बाबू बेठेकर आणि राजेश बाबू बेठेकर यांचीही प्रकृती बिघडली. त्यानंतर दोघांनी अर्ज करून आपल्या गावी जाण्याचा निर्णय घेतला. दोन्ही विद्यार्थी दुपारी सुमारे दोन वाजता अमरावती बसस्थानकावरून खासगी प्रवासी वाहनाने रवाना झाले. प्रवासादरम्यान त्यांनी राहू येथे पोहोचल्यानंतर राजेशच्या प्रकृतीची माहिती वडिलांना फोनवरून दिली. त्यानंतर आई-वडील राजेशला हतरू येथील रुग्णालयात घेऊन जात असताना त्याचा मृत्यू ☞(पान २ वर)

# अमरावतीत नवरात्रोत्सवाचा चैतन्यमय प्रारंभ





### देवीचे आगमनाने शहरासह जिल्हयात उत्साह

**अमरावती/प्रतिनिधीः-** शक्ती आणि भक्तीचा सण असलेल्या शारदीय नवरात्रोत्सवाला अमरावती शहरात अत्यंत उत्साहात आणि धार्मिक वातावरणात प्रारंभ झाला आहे. घरोघरी आणि सार्वजनिक मंडळात घटस्थापनेची जय्यत तयारी पाहायला मिळत असून, संपूर्ण शहरात आनंदाचे व चैतन्याचे वातावरण पसरले आहे.

नवरात्रोत्सवाच्या पूर्वसंध्येला आणि आरंभी अमरावती शहरात देवीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यासाठी विविध मंडळांमध्ये कमालीचा उत्साह दिसून आला. शहरात विविध आकर्षक रूपात माता आदिशक्तीच्या आणि देवीच्या मूर्तींचे आगमन वाजत-गाजत आणि ढोल-ताशांच्या गजरात झाले. अनेक मंडळांनी वाहनांवर फुलांची सजावट करून आणि फुगे लावून देवीची मूर्ती मंडपात नेली,☞(पान २ वर)

# अप्पर वर्धा प्रकल्पाचे मौल्यवान पाणी विनावापर वाया!

### कालव्यात इलेक्ट्रिक मोटारी टाकून भर दिवसा पाण्याचा बेसुमार उपसा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अप्पर वर्धा धरणातून सिंचनासाठी सोडण्यात आलेले पाणी पुढे शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच वाटेतच प्रचंड प्रमाणात वाया जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. धरणातून सोडलेले पाणी कुऱ्हा ते आखतवाडा (ता. तिवसा) मार्गे धामणगाव रेल्वे तालुक्याकडे जाणाऱ्या कालव्यातून प्रवाहित होत असताना, काही भागांत



शेतकऱ्यांनी थेट कालव्यात इलेक्ट्रिक मोटारी टाकून भर दिवसा पाण्याचा बेसुमार उपसा चालवला आहे.

दिवसभर शेतकरी मोटारींद्वारे पाण्याचा उपसा करत आहेत. परंतु, सायंकाळी किंवा रात्री वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर किंवा मोटारी बंद पडल्यानंतर, कालव्यातील पाणी पुढील भागाकडे न जाता इतरत्र वाहून जात आहे किंवा शेतात साचून नासाडी होत आहे. या संदर्भात स्थानिकांचे म्हणणे आहे की, जर हे पाणी कालव्यामार्फत शिस्तबद्ध पद्धतीने पुढे सोडले, ☞(पान २ वर)

# विवाहाचे आमिष दाखवून युवतीचे शोषण

### मोर्शीत गुन्हा दाखल; आरोपीला अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** विवाहाचे आमिष दाखवून युवतीचे वारंवार शारीरिक शोषण केल्याचा आणि खासगी अश्लील व्हिडीओ प्रसारित करण्याची धमकी दिल्याचा प्रकार मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. पीडित युवतीच्या तक्रारीवरून पोलिसांनी दीपक (वय ३१) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्याला अटक केली आहे.



तक्रारीनुसार, १४ एप्रिल २०२० ते १८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आरोपीने विवाहाचे आमिष दाखवून युवतीशी अनेकदा शारीरिक संबंध प्रस्थापित केले. १८ सप्टेंबर रोजीही आरोपी युवतीच्या घरी कोणतीही पूर्वसूचना न देता आला आणि तिच्याशी अनैतिक☞(पान २ वर)

# नवरात्र उत्सवासाठी दर्यापूर शहरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त!

### शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज

**खल्लार/प्रतिनिधीः-** नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर दर्यापूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गणेशोत्सवाप्रमाणेच नवरात्रीचा उत्सवही शांततेत, उत्साहात आणि निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

नवरात्रीच्या काळात शहरातील विविध देवी मंदिरांमध्ये



भाविकांची होणारी गर्दी, गरबा-दांडिया कार्यक्रम तसेच रात्रीच्या वेळी होणारी नागरिकांची वर्दळ लक्षात घेता पोलीस प्रशासनाकडून सुरक्षेला प्राधान्य देण्यात येत आहे. उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि नागरिकांना सुरक्षित वातावरणात उत्सवाचा आनंद घेता यावा, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी सतिश कुलकर्णी व प्रभारी ☞(पान २ वर)

# मिर्झा पार्कमधील घरात १४ गोवंश ठेवले कोंबून, २.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

### -खोलापुरी गेट पोलिसांची कारवाई, एकाविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील मिर्झा पार्क परिसरात एका घरातील दोन खोल्यांमध्ये १४ लहान-मोठी गोवंश जनावरे कोंबून ठेवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खोलापुरी गेट पोलिसांनी १० ऑक्टोबर रोजी केलेल्या कारवाईत अंदाजे २ लाख ८० हजार रुपये किमतीची जनावरे ताब्यात घेतली. जनावरांना अन्न-पाण्याविना कोंडून ठेवून त्यांचा छळ केल्याचा आरोप असून,



याप्रकरणी शेख सुफियान शेख नदीम (वय २३, रा. सागरनगर, खोलापुरी गेट, अमरावती) याच्याविरुद्ध प्राणी छळ प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

खोलापुरी गेट पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी १० ऑक्टोबर रोजी वरिष्ठ पोलीस ☞(पान २ वर)

# ८० किलो गांजा तस्करीचे धागेदोरे ओडिशापर्यंत; मुख्य आरोपीला अटक

### अमली पदार्थविरोधी पथकाची दुर्गम जंगलात कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ८० किलो ४४० ग्रॅम गांजा जप्त केल्याप्रकरणी तपास करताना अमरावतीच्या अमली पदार्थविरोधी कृती दलाने तस्करीचे धागेदोरे ओडिशापर्यंत पोहोचविले आहेत. या प्रकरणातील ओडिशातील आरोपी जोसेफ कंदपाल (वय ३३, रा. मलकानगिरी जिल्हा, ओडिशा) याला दुर्गम आणि घनदाट जंगल परिसरातून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. त्याला अमरावती न्यायालयाने १४ ऑक्टोबरपर्यंत तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, गांजाच्या पुरवठा साखळीचा पुढील तपास सुरू आहे.

अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सच्या अमरावती पथकाने ७ फेब्रुवारी २०२६ रोजी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत छापा टाकून ८० किलो ४४० ग्रॅम गांजा जप्त केला होता. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला. अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याच्या कलम ८(क), २०(ब)(ii) आणि २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अमरावती जिल्ह्यातील नऊ आरोपींना अटक करून १ ऑगस्ट २०२६ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

जप्त करण्यात आलेला गांजा अमरावती जिल्ह्यात नेमका कोठून आणण्यात आला होता, याचा तपास ☞(पान २ वर)

# बेलोरा शिवारातून २० स्प्रिंकलर पाईप चोरीला

**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बेलोरा येथील शेतशिवारातून शेतकऱ्याचे स्प्रिंकलर पाईप साहित्य लांबवल्याची घटना समोर आली आहे. येथील रहिवासी असलेल्या अभिषेक सुनील राऊत यांचे विचोरी रस्त्यावर शेत आहे.

शेतकरी अभिषेक राऊत हे आपल्या शेतातील पराटी आणि तुरीच्या पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेले होते. त्यावेळी त्यांना शेतात ठेवलेले स्प्रिंकलर पाईप्स जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. अज्ञात चोरांनी शेतामधून २० स्प्रिंकलर पाईप्स चोरून नेल्याचे स्पष्ट झाले.

चोरीस गेलेल्या या साहित्याची अंदाजे किंमत १५,००० रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी पिडीत शेतकऱ्याने चांदूरबाजार पोलीस ☞(पान २ वर)


नाग विदर्भ चरखा संघ मुल
व्दारा संचालित
खादी ग्रामोद्योग भांडार
गांधी चौक, अमरावती मो. ८१४९७५११५१
प. पुज्य म. गांधी जयंती निमित्य
२ ऑक्टोंबर पासून ४५ दिवसपर्यंत २०%
प्रमाणे सवलत सुरु राहील
खादी २०%
पॉलीवस्त्र २०%
रेशम २०%
उलन २०%

# अंबादेवी, एकवीरा मंदिरात दर्शनासाठी जाताय? मौल्यवान दागिने टाळा!

### भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** नवरात्रोत्सवानिमित्त अंबादेवी आणि एकवीरा देवीच्या मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. या गर्दीत मौल्यवान दागिने चोरीला जाणे, मोबाईल हरविणे तसेच लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींची ताटातूट होण्याची शक्यता लक्षात घेता अमरावती शहर पोलिसांनी भाविकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे. मंदिरात दर्शनासाठी जाताना मौल्यवान दागिने आणि मोठी रोख रक्कम सोबत नेणे टाळावे, तसेच गर्दीत आपल्या किमती वस्तूंची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक विजया पंधरे यांनी केले आहे. नवरात्रोत्सवात अंबादेवी आणि एकवीरा ☞(पान २ वर)

# मेळघाटला नवीन रुग्णवाहिका!

### -बच्चू कडू यांच्या मेळघाट संघर्ष यात्रेची फलश्रुती

**एकनाथ शिंदे आणि आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या आश्वासनांची पूर्तता**

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या आरोग्याचा प्रश्न केवळ कागदावर न मांडता, प्रत्यक्ष पायदळ फिरून, आरोग्य केंद्रांना भेटी देऊन आणि आदिवासी बांधवांशी संवाद साधून बच्चू कडू यांनी शासनाचे लक्ष वेधले. चिखलदरा येथे मेळघाट संघर्ष यात्रेच्या समारोपप्रसंगी मंत्री उदय सामंत आणि आरोग्यमंत्री प्रा. प्रकाश आबिटकर प्रत्यक्ष उपस्थित होते, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे



संवाद साधला. या वेळी बच्चू कडू यांनी मेळघाटातील आरोग्य समस्यांचा प्रश्न आग्रहीपणे मांडला होता. त्यानंतर मेळघाटसाठी नवीन रुग्णवाहिका प्राप्त झाल्याने संघर्ष यात्रेच्या पाठपुराव्याला महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे.



‘मेळघाटातील आदिवासी बांधवांना उपचारांसाठी वणवण करावी लागणे थांबले पाहिजे. संघर्ष यात्रेत आम्ही प्रत्यक्ष गावागावांत जाऊन आरोग्य व्यवस्थेची परिस्थिती पाहिली आणि लोकांच्या वेदना शासनापर्यंत पोहोचवल्या. नवीन रुग्णवाहिका मिळणे हा महत्त्वाचा टप्पा आहे; मात्र डॉक्टर, औषधे आणि आवश्यक उपचार सुविधा मिळेपर्यंत आमचा पाठपुरावा थांबणार नाही,’ अशी भूमिका बच्चू कडू यांनी मांडली.

मेळघाटातील दुर्गम गावांमध्ये वेळेवर उपचार मिळत नसल्याची परिस्थिती, आरोग्य केंद्रांमधील☞(पान २ वर)